■ यशकथा ■ संधी ■ महिलांसाठी योजना ■ कौशल्य विकास

# लोकराज्य

मार्च २०१७ / पाने ६० / किंमत ₹१०



## 'ति'च्या सर्वांगीण विकासाचे क्षितिज विस्तारू या

महाराष्ट्र शासन

**कौशल्य विकास व उद्योजकता विभाग**

# कुशल महाराष्ट्र, रोजगारयुक्त महाराष्ट्र



**श्री. देवेंद्र फडणवीस**
मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य





**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर**
मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता

- प्रमोद महाजन कौशल्य विकास अभियान
- आतापर्यंत १९७८ नोंदणीकृत कौशल्य विकास संस्था प्रत्यक्ष कार्यरत
- या संस्थांमध्ये १,२२,७१८ लाभार्थी, यात महिलांचे प्रमाण ५७%
- १५ ते ४५ वयोगटातील युवक-युवतींना कौशल्य विकासाचे मोफत प्रशिक्षण
- प्रशिक्षण देऊन रोजगार-स्वयंरोजगारासाठी सक्षमीकरण
- सर्व लाभार्थ्यांना आधारकार्ड/बायोमेट्रिक उपस्थिती अनिवार्य, सर्व पेमेंट ऑनलाइन
- देशातील पहिला 'स्कील सखी'चा यशस्वी प्रयोग, निती आयोगाकडून कौतुक
- शेतकऱ्यांसाठी कृषी व संलग्न क्षेत्रातील व्यवसाय -प्रशिक्षणाकरिता विविध योजना
- ओव्हरसीज एम्प्लॉयमेंट ॲण्ड प्लेसमेंट सेंटर या महत्त्वाकांक्षी संकल्पनेवर काम सुरू.
- युवा गटासाठी कौशल्य आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या आधुनिकीकरणासाठी कॉर्पोरेट एन्गेजमेंट धोरण
- वर्षभरात कौशल्य विकास व उद्योजकता विभागामार्फत नामांकित कंपन्यासोबत ३३ सामंजस्य करार.त्यापैकी २८ सामंजस्य करार कार्यान्वित
- आर्थिकदृष्ट्या मागास घटकांसाठी महत्त्वाचे पाऊल, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास महामंडळाला शासनाद्वारे २०० कोटी रुपयांचे अनुदान मंजूर
- युवा मार्गदर्शनासाठी करिअर गाईडन्स ॲण्ड काऊन्सिलिंग सेंटर (CGCC) स्थापन. अमरावती येथे मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते पहिल्या सेंटरचे उद्घाटन.
- आयटीआय आधुनिकीकरणासाठी नामांकित कंपन्यांच्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतून पायाभूत सुविधा व यंत्रसामग्रीमध्ये सुधारणा
- राज्यातील १,१७,००० विद्यार्थ्यांना सर्व आयटीआयमध्ये दिला ऑनलाइन प्रवेश
- तांत्रिक प्रशिक्षणास प्रोत्साहन देण्यासाठी द्विलक्षी अभ्यासक्रमाच्या व्याप्तीत वाढ
- मागील वर्षात फक्त रोजगार मेळाव्यांतून २९,२९६ रोजगार उपलब्ध
- कौशल्य विकास कार्यक्रमात धोरणात्मक सुधारणेंतर्गत राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेला स्वायत्ता प्रदान
- युवा गटाला जास्तीत जास्त ॲप्रेन्टीसशिप मिळण्यासाठी केंद्राच्या अप्रेंटिस ॲक्ट १९६१ मध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा प्रस्तावित
- उद्योजकता विकासास गती देण्याच्या दृष्टीने कौशल्य विकास विभागाद्वारे राज्यात प्रथमत: इनोव्हेशन स्टार्ट-अप धोरणाचा मसुदा तयार
- दर्जेदार प्रशिक्षणातून रोजगार/स्वयंरोजगाराच्या संधीसाठी कौशल्य विकास व उद्योजकता विभाग प्रयत्नशील

**Website : www.mahaswayam.in, www.dvet.gov.in, www.mssds.in**

जागतिक महिला दिन

# महिला शक्ति


| | |
|---|---|
| सामर्थ्याची 'उमेद' | ६ |
| आत्मविश्वासात वाढ | ८ |
| परिवर्तनासाठी सुसज्ज | ९ |
| सन्मान आणि समान वागणूक | १० |
| प्रगतीची दशसूत्रे | १२ |
| स्वावलंबन व आत्मविश्वास | १४ |
| पाऊल पडते पुढे... | १६ |
| आम्ही सरस.... | २८ |
| स्वबळाची सक्षमता | ३२ |
| महिलांना खंबीर साथ | ३४ |
| येथे कर माझे जुळती... | ३५ |
| सुरक्षेसाठी प्रतिसाद | ३९ |
| संरक्षण आणि सुरक्षा | ४० |
| राहा सदैव सतर्क... | ४२ |
| कर्तृत्वाचा ठसा... | ४४ |
| स्पर्धा परीक्षेची पूर्वतयारी | ४६ |
| आईबाबांची घ्या काळजी, अन्यथा... | ४८ |
| संधी कौशल्य विकासाची... | ५० |
| ज्ञानाचा वैभवशाली वारसा | ५४ |
| अर्थसंकल्प म्हणजे काय? | ५६ |
| कॅशलेसचे यश | ५८ |




### ६ सामर्थ्याची उमेद

महिलांच्या आंतरिक शक्तीचे मला नेहमीच कौतुक वाटत राहिले आहे. राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी होत असलेल्या प्रदर्शनांमधून महिलांना आर्थिक आधार लाभला आहे. यापुढेही महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला प्राधान्य देणार असल्याचे सांगताहेत महिला व बालविकास मंत्री पंकजा मुंडे...

### १० सन्मान आणि समान वागणूक



सामाजिक किंवा अन्य काही कारणांमुळे महिलांना अनेक ठिकाणी अजूनही असमान वागणूक मिळते. ही असमानता दूर करून महिलांना समान पातळीवर आणण्यासाठी शासनातर्फे विविध योजना राबवल्या जातात.

### १४ स्वावलंबन व आत्मविश्वास

महिला सक्षमीकरणासाठी शासनामार्फत विविध योजना राबवल्या जात आहेत. या योजनांच्या माध्यमातून शालेय विद्यार्थिनी, तरुणी, नोकरी करणारी महिला, वयोवृद्ध महिला, गृहिणी आदींना स्वावलंबी व आत्मविश्वासाने जीवन जगण्याची ऊर्मी मिळत आहे.

### १६ पाऊल पडते पुढे...




ग्रामीण भागात बचतगटांच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाचे काम प्राधान्याने चालू आहे. शासनाच्या विविध योजनांच्या साहाय्याने कुटुंबाची आर्थिक प्रगती साध्य करणाऱ्या महिलांची यशोगाथा...

### ३५ येथे कर माझे जुळती...

अनेक क्षेत्रात महाराष्ट्रातील कर्तृत्ववान महिलांनी कामगिरी करून आदर्श निर्माण केला आहे. महदाइसा ऊर्फ महदंबा, राजमाता जिजाऊ, अहिल्याबाई होळकर, ताराबाई शिंदे, सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, ताराबाई मोडक, अनुताई वाघ, डॉ.आनंदीबाई जोशी या थोर महिलांचा ठळकपणे उल्लेख करावा लागेल.

### २८ आम्ही सरस....



बचत गट, लघुउद्योग, गृहउद्योग, विविध कौशल्ये, कलाकुसर आदींच्या माध्यमातून महिला सक्षम आणि स्वावलंबी झाल्या आहेत. अनेक महिलांनी असंख्य अडचणींचा सामना करून संसाराच्या चाकाला गती दिली आहे. महालक्ष्मी सरस प्रदर्शनात सामील झालेल्या काही यशस्वी महिलांच्या यशोकथा...

### ४० संरक्षण आणि सुरक्षा

महिलांना पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करता यावे तसेच त्यांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे यासाठी संविधानामध्ये तरतूद करण्यात आली आहे. या तरतुदींचा विस्तृत आढावा...

### ४८ आईबाबांची घ्या काळजी, अन्यथा...

छोटे कुटुंब, राहण्यासाठी छोटी जागा, इत्यादी कारणांमुळे ज्येष्ठ नागरिकांच्या समस्यांमध्ये वाढ होत आहे. मात्र कायदा व शासन ज्येष्ठ नागरिकांच्या पाठीशी आहे. त्यांच्यासाठी असलेल्या कायद्यातील महत्त्वपूर्ण तरतुदींचा आढावा...



### ५० संधी कौशल्य विकासाची...



राज्यातील अधिकाधिक युवक-युवतींना रोजगार/स्वयंरोजगार करण्यास सक्षम बनवणे याकरिता कौशल्य विकास व उद्योजकता विभाग प्रयत्नशील आहे.

वर्ष ६८ वे | अंक ९ | मार्च २०१७

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन**

# लोकराज्य


## संपादन

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- संपादक मंडळ — अजय अंबेकर, देवेंद्र भुजबळ, शिवाजी मानकर
- संपादक — सुरेश वांदिले
- कार्यकारी संपादक — प्रवीण टाके
- उपसंपादक — गजानन पाटील, राजाराम देवकर

## मांडणी

- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रण — प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा. लि. महापे, नवी मुंबई.

## प्रशासन

- प्रशासन अधिकारी — मीनल जोगळेकर
- वितरण सहायक — अश्विनी पुजारी
- साहाय्य — भारती वाघ



## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

## वितरण आणि वर्गणीदार

वर्गणीदार व तक्रार निवारण - ०२२-२२०२१५३०
Email : lokvitaran.dgipr@maharashtra.gov.in

**ई - लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in


## सप्रेम नमस्कार

फेब्रुवारी महिन्याच्या लोकराज्यमधून केंद्रीय तसेच राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षांचे योग्य मार्गदर्शन लाभले. लोकराज्यमध्ये दर महिन्याला किमान तीन जिल्ह्यांची माहिती समाविष्ट करावी जेणेकरून स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्यांना महाराष्ट्र दर्शनासोबतच परिपूर्ण व योग्य माहिती प्राप्त होईल.

– पंकज ढोके, गडचांदूर, जि. चंद्रपूर

लोकराज्यचा प्रत्येक अंक उपयुक्त असतो. त्यामुळे राज्यातील सर्व खासगी शिक्षण संस्था, शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना हे मासिक मोफत द्यायला हवे. यामुळे विविध योजना व उपाययोजनांचा प्रसार मोठ्या प्रमाणावर होईल.

– सुरेश नरसिंगराव शिंदे,
पो. लोहा ता. लोहा, जि. नांदेड


### वार्षिक वर्गणी

वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४०००२१
या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वठणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. आपला संपूर्ण निवासी पत्ता सुवाच्च अक्षरात पीनकोडसह असावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा.
(प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००)

**लोकराज्यची वर्गणी ऑनलाइन भरण्यासाठी**
http://dgipr.maharashtra.gov.in


* या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.

फॉलो करा...www.twitter.com/MahaDGIPR
लाइक करा...www.facebook.com/dgipr
लाइक करा...YouTube/MaharashtraDGIPR

### प्रतिक्रियांचे स्वागत

लोकराज्य अंकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया आम्हाला हव्या आहेत.
पत्ता : संपादक, लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२




# महिलाशक्ती

आज महिला सर्वच क्षेत्रात स्वकर्तृत्वाने तळपत आहेत. असे कोणतेही क्षेत्र उरलेले नाही की, ज्या ठिकाणी महिलांनी आपला ठसा उमटवलेला नाही. त्यांना संधी मिळाली की, त्याचे त्या सोने करतात हे सातत्याने सिद्ध झाले आहे. असे असूनही आपल्या देशात व राज्यातही महिलांना पाहिजे तेवढा सन्मान दिला जात नाही. आपल्या देशाची निम्मी लोकसंख्या महिलांची आहे. असे असूनही त्यांना पुरुषांइतक्या संधी मिळत नाहीत. असुरक्षिततेचा अनुभव त्यांना पदोपदी येतो. जीवनव्यवहारात महिला मुख्य आधार असूनही त्यांना दुय्यम भूमिका दिली जाते.

ही परिस्थिती बदलावी यासाठी देशात आणि राज्यात सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. महाराष्ट्रासारख्या प्रागतिक राज्याने तर अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम, धोरणे राबवून, निर्णय घेऊन, महिलांचा सन्मान वाढावा, त्यांचा आत्मविश्वास वाढावा यासाठी प्रयत्न करून देशापुढे वेगळा आदर्श निर्माण केला आहे.

महिलांच्या सर्वांगीण आणि परिपूर्ण विकासासाठी महिला धोरण आखणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ३३ टक्के जागा महिलांसाठी राखीव ठेवून, महाराष्ट्राने महिलांना राजकीय व सामाजिक निर्णय प्रक्रियेच्या केंद्रस्थानी आणले. त्याचे निश्चित चांगले परिणाम दिसून येत आहेत. राज्यातील महिला बचतगटांनी रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या दृष्टीने केलेले कार्य असेच महत्त्वाचे ठरले. या महिला बचतगटांनी महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबनाच्या दिशेने पुढचे पाऊल टाकण्यास आणि नव्या आत्मविश्वासाने समाजात वावरण्यास मोलाचे साहाय्य केले आहे.

मार्च महिन्यात ८ तारखेला आंतरराष्ट्रीय महिला दिवस साजरा केला जातो. महिलाशक्तीचा सन्मान करणे, त्यांच्या कर्तृत्वाला चालना देणे, त्यांना समान संधी मिळवून देण्याच्या प्रयत्नांना गती देणे; अशा प्रकाराच्या सकारात्मक बाबींना उजाळा देण्यासाठी या दिवशी जगात सर्वत्र विविध उपक्रम राबवले जातात. यापुढे असे उपक्रम एका दिवसापुरते मर्यादित न ठेवता सातत्याने राबवून, महिलांना त्यांचे न्याय्य हक्क मिळवून देणे, त्यांना अधिकाधिक सक्षम, समर्थ, स्वावलंबी करणे अत्यावश्यक आहे. तरच हा दिवस साजरा करणे संयुक्तिक ठरेल.

म्हणूनच मार्चचा लोकराज्य अंक आम्ही महिलाशक्ती विशेषांक म्हणून प्रकाशित करत आहोत. या अंकात कर्तृत्ववान महिलांच्या यशकथा, महिलांसाठीचे निर्णय, धोरण, उपयुक्त माहिती, बचतगट आदी माहितींचा समावेश केला आहे.

हा अंक आपणास आवडेल अशी खात्री आहे.



ब्रिजेश सिंह
(मुख्य संपादक)



छायाचित्र : अरुण कुलकर्णी

महालक्ष्मी सरस प्रदर्शनात यशस्वी महिला बचतगटाचा सन्मान करताना राज्यपाल सी. विद्यासागर राव आणि महिला व बालविकास मंत्री पंकजा मुंडे.

# सामर्थ्याची 'उमेद'

ग्रामविकास आणि महिला – बालविकास विभागामार्फत मुंबईत दरवर्षी महिला बचतगटांच्या उत्पादनांचे सरस महालक्ष्मी प्रदर्शन भरवले जाते. या वर्षीचे प्रदर्शन नुकतेच संपन्न झाले. मागच्या वर्षी राज्यात दुष्काळी परिस्थिती होती, शेतकरी अडचणीत होता. त्या वेळी दुष्काळग्रस्त भागातील बचतगटांच्या महिला आपली उत्पादने घेऊन सरस प्रदर्शनात सहभागी झाल्या होत्या. मुंबईत या प्रदर्शनात आपल्या उत्पादनांची विक्री करून या महिलांनी चांगला व्यवसाय केला व दुष्काळात सापडलेल्या कुटुंबाला आर्थिक आधार दिला. छोट्या–मोठ्या व्यवसायाच्या तसेच लघुउद्योगांच्या आधारे कुटुंबाला सावरण्याचे कार्य या महिलांनी मागच्या दुष्काळात केले. मागच्या वर्षीच्या अशा अनेक महिला मला यंदाच्या सरस प्रदर्शनात भेटल्या व अगदी मनमोकळेपणाने त्यांनी आपल्या भावना माझ्याजवळ व्यक्त केल्या. सरस प्रदर्शनाबरोबरच राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी होत असलेल्या प्रदर्शनांमधून त्यांना चांगला आर्थिक आधार लाभला असून यापुढील काळातही महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाची ही चळवळ जोमाने राबवण्यात येत आहे.

> महिलांची आंतरिक शक्ती अतिशय कौतुकास्पद असते. कोणत्याही परिस्थितीला धैर्याने सामोरे जाण्याची तसेच अडचणीच्या काळात स्वत:बरोबर संपूर्ण कुटुंबाला सावरण्याची तिच्यातील ही शक्ती समाजाला नेहमीच बळ देत आली आहे. राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी होत असलेल्या बचतगटांच्या प्रदर्शनांमधून माहिलांना चांगला आर्थिक आधार लाभला आहे. यापुढील काळातही महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाची ही चळवळ राबवण्यासाठी प्राधान्य देण्यात येत आहे.

### महिला सक्षमीकरण योजना

बचतगटांची चळवळ गतिमान करण्यासाठी ग्रामविकास आणि महिला व बालविकास या दोन्ही विभागांनी महत्त्वपूर्ण पाऊले उचलली आहेत. सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजनेतून महिला बचतगटांना शून्य टक्के व्याजदराने कर्ज देण्याची योजना सुरू केली आहे. राज्यात महिला बचतगटांचे कर्ज परतावाच्याचे प्रमाण अत्यंत चांगले आहे. त्यामुळे बँकांचा बचतगटांवर विश्वास असल्याचे दिसते. या बचतगट चळवळीला अधिक गतिमान करणे व त्यांना प्रोत्साहन

देण्याच्या उद्देशाने 'सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजना' सुरू करण्यात आली आहे.

बचतगटांची उत्पादने लोकांना ऑनलाइन उपलब्ध व्हावीत यासाठी वेबपोर्टलही सुरू करण्यात आले आहे. यंदाच्या सरस महालक्ष्मी प्रदर्शनात कॅशलेस व्यवहाराची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. गावाकडून आलेल्या महिला मोठ्या आत्मविश्वासाने स्वाइप मशीन, पीओएस मशीन, डेबीट कार्ड, क्रेडिट कार्ड, मोबाइल बँकिंग, ई-वॉलेट, पेटीएम यांचा वापर करून व्यवहार करीत होत्या. बचतगटांच्या उत्पादन विक्रीसाठी कायमस्वरूपी बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी महानगरांमध्ये मॉल सुरू करण्याचेही शासनाने निश्चित केले आहे.

### मुलींच्या जन्माला प्रोत्साहन

महिलांच्या सक्षमीकरणासाठी महिला व बालविकास विभागामार्फत विविध योजना राबवल्या जात आहेत. मुलींचा जन्मदर वाढवणे व स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठी राज्यात 'माझी कन्या भाग्यश्री' योजना सुरू करण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' अभियानाची महाराष्ट्रातील १६ जिल्ह्यांमध्ये अंमलबजावणी सुरू आहे. स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठी केलेले कायदे व मुलींच्या जन्माला प्रोत्साहन देण्यासाठी राबवण्यात येत असलेल्या योजनांचे फलस्वरूप म्हणून मुलींचे प्रमाण वाढत आहे. पण मुलीला फक्त जन्म देऊन आपले कर्तव्य संपत नाही, तिचे शिक्षण, संगोपन, संरक्षण, सक्षमीकरण, आरोग्य या बाबींवरही लक्ष देणे गरजेचे असून 'माझी कन्या भाग्यश्री' योजनेच्या माध्यमातून यासाठी उपाययोजना केल्या जात आहेत. पालकांनीही मुलगी हे ओझे न समजता ती आपल्या कुटुंबाचे भाग्य आहे, असे समजले पाहिजे.

### निराधार, पीडित महिलांना मदत

बलात्कार, बालकांवरील लैंगिक अत्याचार आणि ॲसिड हल्ला यासारखे अत्यंत क्रूर अत्याचार समाजात घडत असतात. त्यांना अटकाव करण्यासाठी पोलीसदल नेहमी तत्पर असते. पण तरीही अशा अत्याचारांमध्ये पीडित झालेल्या महिला व बालकांना अर्थसाहाय्य करणे व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी शासन मनोधैर्य योजना राबवते. या योजनेतून पीडितांना ५० हजार ते ३ लाख रुपयांपर्यंत मदत देण्यात येते. पीडितांना तातडीने मदत देण्याच्या उद्देशाने शासनाने आकस्मिकता निधीतून या योजनेसाठी निधीची उपलब्धता केली. योजनेसाठी २०१६-१७ मध्ये ४३ कोटी २३ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली. पण पीडितांना फक्त आर्थिक मदत न करता त्यांचे पुनर्वसन करणे, त्यांना सन्मानाने जगता यावे यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.

## 'बेटी बचाओ, बेटी पढाओ'



महिलांच्या सक्षमीकरणासाठी शासनामार्फत विविध योजना राबवल्या जात आहेत. पण या सर्वांबरोबरच समाजानेही महिलांच्या सक्षमीकरणासाठी पुढे आले पाहिजे. स्त्रीभ्रूणहत्येसारख्या कुप्रथांमुळे मुलींचे कमी झालेले प्रमाण ही चिंतेची बाब आहे. हे रोखण्यासाठी कायदे करण्यात आले आहेत. तसेच विविध योजना राबवण्यात येत आहेत. राज्यात मुलींचा जन्मदर १००० मुलांच्या मागे ८९४ इतका आहे. राज्यातील १६ जिल्ह्यांमध्ये मुलींची संख्या लक्षणीयरीत्या कमी आहे. या १६ जिल्ह्यांमध्ये केंद्र आणि राज्य शासनाच्या सहयोगातून 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' योजना राबवण्यात येत आहे.

वंचित, पीडित महिलांना साहाय्य करणे, त्यांचे समुपदेशन तसेच पुनर्वसन करणे यासाठी महिला व बालविकास विभागामार्फत विविध योजना राबवण्यात येत आहेत. यात विशेष करून विविध प्रकारच्या शेल्टर योजना, देवदासींकरिता निर्वाह अनुदान योजना, निराधार, विधवा महिलांच्या मुलींच्या विवाहाकरिता अनुदान योजना, नोकरी करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृह योजना, स्वाधार योजना, राज्यगृह योजना अशा विविध योजनांचा यात उल्लेख करावा लागेल. या योजना प्रभावीपणे राबवण्याच्या दृष्टीने व वंचित, पीडितांपर्यंत या माध्यमातून मदत पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण पाऊल उचलत आहोत.

### कॉर्पोरेट संस्थांच्या साहाय्याने विविध उपक्रम

कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिब्लिटी (सीएसआर) निधीतून महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध कॉर्पोरेट कंपन्यांचे योगदान घेण्यात येत आहे. शासनाच्या विविध योजना आणि त्यासाठी करण्यात येणारी आर्थिक तरतूद यामध्ये महिलांना समान न्याय मिळेल, याची खात्री करणे हा याचा प्रमुख उद्देश असेल.

### उमेद अभियान

बचतगटांसाठी 'महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती' तथा 'उमेद' अभियान राबवण्यात येत आहे. राज्यात या योजनेतून मागील दोन वर्षात बँकांमार्फत साधारण १ लाख १३ हजार बचतगटांना सुमारे १,५८६ कोटी रुपयांचे कर्जवितरण करण्यात आले आहे. यातून बचतगटांच्या महिलांना रोजगार उपलब्ध होण्याबरोबरच ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठ्या प्रमाणात चालना मिळाली आहे.

### अंगणवाडी सेविकांच्या मानधनात वाढ

कुपोषणमुक्तीच्या कार्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविकांच्या मानधनात अनुक्रमे ९५० रु., ५०० रु.व ५५० रुपये इतकी वाढ करण्यात आली आहे. याशिवाय त्यांचे वेतन रोखीने न देता ते त्यांच्या बँकखात्यावर थेट जमा करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील १ लाख ९७ हजार २६२ अंगणवाडी कर्मचाऱ्यांना ह्या मानधनवाढीचा लाभ मिळणार आहे.

**शब्दांकन: इर्शाद बागवान**
विभागीय संपर्क अधिकारी

# आत्मविश्वासात वाढ



विद्या ठाकूर

राज्यमंत्री, महिला व बालविकास

महिलांना समान संधी आणि त्यांचे सक्षमीकरण तसेच महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि प्रगतीसाठी राज्य शासनामार्फत राबवल्या जाणाऱ्या योजना आणि त्याचा महिलांना होत असलेला फायदा याविषयी सांगताहेत महिला व बालविकास विभागाच्या राज्यमंत्री विद्या ठाकूर...

महिलांना समान संधी मिळणे, महिलांचे सक्षमीकरण होणे ही काळाची गरज आहे. ८ मार्च हा आंतरराष्ट्रीय महिला दिन असून या दिवशी महिलांना विश्वास आणि शक्ती देणारे उपक्रम राबिवले जातात. हे उपक्रम फक्त एका दिवसापुरते मर्यादित न राहता, वर्षभर वेगवेगळे उपक्रम, योजना महिलांच्या सक्षमीकरणासाठी राबवले जाणे आवश्यक आहे. राज्य शासन महिलांच्या पाठीशी ठामपणे उभे असून महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्यांच्या हिताच्या वेगवेगळया योजना राबवत आहे. राज्य शासनाच्या वेगवेगळ्या निर्णयांचा फायदा महिलांना होत असून यामुळे महिलांच्या आत्मविश्वासात वाढ झाली आहे.

### महिला सक्षमीकरणाला प्राधान्य

महिलांसाठीची मनोधैर्य योजना, समुपदेशन केंद्र, महिलांचे संरक्षण अधिनियम यामुळे महिलांना संरक्षण मिळत आहे. तर महिला प्रशिक्षण केंद्रांना साहायक अनुदान, विवाहासाठी अनुदान, माझी कन्या भाग्यश्री, जननी सुरक्षा योजना यासारख्या विविध योजनांमुळे महिला आत्मनिर्भर होत आहेत. मुलींचा जन्मदर वाढविणे, महाराष्ट्र कुपोषणमुक्त करणे यासह महिला सक्षमीकरणासाठी विविध योजनांवर प्राधान्याने लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. मुलींचा जन्मदर वाढवणे आणि स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठी १ एप्रिल २०१६ पासून माझी कन्या भाग्यश्री योजना सुरू करण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या बेटी बचाओ, बेटी पढाओ अभियानाची महाराष्ट्रातील १६ जिल्हयांमध्ये अंमलबजावणी सुरू आहे.

### टास्क फोर्स

महिलांवरील अत्याचाराला आळा घालण्यासाठी, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली टास्क फोर्सची स्थापना करण्यात आली आहे. तसेच महिलांसाठी राज्यात समुपदेशन केंद्रेही कार्यरत करण्यात आली आहेत. बलात्कार, बालकांवरील लैंगिक अत्याचार आणि ॲसिड हल्ला यामध्ये पीडित महिला व बालकांना अर्थसाहाय्य व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी राज्यात मनोधैर्य योजना सुरू आहे. या योजनेतून पीडितांना ५० हजार ते ३ लाख रुपयांपर्यंत अर्थसाहाय्य देण्यात येते. मोठ्या शासकीय कार्यालयांमध्ये स्तनपान कक्ष सुरू करण्यात आले आहेत. पहिल्या टप्प्यात मंत्रालयात या कक्षाची सुरुवात करण्यात आली आहे.

### बालगृह सुरक्षा

राज्यातील बालगृहातील सुरक्षेच्या दृष्टीने सर्व बालगृहांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्यास प्राधान्य देण्यात येणार आहे. बाल सुधारगृहातील मुले व मुली यांच्या कल्याणासाठी कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्यावर भर देण्यात येत आहे. मुलींच्या वसतिगृहांच्या निधीमध्ये दुपटीने वाढ करून सर्व वसतिगृहांना येत्या ३ वर्षात संरक्षण भिंती बांधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### कुपोषणमुक्ती

महाराष्ट्रातील एकही बालक कुपोषित राहणार नाही यासाठी या विभागामार्फत व्यापक उपाययोजना हाती घेण्यात येत आहेत. अंगणवाड्यांमार्फत कुपोषणमुक्तीसाठी ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना तसेच गरोदर माता व स्तनदा मातांना पूरक पोषण आहाराचा पुरवठा केला जात आहे. अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि मिनी अंगणवाडी सेविकांच्या मानधनात वाढ करण्यात आली असून त्यांचे वेतन आता रोखीने न देता ते त्यांच्या बँक खात्यावर थेट जमा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

आगामी काळात महिला व बालविकास विभागामार्फत महिला व बालकांसाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात येणार आहेत. महिलांना समान संधी मिळावी यासाठीचे महिला धोरण आणि बालकांसाठीचे बालक धोरण याद्वारे महिला व बालकांचा सर्वांगीण विकास हेच मध्यवर्ती सूत्र असणार आहे.

**शब्दांकन : वर्षा फडके**
विभागीय संपर्क अधिकारी

# परिवर्तनासाठी सुसज्ज

स्त्री-पुरुष असमानतेची दरी २१८६ पर्यंत भरू शकणार नाही असे जागतिक आर्थिक मंचाचे अनुमान आहे.  हा १७० वर्षांचा काळ फार मोठा आहे. तेवढा काळ वाट बघणे रास्त नाही. म्हणूनच २०१७ च्या आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने 'बी बोल्ड फॉर चेंज' या घोषवाक्यासह स्त्री-पुरुष समानता हा अपेक्षित बदल घडवून आणण्यासाठी आता धीट होण्याची आवश्यकता आहे.

महिलांचे शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय सक्षमीकरण हे वेगाने होत असल्याचा प्रत्यय येत आहे. मात्र, त्याचबरोबर त्यांचे मानसिक, शारीरिक आणि विशेषत: सामाजिक सक्षमीकरण होण्याची नितांत गरज आहे. गेल्या वर्षी, सन २०१६ मध्ये आपण आंतरराष्ट्रीय महिला दिन हा 'स्त्री-पुरुष समानतेसाठी पाऊल टाकू या' अशी प्रतिज्ञा घेऊन साजरा केला. अनेक व्यक्तींनी आणि संस्थांनी या मोहिमेमध्ये पुढाकार घेऊन भरघोस पाठिंबा दिला.



**महिलांचा सहभाग**

महिलांचे सक्षमीकरण आणि स्वावलंबन या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. महिलांचे सक्षमीकरण झाल्याशिवाय त्या स्वावलंबी होऊ शकत नाहीत. त्या स्वावलंबी झाल्या, आपल्या पायावर उभ्या राहिल्या, आपले आणि कुटुंबाचेही निर्णय स्वत: घेऊ लागल्या अनेक क्षेत्रात राज्य शासनाने सोयी-सवलती दिल्या आहेत. मोफत शिक्षण ही शासनाने राबवलेली महिलांच्या प्रगतीसाठीची अत्यंत महत्त्वाची बाब आहे. अनेक सामाजिक संस्थाही निराधार, परित्यक्ता महिलांना आधार देऊन त्यांच्या विकासासाठी कार्य करीत आहेत.

**गौरवास्पद कार्यवाही**

राज्य घटनेच्या ७३ व ७४ व्या कलमामध्ये घटना दुरुस्तीनंतर महाराष्ट्र शासनाने नागरी व ग्रामीण संस्थांमध्ये 33 टक्के आरक्षण महिलांसाठी राबवून अत्यंत गौरवास्पद कामगिरी केली आहे. त्यामुळे आता महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५० टक्के आरक्षण दिले जाण्याची शक्यता आहे. सरकारी नोकऱ्यांमध्ये 30 टक्के आरक्षण महिलांकरिता ठेवले गेले आहे. बहुसंख्य ग्रामपंचायतींच्या सरपंचपदावर महिला असल्याचे चित्र ठळकपणे दिसून येत आहे. गावागावांतल्या सर्वसाधारण कष्टकरी महिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हाव्यात म्हणून, स्वयंसहायता बचतगट स्थापन करण्यात आले आहेत. त्यांना शासनाकडून ० ते ४ टक्के व्याजाने कर्ज उपलब्ध करून दिले जात आहे.

महाराष्ट्रामध्ये अंदाजे २ लाख २५ हजार बचतगट कार्यरत आहेत. स्त्रीविषयक सामाजिक परिवर्तनासाठी त्यासंबंधीचे कायदे जरी शासनाकडून राबवले जात असले तरी सर्वसामान्य समाजघटकांच्या धार्मिक व सामाजिक भूमिकांमध्ये बदल होणे जरुरीचे असते. तो बदल होत असल्याचे प्रत्ययाला येऊ लागले आहे. शासन पातळीवरून महिलांच्या विकासाला प्राधान्य देऊन गती देण्याचे प्रयत्न होत आहेत. तिसरे सुधारित महिला धोरण, फास्ट ट्रॅक न्यायालयांची स्थापना आदी उपक्रम राबवण्यासाठी शासन प्रयत्नशील राहणार असले तरी सर्वसामान्य समाजघटकांच्या धार्मिक आणि सामाजिक भूमिकांमध्ये बदल होणे अत्यंत आवश्यक आहे.

सन १९५२ ते २०१६ पर्यंत जवळपास १५५ महिला आमदारांनी महाराष्ट्राच्या विधिमंडळात उल्लेखनीय कामगिरी बजावलेली आहे. आजची महिला आत्मभानातून आत्मसन्मानापर्यंत पोहोचलेली आहे. भारताचे प्रधानमंत्रीपद स्वर्गीय इंदिरा गांधी तसेच सर्वोच्च राष्ट्रपतीपद श्रीमती प्रतिभाताई पाटील यांनी भूषवले आहे, हे विसरून चालणार नाही. महिलांच्या सक्षमीकरणाचा यापेक्षा आणखी कोणता मोठा पुरावा हवा !

**- भावना चौधरी**
मुख्य प्रशासकीय अधिकारी
आरोग्य सेवा, सार्वजनिक आरोग्य विभाग

# सन्मान आणि समान वागणूक




विनीता सिंघल

सचिव, महिला आणि बालविकास विभाग


महिला या आपल्या समाजाचा एक महत्त्वपूर्ण घटक आहेत. पुरातन काळापासून आजतागायत फक्त कुटुंबाच्याच नव्हे, तर समाजाच्या जडणघडणीत महिलांनी मोठे योगदान दिले आहे. सामाजिक किंवा अन्य काही कारणांमुळे महिलांना अनेक ठिकाणी अजूनही असमान वागणूक मिळते. ही असमानता दूर करून महिलांना समान पातळीवर आणण्यासाठी, शासनातर्फे विविध उपक्रम प्रभावीपणे राबवण्यात येत आहेत.

महिलांवर होणारा अत्याचार, त्यांना मिळणारी असमान वागणूक, त्यांची सुरक्षितता इत्यादींसाठी शासनाने विविध कायदे केले आहेत. पण फक्त कायदे करून बदल होत नसतो, त्यासाठी समाजाचा सहभाग गरजेचा असून, महिला सक्षमीकरणासाठी समाजातील सर्व घटकांनी पुढाकार घेतला पाहिजे. विकास प्रक्रियेत महिलांचा सहभाग आणि त्यांचे योगदान लाभल्याशिवाय सर्वांगीण आणि सर्वसमावेशक विकास होऊ शकत नाही.

पूर्वीच्या काळी सती प्रथेसारख्या काही अनुचित प्रथा होत्या. त्या रोखण्यासाठी त्या वेळी सरकारने कायदे केले. राजा राममोहन रॉय यांच्यासारख्या अनेक समाजसुधारकांनी पुढाकार घेऊन प्रबोधन केले तेव्हाच ही प्रथा बंद होऊ शकली. महिलांचे प्रश्न एवढ्यावरच संपले नाहीत. हुंडा किंवा अन्य काही कारणांमुळे स्त्रीभ्रूणहत्या करण्याचे प्रमाण मध्यंतरी मोठ्या प्रमाणात वाढले होते. पण सरकारने कायदे केल्यामुळे व समाजातील विविध घटकांनीही या कामी मोठी चळवळ उभी केल्याने स्त्रीभ्रूणहत्येसारख्या कुप्रथेला आपण पायबंद घालू शकलो आहोत. पण तरीही या प्रश्नी आपणास कायम जागरूक राहणे गरजेचे आहे. मुलीला आपण जोपर्यंत समान समजत नाही, तोपर्यंत हा प्रश्न मुळासकट संपणे शक्य नाही. सरकारने यासाठी विविध कायदे करण्याबरोबरच 'बेटी बचाओ-बेटी पढाओ', 'माझी कन्या भाग्यश्री' सारख्या योजना हाती घेतल्या आहेत. आता या योजनांचा लाभ घेण्याबरोबरच आपल्या मुलीला सन्मान देणे आणि तिला समान वागणूक देण्याची जबाबदारी प्रत्येक पालकाची आहे.

ग्रामीण भागात आजही काही ठिकाणी मुलांना अगोदर जेवण दिले जाते, मुलींना नंतर जेवण दिले जाते. अनेक घरांमध्ये मुलाला ताजा व सकस आहार दिला जातो. मुलीला बऱ्याच वेळा शिळे अन्न दिले जाते. हा भेदभाव अत्यंत चुकीचा आहे.

पालकांनी पुढाकार घेऊन हा भेदभाव दूर केला पाहिजे. त्याचबरोबर शिक्षणात मुलीला मुलांसारखीच समान संधी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. कारण मुलगी शिकली तर ती संपूर्ण कुटुंबाला शिक्षित करू शकते, ही बाब लक्षात घेण्यासारखी आहे.

**महिला सक्षमीकरण**

महिलांचे सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीने शासनाने बचतगटांची चळवळ मोठ्या प्रमाणात हाती घेतली आहे. आमच्या विभागाच्या अखत्यारित असलेल्या महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत विविध योजना राबवल्या जात आहेत. विविध योजनांमधून महिला बचतगटांना व्यवसाय किंवा लघुउद्योगांसाठी कर्जे उपलब्ध करून दिली जात आहेत. या बाबतीतला आमचा अनुभव फार सकारात्मक व आशादायक आहे. कारण महिला बचतगटांचे कर्जफेडीचे प्रमाण जवळपास ९९ टक्के इतके आहे. त्यामुळे ही एक ऐतिहासिक चळवळ आहे, असे आम्ही मानतो. कर्ज परतफेडीतील महिला बचतगटांचा प्रामाणिकपणा लक्षात घेऊन बँका त्यांना अधिक कर्ज देण्यास तयार



बचतगटाच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम झालेली महिला.

असल्याचे अनेक ठिकाणी दिसते. अनेक महिला बचतगटांनी तर अनेक वेळा कर्जे घेऊन विविध व्यवसाय व लघुउद्योग उभे केले आहेत. या महिला आपल्या कुटुंबाला आधार देण्याबरोबर देशाच्या आर्थिक विकासात महत्त्वाचे योगदान देतात, असे मला वाटते. त्यामुळे अशा कष्टकरी महिलांचा मला नेहमीच अभिमान वाटतो.

### महिला सहभाग वाढवणार

विविध विभागातील योजनांमध्ये महिलांना समान न्याय मिळण्याच्या दृष्टीने शासनाने 'जेंडर बजेटिंग'सारखा महत्त्वाचा विषय हाती घेतला आहे. त्यामुळे राज्यात कोणतीही योजना राबवताना त्यात



महिलांचा सहभाग व त्यांच्या गरजा लक्षात घेतल्या जाणार आहेत. येत्या काळात जेंडर बजेटिंग हा फार महत्त्वाचा विषय ठरेल, असा मला विश्वास आहे. विकासाची धोरणे आखताना त्याची फळे महिलांपर्यंत पोहोचवणे हाच याचा प्रमुख उद्देश आहे.

### पुनर्वसन

राज्यात पीडित महिलांना निवारा उपलब्ध करून देणे तसेच त्यांचे पुनर्वसन करण्याच्या उद्देशाने विविध शेल्टर योजना राबवल्या जात आहेत. महिला संरक्षणगृहे, आधारगृहे, अल्पमुदती निवासगृहे, स्वाधार योजना, उज्ज्वला योजना यांच्या माध्यमातून पीडित महिलांच्या पुनर्वसनावर तसेच समुपदेशनावर भर देण्यात येत आहे. मनोधैर्य योजनेतून बलात्कार पीडित, ॲसिड हल्ल्यात जखमी झालेल्या महिलांना आधार देण्याचा प्रयत्न केला जातो.

महिलांवर होणारा कोणत्याही प्रकारचा अत्याचार हा निषेधार्हच असतो. पण अशा अत्याचारांना बळी पडलेल्या महिलांना मदत देण्याचा तसेच त्यांचे समुपदेशन, पुनर्वसन करण्याचा प्रयत्न या योजनांमधून केला जातो. या योजनांबरोबरच महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी समाजातील विविध घटकांनी संवेदनशीलतेने पुढे येणे गरजेचे आहे.

### कुपोषणमुक्ती

महिला सशक्त असेल तरच ती सशक्त बाळाला जन्म देऊ शकते. कुपोषण रोखण्याच्या दृष्टीने माता सशक्त असणे अत्यंत गरजेचे असते. या दृष्टीने शासनाने बालकाबरोबरच गरोदर माता, स्तनदा माता यांच्या पोषणावरही भर दिला आहे. गरोदर मातांना सकस आहार मिळावा यासाठी आदिवासी भागात भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना राबवली जात आहे. याशिवाय राज्याच्या इतर भागात गरोदर व स्तनदा मातांना टिएचआर (टेक होम रेशन) हा पोषण आहार दिला जात आहे. जन्माला येणारे मूल सशक्त व कुपोषणमुक्त असावे, हाच याचा उद्देश आहे. कुपोषणमुक्तीचा विषय राज्य शासनाने अत्यंत प्राधान्याचा विषय म्हणून हाती घेतला असून, यासाठी विविध योजना राज्यात प्रभावीपणे राबवल्या जात आहेत.

## मुलींच्या सक्षमीकरणासाठी...

**मुलींच्या जन्माला प्रोत्साहन देणे, तिला शिक्षित आणि सक्षम करणे या उद्देशाने राज्य शासनाने 'माझी कन्या भाग्यश्री' ही योजना सुरू केली आहे. याशिवाय राज्यातील १६ जिल्ह्यांमध्ये केंद्र शासनाची 'बेटी बचाओ-बेटी पढाओ' योजना राबवण्यात येत आहे. 'माझी कन्या भाग्यश्री' योजनेचा लाभ अधिकाधिक मुलींना घेता यावा, यासाठी या योजनेमध्ये काही बदल केले आहेत. त्या बदलानंतर ही योजना अधिक गतिमान होऊ शकेल. मुलीच्या जन्मासाठी पालकांना प्रोत्साहन देणे, तिच्या जन्माचे स्वागत करणे, तिला सकस आहार मिळवून देणे व तिच्या शिक्षणासाठी साहाय्य करणे यासारख्या अनेक बाबी या योजनेमध्ये अंतर्भूत आहेत. त्यामुळे राज्यात लिंग गुणोत्तर प्रमाण समान होण्यास साहाय्य होईल. तसेच मुलींना सक्षम करण्याच्या दृष्टीने ही योजना महत्त्वपूर्ण ठरेल.**



# प्रगतीची दशसूत्रे

महिला सक्षमीकरणासाठी शासनातर्फे राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान राबवले जात आहे. या अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी, यासाठी अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम त्यात अंतर्भूत करण्यात आले आहेत. या अनुषंगाने शासनाने दशसूत्री कार्यक्रमाची आखणी केली आहे. महिलांना एकत्र आणणे, त्यांना बचतीची सवय लावणे, स्व-गरजांसाठी निधी उभारणे, ताळेबंद तयार करणे अशा बाबींवर लक्ष केंद्रित करण्यात येत आहे.



केंद्र शासनाने जे वंचित आहेत अशा गोरगरीब जनतेच्या जीवनमानाचा दर्जा उंचवावा त्यासाठी जीवनोन्नती अभियान सुरू केले. त्यानुसार केंद्र शासनाने पंचसूत्री तर राज्य शासनाने दशसूत्री कार्यक्रमाची आखणी केली. महिलांना एकत्र आणणे, त्यांची बैठक घेणे, बचतीची सवय लावणे, स्व-गरजांसाठी निधी उभारणे, ताळेबंद तयार करणे यासह सामाजिक बाबींकडे लक्ष वेधले आहे.

### २५ लाख कुटुंबांना कर्ज

या अभियानांतर्गत राज्यात दीड लाख बचतगट तयार करण्यात आले असून २५ लाख कुटुंबांपर्यंत अभियान पोहोचले आहे. अभियान ४५ लाख कुटुंबापर्यंत पोहोचवण्याचे उद्दिष्ट आहे. महिला बचतगटांना तीन वर्षात अभियानामार्फत १७२ कोटी तर बँक लिंकेज अंतर्गत १५४७ कोटींचे वितरण करण्यात आले आहे. ३६ जिल्ह्यात ५० पैकी ३६ केंद्रित व अकेंद्रित ब्लॉक आहेत.

### ग्रामसंघ, प्रभागसंघ

राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या विविध सखी ग्रामीण भागात जाऊन महिलांना एकत्र करतात. १० महिलांचा बचतगट तयार करण्यात येतो. बचत कशी करावी हे सांगून त्यांना विविध प्रकारच्या उद्योगाचे प्रशिक्षण देण्यात येते. बचतगटाला तीन महिने पूर्ण झाल्यावर १५ हजारांचा फिरता निधी देण्यात येतो.

### कर्ज व्याजाचा परतावा

या अभियानात समाविष्ट असलेल्या बचतगटांना जास्तीत जास्त ७५ हजारांचे कर्ज देता येते. परंतु जर त्या बचतगटाने www.nrlm.gov.in या संकेतस्थळावर बँक लिंकेजमध्ये नोंदणी केली असल्यास त्यांना बँकेकडून मिळालेल्या कर्जाचे व्याज शासन अदा करते. कर्जाची नियमित परतफेड असलेल्या केंद्रित भागातील गटांना ७ टक्के व्याजदराने कर्ज मिळते. अकेंद्रित भागातील बचतगटांना १२.५ टक्के व्याजाने कर्ज मिळते.

### बचतगटांची बाजारपेठ

बचतगटांनी निर्मिती केलेले पदार्थ, वस्तूंची विक्री जिल्हापातळीवर सरस महोत्सव, विभागीय बचतगट मेळावा आणि राज्यस्तरीय 'महालक्ष्मी सरस' महोत्सवात केली जाते.

### ई-मार्केटमुळे अभियान स्मार्ट

राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान स्मार्ट करण्यासाठी उमेद आणि महालक्ष्मी सरसचे फेसबुकवर पेज तयार करण्यात आले. संकेतस्थळावर वेळोवेळी माहिती प्रसिद्ध केली जाते. आगामी काळात ई-मार्केट पोर्टल सुरू करण्यात येणार आहे. ई-मार्केट इंटरनेट प्रणालीवर अवलंबून असल्याने २४ तास खरेदी विक्रीचे व्यवहार सुरू असतील. त्याचा महिला बचतगटांना मोठ्या प्रमाणावर फायदा होईल. त्याचप्रमाणे जिल्हास्तरावर देखील बचतगटांचे रिटेल मार्केट सुरू करण्याचा मानस आहे.

### ॲन्ड्रॉइड ॲप

महालक्ष्मी सरस महोत्सवात सहभागी होणाऱ्या महिला बचतगटांचा माल नागरिकांना वर्षभर हवा असतो. परंतु तो उपलब्ध होऊ शकत नाही. यावर तोडगा काढण्यासाठी या वर्षापासून महालक्ष्मी सरस नावाने ॲन्ड्रॉइड ॲप तयार करण्यात आले आहे. ॲपवर एकदा महिला बचतगटांनी नोंदणी केल्यानंतर ग्राहकांना त्याद्वारे हवे

## स्वत:चा विकास, समाजाचा विकास

आपण जे काम करतो ते मन लावून करावे. कार्यरत असलेल्या पदाला कसे सर्वश्रेष्ठ करता येईल, हे आपल्या हातात असते. महिलांनी घरबसल्या स्वत:च्या विकासासाठी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी प्रयत्न करावे. महिला संघटित झाल्यास समाजातील अनिष्ट गोष्टी दूर करू शकतात. स्वत:चा विकास झाल्यास परिवाराचा, समाजाचा विकास करता येतो, हे महिलांनी लक्षात ठेवावे. एकत्र राहून कार्य केल्यास एकमेकांच्या सुख-दु:खात सामील होता येते.



आर. विमला

तेव्हा घरबसल्या मालाची ऑर्डर देता येते. बचतगटाच्या महिलादेखील निर्मिती केलेला माल कुरिअर खर्च घेऊन घरी पाठवतात. अॅन्ड्रॉइड अॅपमुळे बचतगटांना मोठा फायदा होणार आहे.

### 'एका क्लिक'वर माहिती

राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाविषयी केंद्र शासनाच्या www.nrlm.gov.in तर राज्य शासनाच्या www.umed.in या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध आहे. महालक्ष्मी सरसविषयी

www.mahalaxmisaras.com या संकेतस्थळावर संपूर्ण माहिती उपलब्ध आहे. तसेच जिल्हा ग्रामीण विकास अधिकाऱ्यांकडे व बचतगट सखींकडे माहिती उपलब्ध होऊ शकते. काही अडचण किंवा तक्रार असल्यास ceo.msrlm@umed.in यावर थेट मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे मेल पाठवू शकतात. लवकरच एक हेल्पलाइन क्रमांक देखील कार्यान्वित करण्यात येणार आहे.

### कॅशलेस

नुकत्याच पार पडलेल्या महालक्ष्मी सरस महोत्सवात बहुतांश स्टॉलवर कॅशलेस प्रणालीचा उपयोग करण्यात आला. महिला बचतगटांना पीओएस मशीन पुरवण्यात आले होते. त्यामुळे कॅशलेस व्यवहारांना चालना मिळाली.

बचतगटांनी कॅशलेस प्रणालीचा उपयोग करावा यासाठी त्यांना ई-वालेट, रुपे कार्ड, विविध अॅप याबाबत माहिती देण्यात येत आहे. यासाठी नुकतेच राज्यस्तरीय प्रशिक्षण घेण्यात आले असून ब्लॉक स्तरावर लवकरच प्रशिक्षण घेण्यात येणार आहे. बँक सखींची याकामी मदत घेण्यात येणार आहे.

### पतपुरवठा करणाऱ्या संस्थांकडून सावधान

अलीकडच्या काळात विविध आमिषे दाखवून कर्जपुरवठा करणाऱ्या संस्थांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. त्या संस्था कर्जाचे आमिष दाखवून बक्कळ व्याज वसूल करतात. तसेच काही ठग बचतगटांना कर्ज देणार असल्याचे सांगून महिलांना गंडवितात. त्यामुळे अशा लोकांपासून सावध राहायला हवे. शासकीय बँकेमार्फत कर्ज मिळण्यास उशीर होतो, त्यामुळे थोडा संयम बाळगावा. काहीही संशयास्पद वाटल्यास त्वरित पोलिसांशी संपर्क करावा, असे महिलांना वारंवार सांगण्यात येते.

### कर्ज देण्यास बँकांची टाळाटाळ

अभियानांतर्गत बचतगटांना जास्तीत जास्त ७५ हजारांपर्यंत कर्ज शासन देऊ शकते. ते देखील वारंवार देता येत नाही. १ लाखांपेक्षा अधिकचे कर्ज बँकेमार्फत बचतगटांना देण्यात येत असते. परंतु महाराष्ट्रात काही बँका कर्ज देण्यास टाळाटाळ करतात. त्यामुळे बहुतांश गटांना आपल्या उद्योगाचा विस्तार करता येत नाही. आम्ही बँक प्रतिनिधींची दर तीन महिन्यांनी बैठक घेऊन त्यांना याबाबत मार्गदर्शन करीत असतो. आमच्या प्रयत्नांमुळे येणाऱ्या काळात राज्यात सुरू असलेल्या अभियानाची ओळख देशपातळीवर घेतली जाईल, अशी मला खात्री आहे.



बचतगटांनी तयार केलेल्या वस्तू विक्रीला उत्तम प्रतिसाद.

**शब्दांकन : चेतन वाणी**
आंतरवासिता





# स्वावलंबन व आत्मविश्वास

महिला सक्षमीकरणासाठी शासनाने अनेक योजना कार्यान्वित केल्या आहेत. या योजनांचा लाभ घेऊन शालेय विद्यार्थिनी, तरुणी, नोकरी करणाऱ्या महिला, वयोवृद्ध महिला, गृहिणी आदींना स्वावलंबी व आत्मविश्वासाने जीवन जगण्याची ऊर्मी मिळात आहे.

**मनोधैर्य योजना**

बलात्कार, बालकांवरील लैंगिक अत्याचार, ॲसिड हल्ल्यात बळी पडलेल्या महिला, बालके व त्यांच्या वारसदारांना मदतीसाठी मनोधैर्य योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत पीडित महिला, बालकांना मदत देण्यात येते.

या योजनेंतर्गत बलात्कार व बालकांवरील लैंगिक अत्याचार प्रकरणी किमान २ लाख रुपये व विशेष प्रकरणात कमाल ३ लाख रुपये, ॲसिड हल्ल्यात जखमी झालेल्या महिला व बालकांस त्यांचा चेहरा विद्रूप झाल्यास अथवा कायमचे अपंगत्व आल्यास ३ लाख रुपये, ॲसिड हल्ल्यात इतर जखमा झाल्यास महिला व बालकांस ५० हजार रुपये, पीडित महिला व बालकांना व त्यांच्या वारसदारांना गरजेनुसार निवारा, समुपदेशन, वैद्यकीय मदत, कायदेशीर साहाय्य, व्यवसाय प्रशिक्षण यासारख्या आधार सेवा पुरवून त्यांचे पुनर्वसन केले जाते. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांच्यामार्फत ही मदत केली जाते.

**महिलांसाठी वसतिगृह**

नोकरी करणाऱ्या एकट्या महिला, अविवाहित महिला, विधवा, घटस्फोटित, विभक्त, पती बाहेरगावी असलेल्या महिलांना या योजनेचा लाभ घेता येतो. यासाठी नोकरी करणाऱ्या महिलेचे मासिक उत्पन्न हे १६ हजारापेक्षा जास्त नसावे. यासाठी वसतिगृहाचे अधिक्षक व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याशी संपर्क करावा.



महिला वसतिगृहाचे संग्रहित छायाचित्र

**निर्वाह अनुदान योजना**

ही योजना राज्य पुरस्कृत असून देवदासींसाठी ही योजना राबवली जाते. ४० वर्षावरील देवदासींना या योजनेचा लाभ घेता येते. या योजनेंतर्गत शासनाकडून देवदासींना उदरनिर्वाहाकरिता दरमहा ६०० रुपये निर्वाह अनुदान देण्यात येते. तसेच देवदासी व तिच्या मुलींच्या विवाहासाठी अनुदान योजना राबवली जाते.

जिल्हा परिषद, महानगरपालिका तसेच मान्यताप्राप्त खासगी संस्थेतून इयत्ता १ ली ते १० वीमध्ये शिक्षण घेणाऱ्या देवदासींच्या मुलामुलींच्या शिक्षणासाठी शासनाकडून अनुदान देण्यात येते. याकरिता जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

**व्यक्तिगत साहाय्य**

आर्थिकदृष्ट्या कमकुवत कुटुंबातील निराधार, परित्यक्ता, विधवा महिलांसाठी ही योजना आहे. या योजनेंतर्गत छोटे व्यवसाय सुरू करण्यासाठी शासनाकडून आर्थिक अनुदान देण्यात येते. या अनुदानासाठी संबंधित जिल्ह्याचे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. स्वतःच्या कुटुंबाला आर्थिक हातभार लावण्याच्या हेतूने शासन आर्थिक साहाय्य करते.

खाद्यपदार्थ तयार करून विकणे, मण्यांच्या वस्तू तयार करून विकणे, भाजीपाला विकणे यासारख्या छोट्या व्यवसायासाठी महिलांना अनुदान देण्यात

येते. यासाठी महिलेचे उत्पन्न आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीयांसाठी ठरवून दिल्याप्रमाणे असणे गरजेचे असून, महिलेचे महाराष्ट्रातील वास्तव्य कमीत कमी १५ वर्ष असणे गरजेचे आहे.

**स्वाधार योजना**

निराश्रित महिला, कैदी महिला, नैसर्गिक आपत्तीमुळे निराधार तसेच कुंटणखान्यातून मुक्त केलेल्या, लैंगिक शोषण, हुंडाग्रस्त, एचआयव्हीग्रस्त महिलांना स्वाधार योजनेंतर्गत शासनाकडून अन्न-वस्त्र-निवाऱ्याची मदत केली जाते. यासाठी संबंधित व्यक्तीने जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.




**किशोरी शक्ती योजना**

या योजनेंतर्गत ११ ते १८ वर्षे वयोगटातील किशोरवयीन मुलींचे पोषण व आरोग्यविषयक दर्जा सुधारणे, घरगुती व व्यवसायाभिमुख प्रशिक्षण देऊन त्यांना अर्थाजनासाठी सक्षम बनवणे, आरोग्य पोषण, कुटुंबकल्याण, गृहव्यवस्थापन, बालसंगोपन, व्यक्तिगत आणि परिसर स्वच्छता इत्यादी विषयांचे शिक्षण देऊन त्यांना जागृत करणे, बालविवाहास प्रतिबंध करणे, आर्थिक परिस्थिती सुधारणे, किशोरवयीन मुलींची निर्णय क्षमता वाढवण्याच्या दृष्टिकोनातून अनौपचारिक शिक्षण देण्यासाठी एकात्मिक बालविकास सेवा अंतर्गत शासनाने किशोरी शक्ती योजना सुरू केली आहे.

**राज्यगृहे योजना**

१६ ते ६० वयोगटातील निराश्रित, परित्यक्ता, घटस्फोटित, कुमारीमाता, लैंगिक अत्याचारित, अनैतिक व्यापारात अडकलेल्या महिला स्वेच्छेने, स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने तसेच पोलिसांमार्फत किंवा न्यायालयाच्या आदेशानुसार या योजनेकडून मदत घेऊ शकतात. यासाठी संबंधित व्यक्तींनी राज्यगृहाचे अधिक्षक, संबंधित जिल्ह्याचे महिला व बाल विकास अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

**मातृत्व सहयोग योजना**

एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत गरोदर स्त्रिया आणि स्तनदामाता यांना त्यांच्या गरोदर आणि स्तनपान कालावधीमध्ये बुडीत मजुरीपोटी नुकसान भरपाई म्हणून रोख रक्कम देऊन, त्यांचा आरोग्य व आहाराचा दर्जा सुधारण्यासाठी इंदिरा गांधी मातृत्व सहयोग ही योजना सुरू केली आहे.

– संगीता बिसांद्रे
उपसंपादक, विभागीय संपर्क कक्ष

## ‘माझी कन्या भाग्यश्री’

राज्यातील मुलींचा जन्मदर वाढविणे, त्यांच्या आरोग्याचा दर्जा उंचावणे, त्यांना शिक्षण देणे व बालविवाहास प्रतिबंध करणे या उद्देशाने शासनाने माझी कन्या भाग्यश्री योजना सुरू केली आहे.




योजनेची वैशिष्ट्ये

- माझी कन्या भाग्यश्री योजनेमध्ये ज्या मातेने एकुलत्या एक मुलीनंतर अंतिम कुटुंब नियोजन केले आहे, अशा लाभार्थ्यांना मुलीचा जन्मदिन साजरा करण्यासाठी ५ हजार रुपयांचे साहाय्य.
- मुलगी ५ वर्षे वयाची होईपर्यंत दर्जेदार पोषण आहार देण्यासाठी १0 हजार रुपयांचे साहाय्य.
- मुलीच्या ६ वी ते १२ वी पर्यंतच्या शिक्षणादरम्यान पोषण आहार व इतर खर्चासाठी एकूण २१ हजार रुपये इतका लाभ देणार.
- ज्या मातेला एक मुलगी असून दुसऱ्या मुलीनंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केली आहे, अशा मुलीचा जन्मदिन साजरा करण्यासाठी २ हजार ५०० रुपयांचे साहाय्य.
- दोन्ही मुली ५ वर्षे वयाच्या होईपर्यंत दर्जेदार पोषण आहार देण्यासाठी ५ वर्षासाठी १0 हजार रुपयांचे साहाय्य.
- दोन्ही मुलींना इयत्ता १ ली ते ५ वीपर्यंत पोषण आहार व इतर खर्चासाठी ५ वर्षासाठी १५ हजार रुपयांचे साहाय्य.
- दोन्ही मुलींना इयत्ता ६ वी ते १२ वीपर्यंत पोषण आहार व इतर खर्चासाठी २२ हजार रुपये लाभ देण्यात येणार.
- दारिद्र्यरेषेखालील कुटुंबात जन्मणाऱ्या मुलींसाठी विमा योजना राबवण्यात येणार.
- पहिल्या मुलीनंतर मातेने कुटुंब नियोजन केले असल्यास आजी आजोबांनाही ५ हजार रुपयांपर्यंत सोन्याचे नाणे व प्रमाणपत्र देण्यात येणार.
- ज्या गावामध्ये मुला-मुलींचे लिंग गुणोत्तर प्रमाण एक हजारापेक्षा जास्त असेल अशा प्रत्येक जिल्ह्यातील एका ग्रामपंचायतीला ५ लाखांचे पारितोषिक देणार.
- या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित लाभार्थ्यांनी अंगणवाडी सेविका, बालविकास प्रकल्प अधिकारी, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण), जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

# पाऊल पडते पुढे...

राज्यात मुलींचा जन्मदर १००० मुलांच्या मागे ८९४ इतका आहे. ग्रामीण भागात बचतगटांच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाचे काम प्राधान्यक्रमाने चालू आहे. राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ आणि कुटुंबाच्या पाठिंब्याच्या आधारे यश संपादन करून, आपल्या कुटुंबाची सामाजिक प्रतिष्ठा व आर्थिक प्रगती साध्य करणाऱ्या महाराष्ट्रातील महिलांची यशोगाथा प्रेरणादायी आहे.

### कर्तव्यदक्ष

चौकटीबाहेरचे क्षेत्र निवडून त्यात कर्तृत्व गाजवणाऱ्या महिलांपलैकी एक म्हणजे पुण्याच्या पोलीस आयुक्त रश्मी शुक्ला. महाराष्ट्र राज्य गुप्तवार्ता विभागाच्या प्रमुख म्हणून काम पाहिलेल्या भारतीय पोलीस सेवेतील त्या पहिल्या महिला अधिकारी होत. १९८८ मध्ये भारतीय पोलीस सेवेत त्यांची नियुक्ती झाली. एक शिस्तप्रिय, निष्ठावान व कर्तव्यनिष्ठ महिला अधिकारी म्हणून पोलीस दलात त्यांनी आपली ओळख केली आहे. ३१ मार्च २०१६ पासून त्या पुणे पोलीस आयुक्तपदी कर्तव्य बजावत आहेत. आयुक्तपदाचा कार्यभार स्वीकारल्यापासून आजवर ३१ सराईत धोकादायक गुन्हेगारांवर एमपीडीए कायद्यानुसार कारवाई केली. तर १० गुन्ह्यांतील ७८ आरोपींविरुद्ध मोका कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई केली. त्यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली पुणे पोलिसांनी फरारी असणाऱ्या कुविख्यात गुन्हेगारी टोळीच्या गुन्हेगारांनाही परराज्यातून पकडून जेरबंद केले आहे.



रश्मी शुक्ला

पोलीस आयुक्त, पुणे

पुणे शहरात पोलीस कर्मचाऱ्यांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी 'हितगुज' हा उपक्रम सुरू केला. आयटीयन्स आणि महिलांना तत्काळ पोलिसांची मदत मिळण्यासाठी बडी कॉप हे ॲप्लिकेशन पोलीस आयुक्त कार्यालयाने सुरू केले आहे. रुजू झाल्यापासून त्यांनी आजवर केवळ नऊ महिन्यात २ हजार २४३ सर्वसामान्य नागरिकांची भेट घेऊन, त्यांच्या तक्रारींचे निरसन केले. स्वत:चा मोबाइल क्रमांक जाहीर करून नागरिकांना त्यांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी तो उपलब्ध करून देणाऱ्या त्या पहिल्या महिला पोलीस आयुक्त आहेत. पारपत्र व चारित्र्य पडताळणी करण्यासाठी कर्मचाऱ्यांना टॅबलेट उपलब्ध करून दिल्यामुळे संबंधित कर्मचारी अर्जदाराच्या घरी जाऊन पासपोर्टसाठी चारित्र्य पडताळणी करू शकत आहेत. त्यामुळे पुणेकर नागरिकांची मोठी सोय झाली असून हे काम अधिक जलदपणे होत आहे. श्रीमती शुक्ला यांनी पुणे शहरात प्रथमच ज्येष्ठ नागरिकांसाठी १०९० ही हेल्पलाईन सुरू केली. या उल्लेखनीय कामगिरीमुळे त्यांना सन २००४ मध्ये पोलीस महासंचालक यांचे सन्मानचिन्ह तसेच २००५ मध्ये राष्ट्रपती पोलीस पदक व २०१३ मध्ये प्रशंसनीय सेवेबद्दल पोलीस पदकाने सन्मानित करण्यात आले. त्यामुळे त्या पोलीस दल व सर्वसामान्यांसाठी आदर्श ठरल्या आहेत.

### पापड उद्योगातून यशाची भरारी

सौ. कविता अरुण गारोळे या बुलडाणा शहरात पापड उद्योगातून उद्योजिका बनण्याचा प्रवास करीत आहेत. पाच वर्षांपूर्वी सौ. गारोळे यांनी पापड, शेवया करण्याचा गृहउद्योग सुरू केला. अल्पावधीत त्यांचा 'तेजस्वी पापड' हा ब्रॅण्ड विकसित झाला. बी.एड.पर्यंतचे शिक्षण पूर्ण केलेल्या सौ. गारोळे यांनी नोकरी न करता पापड गृहउद्योग सुरू केला.



कविता गारोळे

उद्योजिका

२०१० मध्ये बँकेचे कर्ज घेऊन छोट्या स्वरूपात व्यवसायाची त्यांनी मुहूर्तमेढ रोवली. पापड उद्योग सुरू करण्यासाठी विजेवर चालणारे रोलर पापड मशीन आणले. त्यानंतर पापडाचे पीठ भिजवण्याचे मशीन व पापडाचे पीठ दळण्याचे मशीन त्यांनी खरेदी करून यंत्रांच्या साहाय्याने पापड गृहउद्योग सुरू केला. पापड वाळवण्यासाठी शेडही तयार केली.

सध्या दिवसाला मशीनद्वारे १ क्विंटल पापड तयार केले जातात. त्यांचा हा गृहउद्योग वर्षातील चार महिने चालतो. प्रतिदिवस ४ हजार रुपये कमाई होते. त्यामुळे वर्षभराची मिळकत फेब्रुवारी, मार्च, एप्रिल व मे महिन्यात त्यांना मिळून जाते. पापड उद्योगावर न थांबता त्या तांदळाचे खिचे, शेवया, सांडोळ्या, खारोड्या, मुगवड्या आदी उन्हाळी उत्पादने घेत आहेत. त्यांनी या उत्पादनाचे विपणन करण्याचे सूत्रही विकसित केले आहे. या उद्योगातून प्राप्त मिळकतीमधून त्या कर्जाचे हप्ते भरत आहेत. या व्यवसायातून केवळ चार महिन्यांची त्यांची मिळकत ५ लाखाच्या जवळपास आहे.

उडीद पापडावरच हा उद्योग अवलंबून नसून टोमॅटो पापड, पालक पापड, मेथी पापड, तिखे पापड, मिरची पापड, नागली पापड, बीट पापड आदी उत्पादने बुलडाण्यातील ग्राहकांना आकर्षित करत आहेत. तेजस्वी गृह उद्योगात पाच महिला काम करत आहेत. त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह याच उद्योगावर चालतो.

### गृहिणी ते उद्योजिका...

सिंदखेड राजा तालुक्यातील

सिंदीसारख्या छोट्या गावातील शेतकरी महिलांना एकत्र करून राष्ट्रमाता जिजाऊ शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन केली. कृषी विभागाच्या आत्मा, महाराष्ट्र कृषी स्पर्धाक्षम प्रकल्प या माध्यमातून श्रीमती खरात यांनी सिंदी गावात धान्य स्वच्छ करणे, डाळ बनवून देणे आदींचा उद्योग उभारला आहे.

श्रीमती खरात यांनी आजूबाजूच्या गावातही महिलांना एकत्रित करून वैभव लक्ष्मी बचत गट स्थापन केला. या बचत गटाला बँकेने ५० हजार रुपयांचे कर्ज दिले. या कर्जाच्या रकमेमधून गावाजवळ त्यांनी बटई पद्धतीने शेती केली. शेतीतून मिळालेल्या उत्पन्नातून बँकेचे कर्ज चुकते केले. नफ्यापोटी मिळालेले ४७ हजार रूपये बँक खात्यात टाकले.

या महिलांचे कार्य बघून कृषी समृद्धी प्रकल्पाच्या माध्यमातून बचत गटाला दाल मिल मिळाली. श्रीमती खरात यांनी महिला बचत गटांचे राष्ट्रमाता जिजाऊ महिला शेतकरी उत्पादन कंपनीत रूपांतर केले. कंपनीत त्या स्वत: अध्यक्ष, १० संचालक व ५०० महिला सदस्य आहेत.



**सुनीता खरात**
उद्योजिका

गावाच्या शेजारी कंपनीने १० गुंठे जमीन खरेदी केली आहे. या जमिनीवर धान्य स्वच्छ करणे, ग्रेडिंग करणे, खत आदी बनवण्याचा उद्योग टाकण्यात आला आहे. सोयाबीन, हरभरा, गहू आदी शेतमाल स्वच्छ करून त्यावर बियाणे प्रक्रिया करण्याचा उद्योग येथे सुरू होणार आहे. हे प्रक्रिया केलेले बियाणे या भागातील शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

### गोल्डन गर्ल

गडचिरोलीची गोल्डन गर्ल ठरलेल्या आणि राष्ट्रीय युवा पुरस्काराने सन्मानित असलेल्या एन्जल विजय देवकुळे. सिकई या मार्शल आर्ट प्रकारात तिने ६ सुवर्णपदके प्राप्त केली आहेत.

सोलापूर येथे २०१५ मध्ये झालेल्या स्पर्धेत ११ वर्षाखालील वयोगटात तिला पहिले सुवर्णपदक प्राप्त झाले. तसेच राज्यस्पर्धेनंतर एका महिनाभरात राष्ट्रीय स्तरावर फेडरेशनतर्फे दुसरे सुवर्णपदक मिळवले. तिचे हे यश जागतिक स्तरापर्यंत पोहोचले आणि सिकाई मार्शल आर्टमधील जगातील सर्वात लहान खेळाडू म्हणून गौरव झाला. २०१६ मध्ये राज्यस्तर आणि पुन्हा राष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदकांची कमाई करीत जगातील सर्वात कमी वयाची मार्शल आर्ट खेळाडू होण्याचा मान सलग दुसऱ्या वर्षीदेखील मिळवला. तिच्या या कामगिरीबद्दल हरयाणाचे राज्यपाल कप्तानसिंग सोळंकी यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. त्यापाठोपाठ नुकत्याच झालेल्या प्रजासत्ताकदिनी राष्ट्रीय युवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



**एन्जल देवकुळे**
गोल्डन गर्ल

### गुंफली स्वावलंबनाची 'विण'

वाशीम येथील चंद्रकला बदर या गत 30 वर्षांपासून महिलांना लोकरीपासून विणकामाचे मोफत प्रशिक्षण देत आहेत. वाशीम शहरासह आजूबाजूच्या ग्रामीण भागातून प्रत्येक वर्षी सुमारे एक ते दीड हजार मुली विणकाम शिकण्यासाठी त्यांच्याकडे येतात.

महिलांना विणकाम करून कपडे व वस्तू बनवण्याचे प्रशिक्षण देताना स्वेटर, थंडीच्या दिवसांत घालवायची टोपी, शाल, लग्नात रुखवतावर ठेवण्यात येणाऱ्या विविध वस्तू, दरवाजाचे तोरण, पडदे, बाहुली, पर्स यासारख्या विविध प्रकारच्या सुमारे ४०० प्रकारच्या वस्तूंचे विणकाम येथे शिकवले जाते.



**चंद्रकला बदर**
व्यावसायिक

## जनसंपर्क सांभाळताना...



**तेजस्वी पाटील**
पोलीस उपनिरीक्षक

तेजस्वी पाटील या पोलीस दलासाठी जनसंपर्क अधिकारी या पदाची जबाबदारी पेलत आहेत. गडचिरोलीत सातत्याने घडणाऱ्या घटनांचे वार्तांकन करून ते वृत्तपत्र प्रतिनिधी आणि इलेक्ट्रॉनिक माध्यम प्रतिनिधीपर्यंत श्रीमती पाटील पोहोचवतात. जनसंपर्काचे काम करताना सर्व प्रकारच्या समाजमाध्यमांचा वापर करतात. सांगलीतील इस्लामपूरसारख्या ठिकाणी शिक्षण घेताना कौटुंबिक गरज म्हणून नोकरी हवी या ध्येयातून पोलीसदलात नोकरीसाठी प्रयत्न केला आणि पहिलीच नियुक्ती गडचिरोलीला मिळाली. विभक्त कुटुंबात आई आणि छोटा भाऊ यांची जबाबदारी सांभाळायची असल्याने बारावीची परीक्षा झाल्यावर नोकरीसाठी प्रयत्न सुरू केले.

पोलीसदलाच्या नोकरीची क्रेझ असल्याने महाविद्यालयीन शिक्षणासोबत पी.एस.आय. परीक्षेची तयारी सुरू केली. २०१२ मध्ये श्रीमती पाटील यांची निवड झाली. इस्लामपूर ते गडचिरोली आणि थेट जनसंपर्क अधिकारी पदाचे काम ही त्यांची वाटचाल इतर युवतींसाठी प्रेरक आणि मार्गदर्शक अशीच आहे.

## शोषित कष्टकरी महिलांचा आवाज...



**नूतन माळवी**
सामाजिक कार्यकर्त्या

१९८८ पासून नूतन माळवी सत्यशोधक समाजाच्या कार्याकडे वळल्या. बाबा आढाव, पन्नालाल खुराणा, नागेश चौधरी यांच्या सहवासामुळे विचारांची बैठक तयार होऊन, कामाची दिशा मिळाल्याचे त्या सांगतात. नूतन माळवी मूळ वर्धा जिल्ह्यातील आहेत. इंग्रजी आणि समाजशास्त्रात एम.फिल करून इंग्रजी विषयाच्या प्राध्यापक म्हणून काम करतानाच, सर्व थरातील महिलांच्या शोषणाविरुद्ध त्या लढा देतात.

वर्धा कृषीउत्पन्न बाजार समितीमधील धान्याची सफाई करणाऱ्या ५० मातेर (मातेर- कृषीउत्पन्न बाजार समितीत धान्याची सफाई करणाऱ्या महिलांसाठी मातेर हा शब्द वापरला जातो.) महिलांना तेथील अडत्यांनी अचानक काढून टाकले. या महिलांना दिवसाचे केवळ दहा रुपये दिले जातात. दिवसाला १० ते १५ पोते धान्याची साफसफाई करून घेतली जाते. या महिलांना अचानक काढून टाकल्यामुळे त्यांचा तुटपुंजा रोजगार हिरावला गेला. या वेळी व्यापारी आणि हमाल संघटना यांच्यासोबत श्रीमती माळवी यांनी नागपूर उच्च न्यायालयात धाव घेतली.

प्राध्यापकी, सामाजिक कार्य आणि घरची जबाबदारी निभावतानाच त्यांचे लेखनकामही सुरू असते. आतापर्यंत त्यांची १४ पुस्तके व कविता संग्रह प्रकाशित झाले आहेत.

विणकाम शिकल्यानंतर या महिलांना स्वस्त दरात लोकर मिळावी, याकरिता श्रीमती बदर यांनी २०१२ पासून लोकर व लोकरीपासून बनलेले कपडे व वस्तू विक्रीचे दुकान सुरू केले आहे. या दुकानाचे वैशिष्ट्य म्हणजे येथे विक्रीस ठेवण्यात येणाऱ्या सर्व लोकरी वस्तू या स्थानिक महिलांनी विणलेल्या असतात. थंडीच्या दिवसांत तसेच लग्न सराईमध्ये येथील वस्तूंना मोठी मागणी असते. लग्नाच्या रुखवंतासाठी लागणाऱ्या विणलेल्या वस्तूंच्या ऑर्डर स्वीकारून त्याप्रमाणे प्रशिक्षित झालेल्या महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याचे काम श्रीमती बदर करत आहेत.

ग्राहकांच्या मागणीनुसार स्थानिक महिलांकडून विणकाम करून घेण्यात येते. यामध्ये केवळ लोकरीची किंमत वगळता उर्वरित सर्व रक्कम विणकाम करणाऱ्या महिलेला देण्यात येते. त्यामुळे हिवाळ्यात तसेच लग्नसराईमध्ये या महिलांना घरबसल्या चांगली कमाई करता येते. दरवर्षी १०० पेक्षा अधिक महिलांना याप्रकारचे काम उपलब्ध करून दिले जात आहे.

### कर्तृत्वाची भरारी सातासमुद्रापलीकडे

गोंदिया जिल्ह्यातील चांदलमेटा गावातील वंदना उईके या आदिवासी महिलेने लाख लागवड ते त्यापासून वस्तूनिर्मितीमध्ये उत्कृष्ट कार्य करून आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक कमावला आहे.

या गावातील शारदा स्वयंसहायता महिला बचतगटाच्या सर्वानुमते अध्यक्ष म्हणून वंदना उईके यांची तर सचिव म्हणून शामकला मरसकोल्हे यांची निवड केली. गावातील बचतगटातील काही महिला घरच्या शेतातील



**वंदना उईके**
लाख उत्पादक

पळस, कुसुमाच्या झाडांवर बीज टाकून लाखेचे उत्पन्न घ्यायच्या. गावात येणाऱ्या लाखेच्या व्यापाऱ्यांना कमी किमतीत लाख विकायच्या. लाख उत्पादनाकडे तेव्हा त्यांचे विशेष लक्ष नव्हते.

वंदना उईके यांच्या नेतृत्वात बचतगटांच्या महिलांनी केलेली लाखशेती व प्रशिक्षणामुळे लाख व्यवसायासाठी लाखमोलाचा विश्वास त्यांच्यात निर्माण झाला. गावापासून जवळ असलेल्या ग्रामपंचायतच्या एक एकर जागेवर सेमीयालताची रोपवाटिका तयार करून १५ हजार झाडे लावली. त्यापैकी ७५० झाडे बचतगटांच्या महिलांनी घरी व शेताच्या बांधावर लावली.

त्यानंतर श्रीमती उईके यांनी लाखेपासून वस्तू तयार करण्याचा संकल्प केला. डिसेंबर २०१५ मध्ये इलाहाबाद येथे गावातील ९ महिलांना सोबत नेले. लाखेपासून विविध प्रकारच्या वस्तू तयार करण्याचे प्रशिक्षण घेतल्यानंतर गावात आल्यावर या महिलांनी लाखेपासून पेपरवेट, पानदान, ज्वेलरीबॉक्स, बांगड्या, पेनस्टॅन्ड, फुलदानी, फ्लॉवरपॉट, अगरबत्तीस्टॅन्ड, हेअरपीन तयार करण्यास सुरुवात केली.

लाख व्यवसायात घेतलेली वंदनाची गरुडझेप तिला इटली देशातील रोमकडे घेऊन गेली. रोम येथे फेब्रुवारी २०१७ दरम्यान आयफॅड या संयुक्त राष्ट्र संघाच्या संस्थेने आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेला उपस्थित राहून लाख लागवड ते उत्पादन प्रक्रिया याचा लेखाजोखा या आंतरराष्ट्रीय परिषदेत मांडला.

### निराधार स्त्रियांना बळ देणाऱ्या माई

आयुष्यात सर्वात संवेदनक्षम कार्य स्वीकारून अभिषण गृहाच्या (रिमांड होम बडनेरा) ऑनररी मॅजिस्ट्रेट म्हणून त्यांनी दीर्घकाळ काम पाहीले. राजस्थान, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश या प्रांतातील शोषित, अत्याचाराला बळी पडलेल्या व वाईट मार्गाकडे खेचल्या गेलेल्या बालिका व स्त्रियांच्या समस्येवर त्यांनी उपाय शोधले.



**चंद्रप्रभाबाई**
निराधारांच्या पालक

१९६० साली ग्रामीण भागातील महिलांसाठी त्यांनी वसतिगृह सुरू केले. तेथे शिवणकाम,

बालक मंदिर, टंकलेखन, अन्नपूर्णा विभाग त्यांनी सुरू केले. १९७० रोजी अमरावती येथील ताराबाई पाध्ये यांच्या मार्गदर्शनात शारदा उद्योग मंदिराच्या सचिव होऊन तेथे अनेक गरजू व निराधार महिलांना जीवनोपयोगी प्रशिक्षण दिले. १९८० मध्ये मायबाई महिला मंडळातील अनेक महिलांचे पुनर्वसन केले. ग्रामीण व शहरी भागातील कष्टकरी महिलांना सकस आहाराची माहिती, बालकांचे संगोपन, गृहउद्योगाचे प्रशिक्षण इतकच नव्हे तर साक्षरतेचे धडेही दिले. धडक हरित पट्ट्यांतर्गत शहरात २५ हजार रोपांची लागवड केली. यादरम्यान सेंद्रिय शेतीचे महत्त्व त्यांनी स्त्रियांना समजावून सांगितले. २०१४ साली स्त्री शक्तीचा जिजामाता पुरस्कार त्यांना मिळाला.

**महिलांना स्वकर्तृत्व दाखवण्याची संधी**

उमरगा तालुक्यामधील 'तुरोरी' या गावच्या पोपटबाई जाधव या त्यांचे पती चंद्रकांत जाधव यांच्यासह रोजगाराच्या शोधात चिंचवड येथे आल्या. पोपटबाई यांचे शिक्षण इयत्ता दुसरीपर्यंत असतानादेखील त्यांनी पती काम करत असलेल्या रबर कंपनीमधील दुचाकी व चारचाकी मधील रबर कंपोनंटचे ब्लेड व कात्रीच्या साह्याने कटिंग (रबर फिनिशिंग) करण्याचे काम घरीबसून सुरू केले. विविध कंपन्यांकडून कामाच्या ऑर्डर्स मिळू लागल्या. यातून त्यांनी बचत करून तसेच जोडधंदा म्हणून फळविक्री करून झोपडीचे परिवर्तन लहानशा घरामध्ये केले. सर्वकाही सुरळीत चालू असताना १९९५ मध्ये त्यांच्या पतीचे अपघाती निधन झाले. मात्र त्यांनी न डगमगता रेडिमेड कपड्यांचा व्यवसाय जोडधंदा म्हणून चालू केला आहे. त्यांच्या या लघुउद्योगाचे काम चिंचवड भागातील दत्त नगर येथील राहत्या घरी 'जाधव एंटरप्राइजेस' या नावाने चालते.



**पोपटबाई जाधव**
उद्योजिका

**'नासा'मध्ये करिष्मा...**

माजी राष्ट्रपती, दिवंगत डॉ. ए पी जे अब्दुल कलाम यांच्या कार्यापासून प्रेरणा घेत बारामतीतील सामान्य कुटुंबात जन्माला येवूनही करिष्मा इनामदारची अमेरिकेतील अंतराळ संशोधन केंद्रात (नासा) शास्त्रज्ञ म्हणून निवड झाली आहे. गेल्या वर्षभरापासून नासात कार्यरत असणाऱ्या पंचविशीतील करिष्माची भरारी थक्क करणारी आहे.

करिष्माचे दहावीपर्यंतचे शिक्षण मराठी माध्यमातून झाले आहे. महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर टॅक्नोलॉजिकल युनिव्हर्सिटीतून तिने इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅण्ड टेलीकम्युनिकेशन या विषयात पदवी संपादन केली. पुढचे शिक्षण तिने फ्रान्स येथे पूर्ण केले. शालेय शिक्षण घेत असताना अंतराळवीर कल्पना चावला यांच्या कार्यापासून करिष्माला प्रेरणा मिळाली.



**करिष्मा इनामदार**
शास्त्रज्ञ

**माणूस–बिबट्यांमधील संघर्षाच्या शांतीदूत**

मानवापासून दूर राहणारा बिबट्या मानवी वस्तीच्या जवळ का येऊ लागला. या ध्यासाने पछाडलेल्या विद्या आत्रेय यांनी यावर संशोधन करण्याचा निर्णय घेतला. वन खाते व स्थानिकांच्या साह्याने त्यांनी परिसरातील बदल व त्याचा बिबट्यांवर झालेला परिणाम यावर नवा प्रकाश टाकला. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना टी. एन. खोशू स्मृती हा पुरस्कार देण्यात आला आहे.



**विद्या आत्रेय**
पर्यावरण रक्षक

वने व पर्यावरण मंत्रालयाने २०११ मध्ये माणूस–बिबट्या संघर्ष टाळण्यासाठी जी राष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्वे घालून दिली आहेत त्यात विद्या आत्रेय यांचा मोलाचा वाटा आहे. विद्या यांनी पुडुचेरी विद्यापीठातून इकॉलॉजी या विषयात पदव्युत्तर पदवी घेऊन, आयोवा विद्यापीठात या विषयाचे प्रगत शिक्षण घेतले आहे. पुण्याचे कटी फाऊंडेशन, सेंटर फॉर वाइल्ड लाइफ स्टडीज व बंगळुरूच्या एशियन नेचर कॉन्झर्वेशन फाऊंडेशन या संस्थेबरोबर त्या काम करतात.

## स्वावलंबी रिक्षाचालक महिला



**शबाना परवीन,** रिक्षाचालक

बडनेरा हा अमरावती शहराजवळील गजबजलेल्या लोकवस्तीचा भाग. रेल्वे स्टेशन असल्यामुळे प्रवाशांची वर्दळ रात्रीपर्यंत ठरलेली. अशा या भागात शबाना परवीन ही महिला उदरनिर्वाहासाठी भाड्याने घेऊन ऑटो चालवते. शबाना परवीन अब्दुल जलील ही पारंपरिक मुस्लीम कुटुंबातील महिला, पती, मुलगी आणि दोन मुले यांच्यासोबत राहते. तिच्या वडलांकडे माहेरी जुना ऑटो होता. शबानाने घरी विषय काढला ऑटो चालवण्याचा व ऑटो परवाना काढला. २०१६ पासून बडनेरा परिसरात शबाना ऑटो चालवायला लागली. बुरख्यातील महिला ऑटो चालवत असल्याचे पाहून बऱ्याच प्रवाशांना आश्चर्य वाटायचे मात्र, काही दिवसानंतर शाळेच्या मुली आणि महिलांनी शबानाच्या ऑटोतून प्रवास करणे सुरू केले. शहरातील स्कूल व्हॅनवर महिला चालक असाव्यात यासाठी शबाना आग्रही असते.

## सामाजिकतेची स्त्री संवेदना

सुचिता बर्वे गेल्या १६ वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात काम करत आहेत. आज ॲक्काव (ॲक्शन फॉर चिल्ड्रेन, वुमेन ॲण्ड ॲग्रिकल्चर वेल्फेअर सोसायटी) संस्थेच्या माध्यमातून सुचिता सोबत तीन ते चार हजार महिला जोडल्या गेल्या आहेत. सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्यासाठी २००७-०८चा राष्ट्रीय युवा पुरस्कार त्यांना मिळाला. ग्राहक संरक्षण मंच, नमो भगवते शिक्षण संस्था, युवा संस्थेसाठी समुपदेशक, नारी प्रबोधन मंचात कार्यक्रम अधिकारी अशा विविध सामाजिक संस्थांतून त्यांनी काम केले आहे. 'घर दोघांचे' या शासन निर्णयांतर्गत घरांच्या नेमप्लेटवर पतीच्या नावासोबत पत्नीचेही नाव असावे, याबाबत स्थानिक तलाठ्यांमार्फत श्रीमती बर्वे यांनी अमरावती जिल्ह्यातील गावागावांत फिरून काम केले. अचलपूर येथे तिच्या संस्थेचे समुपदेशन केंद्र आहे. सध्या स्त्री संवेदना मंचामार्फत स्नेहा या संस्थेद्वारे चालवण्यात येणाऱ्या महिला आरोग्य सेवा प्रकल्पावर त्या लक्ष केंद्रित करून काम करत आहे. २०१५ च्या महिला दिनापासून त्यांनी महिलांसाठी 'स्त्री संवेदनामंच' मासिक सुरू केले आहे.



**सुचिता बर्वे**
सामाजिक कार्यकर्त्या

काप्लान ग्रॅज्युएट पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या संशोधन कार्यासाठी इंग्लंडच्या रूफोर्ड फाऊंडेशन व नॉर्वेचा भारतातील दूतावास यांनी संशोधनासाठी अर्थसाह्यही दिले आहे. आययूसीएन या संस्थेच्या व्याघ्र विशेष गटाच्या त्या सदस्य आहेत. त्यांचे याविषयीचे लेखन www.projectwaghoba.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

### गगनभरारी

पुण्याच्या कॅप्टन अनुप्रिता मगर या कर्तृत्वाचा वेगळा ठसा उमटवला आहे. गेल्या पाच वर्षापासून तुर्कीत तीन हजार प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या ए-३-२० या अवाढव्य एअर बसची ती एकमेव महिला कमर्शिअल पायलट आहे.

इंदापूर तालुक्यातील सुरवड छोट्याशा गावात जन्मलेल्या आणि वडिलांच्या नोकरीनिमित्त पुण्यात वास्तव्याला असणाऱ्या अनुप्रिताचे बीएससी पर्यंतचे शिक्षण झाले. शैक्षणिक पार्श्वभूमी असणाऱ्या कुटुंबात जरी अनुप्रिताचा जन्म झाला असला तरी १९९७ साली मुलींनी पायलट बनण्याचे विचार मध्यवर्गीय कुटुंबाला फारसे झेपणारे नव्हते. ऑस्ट्रेलियातील सिडनीच्या नेवियार इंटरनॅशनल फ्लाईंग कॉलेजची तिने निवड केली व दोन वर्षात कमर्शिअल पायलटचे लायसन्स मिळवले. एअर डेक्कन एअरवेजमध्ये तिने दोन वर्ष नोकरी केली. इस्तंबुल तुर्की एअरलायन्समध्ये पायलट पदासाठी ऑनलाइन नोंदणी केली. तिच्या कामगिरीच्या जोरावर तिची तेथे कमर्शिअल पायलट म्हणून निवड झाली. इस्तंबुलच्या एअरवेजमध्ये येणाऱ्या नव्या उमेदवारांना ती प्रशिक्षणही देते.



**कॅप्टन अनुप्रिता मगर**
वैमानिक

### कोकणची कबड्डीपटू

पाटणा (बिहार) येथे मार्च २०१२ मध्ये भारतीय महिला संघाने कबड्डीचा वर्ल्डकप जिंकला. या संघात रायगडची कन्या अभिलाषा म्हात्रे सहभागी होती.

२००६ मध्ये दक्षिण आफ्रिकेत झालेल्या स्पर्धेत तिने भारताचे प्रतिनिधित्व करून भारताला सुवर्णपदक मिळवून दिले. २००६ ते २०११ याकाळात मध्य रेल्वेच्या संघात खेळताना अनेक वेळा या संघाला प्रथम क्रमांक मिळवून देण्यात तिचा सिंहाचा वाटा होता. २०१४ मध्ये आशियाई खेळांमध्ये खेळताना सुवर्णपदक मिळूवन दिले. कबड्डी स्पर्धेत नेत्रदीपक यश संपादन केले. २०१५ मध्ये तिला अर्जुन पुरस्कार मिळाला. सध्या अभिलाषा नवी मुंबई महानगरपालिकेत क्रीडा अधिकारी म्हणून कार्यरत आहे.



**अभिलाषा म्हात्रे**
कबड्डीपटू

### राष्ट्रीय सेवाकर्मी

अलिबाग येथील तपस्वी गोंधळी हिने शालेय जीवनातच अभ्यासासोबत कराटे या साहसी खेळावर लक्ष केंद्रित केले. २००३ मध्ये सिंगापूर येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय वर्ल्ड सितोरियो कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेत भारताचे नेतृत्वही केले.

तपस्वीची राष्ट्रीय सेवाकर्मी म्हणून अलिबाग तालुक्यासाठी निवड झाली. तरूणांना एकत्र करून अलिबाग येथे प्रिझम सामाजिक संस्थेची स्थापना तिने केली. या संस्थेने रायगड जिल्ह्यात १५० प्रशिक्षकांमार्फत ११ हजार ५०० किशोरवयीन मुलींना तसेच जिल्हा परिषद माहिला व बाल कल्याण विभागाच्या माध्यमातून महिलांसाठी जुडो, कराटे, लाठीकाठी, रोबिक्स योगाचे प्रशिक्षण देण्याचे काम केले आहे.

स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन करण्यासाठी स्पर्धा विश्व अकादमीची स्थापना केली. आदिवासी युवक-युवतींना उत्पन्नांचे स्रोत उपलब्ध व्हावे यासाठी मधुमक्षिका पालन आयोग व प्रिझम संस्थेच्या संयुक्त विद्यमाने मध



**तपस्वी गोंधळी**
कराटे चॅम्पियन

संकलन प्रक्रिया शिबिराचे आयोजन केले.

क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक अशा विविध क्षेत्रात कार्यरत राहून तिने सामाजिक बांधिलकी समजून जे उपक्रम राबवले. याची दखल घेत केंद्र शासनाने २०१५-१६ राष्ट्रीय युवा पुरस्काराने तिला सन्मानित करण्यात आले. २०१३-२०१४ साली राज्य युवा पुरस्कार मिळाला आहे.

### कुस्तीपटू


रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यामधील नवेदर-नवगावची कुस्तीपटू समीक्षा किसन कटोरने कुस्ती क्षेत्रात आपल्या कामगिरीने अनेकांचे लक्ष वेधून घेतले आहे.

समीक्षाचे वडील किसन कटोर हे कुस्तीपटू. वडलांची कुस्तीमधील कामगिरी बघून समीक्षाला सुद्धा कुस्ती खेळाची प्रेरणा मिळाली. मुलीची आवड लक्षात घेता त्यांनी तिच्याकडून कठोर परिश्रम, कडी मेहनत, व्यायाम करवून तिला घडवण्याचे काम केले. समीक्षाचे प्राथमिक शिक्षण अलिबाग येथील आर.सी.एफ. शाळेमध्ये झाले आहे. तसेच तिने बी.ए., बी.पी.एड. केले असून सध्या ती पुण्यात एम.पी.एड. शिकत आहे. कॉमनवेल्थसाठी केंद्र शासनामार्फत पटीयाला येथे तिने शिक्षण पूर्ण केले. तिला खाशाबा जाधव चषक २०१३ व २०१४ साठी पहिले पारितोषिक, पंधराव्या महिला राज्य कुस्ती चॅम्पियन स्पर्धेसाठीचे दुसरे पारितोषिक मिळाले आहे.


**समीक्षा कटोर**
कुस्तीपटू

### समर्थ उद्योजिका

वडलांच्या आकस्मिक निधनानंतर अजिंक्य टायर्स रिट्रेडर्स प्रा.लि.कंपनीत काम करणाऱ्या सायली बबन सोनावणे सासर, माहेर दोन्ही सांभाळून वडलांची कंपनी समर्थपणे सांभाळत आहेत. या कंपनीची वाटचाल तिने समर्थपणे सुरू ठेवली आहे. दहा कामगारांच्या बळावर ती आज पूर्ण क्षमतेने कंपनी चालवते. एका दिवसात आठ ते दहा आणि जास्तीत जास्त पंधरा टायर रिमोल्ड केले जातात. यामध्ये मोठे ट्रॅक्टर, जेसीबी, क्रेन, ट्रक यांच्या बरोबरच छोट्या वाहनांच्या टायर्सचा समावेश आहे.


**सायली सोनावणे**
उद्योजिका

### सीए परीक्षेत देशात प्रथम

देशाच्या अर्थकारणामध्ये सनदी लेखापाल या अभ्यासक्रमाकडे वळणाऱ्यांची संख्या कमी आहे. या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्यांना पुढे अर्थ व करविषयक व्यावसायिक सेवा देता येते. नोव्हेंबर,२०१६ मध्ये सनदी लेखापाल अर्थात चार्टर्ड अकाऊंटंट (इंटरमिजीएट) परीक्षेमध्ये पुण्यातील रेखा घेवरराम सुथार हिने यश मिळवले आहे.


**रेखा सुथार**
सनदी लेखापाल

### पॉवर वुमन

शालेय व महाविद्यालयीन जीवनात उत्कृष्ट पॉवरलिफ्टर असणाऱ्या ज्योतिका पाटेकर यांनी लग्नानंतर म्हणजे तबल २६ वर्षांनी या क्षेत्रात पुन्हा पुनरागमन करीत, महाराष्ट्राचे नेतृत्व केले आहे.

मुलगी वैभवी बरोबर सराव करून जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत पहिली येण्याचा मान मिळवला. मुलीसोबत जळगाव येथील राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत ६३ वजनी गटात २८ स्पर्धकांमध्ये सुवर्ण पदक तर मुलीचा (वैभवी ) चौथा क्रमांक आला. या वेळी ज्योतिका यांनी ६३ किलो वजनी गटात २१७.५ किलोचे वजन उचलले होते. केरळमध्ये झालेल्या स्पर्धेत २१८ किलो वजन उचलण्याचा मान त्यांनी मिळवला होता.


**ज्योतिका पाटेकर**
पॉवरलिफ्टर

## सायकलपटू भगिनी

रायगड जिल्ह्याच्या अलिबाग तालुक्यामधील सासवणे गावातील योगीता व दीपाली शिलधनकर या दोघी भगिनी. योगीताला राज्य शासनाचा सन २०१२-१३ वर्षासाठीचा तर दीपालीला सन २०१३-१४ वर्षासाठीचा शिवछत्रपती पुरस्कार मिळाला आहे. २००७ साली शालेय सायकलिंग स्पर्धेत दिपालीने १७ वर्ष वयोगटामध्ये आणि योगीताने १९ वर्ष वयोगटात पहिल्यांदा राष्ट्रीय पदक जिंकले. त्यानंतर त्यांनी बालेवाडी पुणे येथे प्रशिक्षण घेतले. २००७ ते २०१६ या वर्षात ट्रॅक राष्ट्रीय स्पर्धा तसेच रोड राष्ट्रीय स्पर्धा अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेमध्ये योगीता व दीपाली यांनी बरीच पदके प्राप्त केली आहेत. नुकतेच अहमदाबाद येथे पार पडलेल्या ५० कि.मी. सायकलिंग स्पर्धेत दीपालीला सुवर्णपदक प्राप्त झाले आहे. दोघी भगिनींनी कर्नाटक, पंजाब, अमृतसर, केरळ, गुजरात, मणिपूर, बिहार, झारखंड अशा ठिकाणी वेगवेगळ्या स्पर्धेत सहभाग घेऊन यश प्राप्त केले आहे.


**योगीता शिलधनकर**
सायकलपटू


**दीपाली शिलधनकर**
सायकलपटू

### विशेष मुलांचे बालगृह : एहसास



उर्मिला बल्लाळ यांनी २००६ साली स्वतःच्या घरामध्येच विशेष मुलांसाठी बालगृह सुरू केले. भाड्याची जागा घेऊन २००८ साली वळसे येथे बालगृह सुरू केले. सुरुवातीला ७ विशेष मुलेमुली असणाऱ्या या बालगृहात सध्या ५० मुलेमुली आहेत. बाल कल्याण समितीच्या मार्फत राज्यातून या बालगृहात अशी विशेष मुले येतात. प्रत्येक ८ मुलांसाठी १ विशेष शिक्षक आणि १ काळजीवाहक यांच्या माध्यमातून त्यांना शिक्षण प्रशिक्षण दिले जाते. या मुलांना स्वावलंबी बनवण्याच्या प्रयत्नाबरोबरच त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी या बालगृहात प्रशिक्षण दिले जाते. हे बालगृह विनाअनुदान तत्त्वावर लोकसहकार्यातून चालते.

### ब्रॅण्ड ॲम्बेसिडर

यशस्वी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटनपटू अरुंधती पानतावणे या निवडणूक आयोगाच्या 'ब्रॅन्ड ॲम्बेसिडर' म्हणून नियुक्त झाल्या आहेत. त्यांनी २०१० च्या आशियाई खेळांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले. बहरिन इंटरनॅशनल चॅलेंज २०१२ मध्ये विजेतेपद मिळवले. पोलंड आणि इस्टोनिया येथे उपविजेतेपद पटकावले. त्या राष्ट्रीय खेळ विजेत्या आहेत. राष्ट्रीय स्तरावर बंगलोर, रांची, पंचकुला, हरियाणा येथे विजेतेपद पटकावले आहे. जागतिक रँकिंग स्तरावर ४३ वे स्थान आहे. तर राष्ट्रीय स्तरावर २ रे स्थान आहे



**अरुंधती पानतावणे**
बॅडमिंटनपटू

## महिलांना सक्षम करणारी उद्योगवर्धिनी

महिलांमध्ये आत्मनिर्भरता वाढावी, त्या स्वतःच्या पायावर उभे राहाव्यात, यासाठी सोलापूर येथील श्रीमती चंद्रिका चौहान यांनी महिलांसाठी उद्योगवर्धिनी या संस्थेमार्फत वेगवेगळे उद्योग सुरू करून महिलांना सक्षम बनवले. या संस्थेच्या माध्यमातून सुमारे पाच हजार महिलांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष काम मिळत आहे. संस्थेच्या स्थापनेमध्ये चंद्रिका चौहान, शुभांगी बुवा, मृणालिनी भूमकर, संध्या राजोपाध्ये, मेघा राजोपाध्ये, वासंती साळुंखे, सुलोचना भाकरे, अलका कोरे, जयश्री भोसले, वैष्णवी पवार, उषा लोहिया यांचा पुढाकार आहे. सोलापूरच्या उद्योगवर्धिनीच्या कडक भाकरीने परदेशी बाजारपेठेतही स्थान मिळवले आहे.



**चंद्रिका चौहान**
उद्योजिका

### रोजगार देणारी शेतकरी महिला

राहुरी तालुक्यातील उंबरे येथील श्रीमती अनुसया गोविंद गायकवाड यांना पतीच्या आकस्मिक निधनाने शेती व्यवसायाकडे वळावे लागले. शिक्षण जेमतेम चौथीपर्यंत. शेती व मोलमजुरी करायची नी पोट भरायचे. अनुसयाबाई आणि मुलगा दत्तात्रयने कृषी कार्यालयाकडे संपर्क साधला. पॉलीहाऊस शेती पद्धतीविषयी माहिती घेतली. पाच दिवसाचे पॉलीहाऊस प्रशिक्षण घेतले. फेडरल बँकेकडून ९ लाख रुपयांचे कर्ज घेऊन पॉलीहाऊस उभारले. पहिल्यांदा ढोबळी मिरचीची लागवड केली. सहा महिन्यात ५ लाखाचे उत्पन्न मिळाले. त्यानंतर काकडी लागवडीतून ४ महिन्यात ३ लाखाचे उत्पन्न मिळाले. त्याबरोबरच आता फळभाज्यांची रोपवाटिका सुरू केली आहे. १० तरुणांना स्वयंरोजगार उपलब्ध करून दिला. पॉलीहाऊस मध्ये फळ-भाज्यांची रोपे तयार केली जातात. यामध्ये १० महिलांना रोजगार मिळाला आहे. या रोपवाटीकेतून वर्षाला ५ लाखापर्यंत उत्पन्न मिळते. तसेच आधुनिक पद्धतीने ऊस लागवड कशी करावी याचे प्रशिक्षणही त्यांच्याकडून दिले जाते.



**अनुसया गायकवाड**
यशस्वी शेतकरी

### सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या डॉक्टर

या गेल्या १७ वर्षांपासून वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत आहेत. बी.ए.एम.एस, डी.वाय.ए. या पदवी शिक्षणानंतर पती डॉ. प्रशांत महांडुळे यांच्या समवेत २००० पासून केडगाव (अहमदनगर) येथे वैद्यकीय सेवा देत आहेत. दुर्वांकुर पंचकर्म आणि वंध्यत्व निवारण केंद्राच्या माध्यमातून स्त्रीरोग प्रसूतिशास्त्र व आयुर्वेद तज्ज्ञ म्हणून काम करत असतानाच वंध्यत्व या अवघड विषयावर संशोधन करून, अनेक औषधांची निर्मिती केली आहे.

मीरा मेडिकल फाउंडेशनच्या माध्यमातून समाजातील दुर्बल घटकांसाठी आरोग्य शिबिरे, मोफत उपचार, गर्भसंस्कार शिबिरे, नवजात बालकांच्या संगोपनासाठी मार्गदर्शनपर व्याख्याने आदी आरोग्य सेवांचे आयोजन करतात. गोल्डन बूक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, वर्ल्ड रेकॉर्ड्स इंडिया, जाम वर्ल्ड रेकॉर्ड व वर्ल्ड अमेझिंग रेकॉर्ड या जागतिक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. तसेच नवीन संशोधन म्हणून गर्भिणी प्राश, सखीप्राश, बालप्राश, पॉवरप्राश व गर्भसंस्कार ऑईल या औषधांचे पेटंट रजिस्ट्रेशन झाले आहे.



**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

**'लेक वाचवा तरच आई मिळेल'**

कोल्हापूर जिल्ह्यातील भुयेवाडीच्या यशस्विनी महिला सबलीकरण फाऊंडेशनच्या अध्यक्षा व समाजसेविका राणी बाळासाहेब पाटील यांनी 'लेक वाचवा तरच आई मिळेल', ही प्रबोधनात्मक मोहीम चालवत आहेत.

स्त्रीभ्रूणहत्येचा कलंक पुसून टाकण्यासाठी 'लेक वाचवा' अभियानात महिलांचा सहभाग वाढवून गावोगावी सावित्रीच्या लेकींची फौजच्या फौज उभी केली. उच्च शिक्षण घेऊन मुंबईत नोकरी करणाऱ्या राणी पाटील यांनी ग्रामीण जनतेशी असलेली नाळ अधिक घट्ट करण्याच्या उद्देशाने नोकरीला रामराम ठोकून गावातील महिला आणि बालकांसाठी काम करण्याच्या इच्छेपोटी आजन्म समाजसेवेचे व्रत स्वीकारले.



**राणी पाटील**
सामाजिक कार्यकर्त्या

यशस्विनी महिला सबलीकरण फाऊंडेशनच्या माध्यमातून महिलांसाठी आरोग्य शिबिरे, वृद्ध महिलांसाठी पेन्शन योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी त्या मदत करतात. वृद्ध, विधवा, परित्यक्ता, अपंग महिलांना पेन्शन योजनेचा लाभ मिळवून देवून त्यांच्या जीवनाला उभारी देतात.

भुयेवाडी गावच्या सरपंच असताना महिला आणि बालकांना डोळयासमोर ठेऊन अनेकवीध उपक्रम हाती घेऊन ते यशस्वी केले. महिलांसाठी विविध आरोग्य शिबिरे, प्रशिक्षण वर्ग, चर्चासत्रे, विविध प्रकारच्या स्पर्धांद्वारे त्यांना उभारी देण्याचे काम केले. राज्यभर ५५० हून अधिक व्याख्याने देऊन प्रबोधनाचे परिणामकारक काम केले. त्यांनी कुपोषण मुक्तीसाठी व्यापक कामगिरी करून भुयेवाडी हे गाव सन २०१२ मध्येच कुपोषणमुक्त बनवले.

बचतगटाच्या महिलांच्या उत्पादित मालाला गावातच बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी गावातच आठवडी बाजाराची सुरुवात केली. यामुळे बचत गटातील महिलांच्या उत्पादनाला स्थानिक पातळीवर बाजारपेठ उपलब्ध झाली.

**अभिनव पत्रसंवादातून जाणीवजागृती**

पालक हे पाल्याच्या बालहट्टाला दुर्लक्षित करू शकत नाही. त्यातही ते हट्ट वैधानिक असतील तर ते पुरवावेच लागतात. हेच हेरून नागपूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कादंबरी बलकवडे यांनी



**डॉ. कादंबरी बलकवडे**
मुख्य कार्यकारी अधिकारी, नागपूर जि.प.

शौचालयाबाबत जाणीवजागृतीसाठी पत्रसंवाद हा अभिनव उपक्रम राबवला आहे. जिल्ह्यातील बहुतांश शाळांमध्ये भेट देऊन पत्रसंवादाच्या माध्यमातून अवघ्या वर्षभरात ८२ हजार शौचालये बांधून घेतली आहेत. ३१ मार्च २०१७पूर्वी संपूर्ण जिल्हा हागणदारीमुक्त व निर्मल करण्याचा त्यांचा संकल्प आहे.

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत नागपूर जिल्हा हगणदारीमुक्त करण्याचा श्रीमती बलकवडे यांनी निर्धार केला. गृहभेटीच्या कार्यक्रमाची सुरुवात केली. जिल्हा परिषद तसेच पंचायत समिती व ग्रामपंचायतीच्या सर्व सहकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन ७२ हजार ३२६ कुटुंबांना भेटून घरासोबतच शौचालयाची गरज समजावून सांगितली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार गाव दत्तक योजनेंतर्गत फेटरीची निवड केली. गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेला भेट दिली. वर्गातील २५ ते ३० विद्यार्थ्यांना पोस्टकार्ड देऊन आपण आपल्या शाळा व परिसराबद्दल पत्र लिहून कळवण्यास सांगितले. मुलांनी त्यांना पत्रे पाठवली. श्रीमती बलकवडे यांनीही प्रत्येक पत्राला उत्तर देवून त्यांचा उत्साह वाढविला. याच पत्रव्यवहारामधून ज्या मुलांच्या घरी शौचालय नाही त्यांनी आपल्या वडलांकडे शौचालय बांधण्यासाठी आग्रह करण्यास त्यांनी सुचवले. मग काय चिमुकल्यांची मागणी बहुतांश पालकांनी लगेच अमलात आणत शौचालये बांधली. हा उपक्रम संपूर्ण जिल्ह्यात राबवल्यामुळे गाव व शहरे हगणदारीमुक्तीच्या वाटेवर आहेत.

या उपक्रमासाठी शाळेतील मुलींसाठी 'एक दिवस सीईओ'सोबत हा उपक्रमही सुरू करण्यात आला. या अभिनव पत्रसंवादाच्या उपक्रमामुळे जिल्ह्यातील १० टक्के शौचालयांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. संपूर्ण जिल्हा

## क्रांतीचे प्रेरणास्थळ 'कट्यार'

अकोला जिल्ह्यातील कट्यार गावातील नवरा आणि दीर यांनी बँक व सावकाराचे कर्ज फेडता आले नाही म्हणून आत्महत्या केल्यावर ज्योती देशमुख यांनी अतिशय धिराने उद्भवलेल्या परिस्थितीला तोंड देत शेती कसायला सुरुवात केली. शेतीतले काम शिकून घेतले. पहिल्या वर्षीच शेतात २५ ट्रॉली काळीमाती आणि खत टाकले. पहिल्या वर्षी अडीच लाख रुपयाचे उत्पन्न मिळाले.



**ज्योतीताई देशमुख**
यशस्वी शेतकरी

२०१० मध्ये शासनाने त्यांना अंगणवाडी सेविकेची नोकरी दिली. त्या नोकरी सांभाळून शेती सांभाळतात. शेत नांगरणी, कापूस फवारणी या गोष्टी स्वत: करतात. २०१४ ला त्यांनी शेतात बोअरवेल घेतली. शेतात वीज यायला उशीर होत होता म्हणून डिझेल जनरेटरवर पाणी उपसून कापूस आणि हरभऱ्याचे पीक घेतले. २१ एकर शेती कसायला ट्रॅक्टरसाठी लोकांच्या गयावया करायची पाळी यायची म्हणून स्वत:च ट्रॅक्टर घेऊन चालवणे शिकून घेतले. सध्या संपूर्ण शेतीची मशागत त्या स्वत: करतात.

हागणदारीमुक्त होण्यासाठी आता केवळ १८ हजार शौचालयांची बांधणी होणे गरजेचे आहे. पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर स्वच्छ भारत मिशनांतर्गत ३१ मार्चपर्यंत हे काम पूर्ण करण्यात येणार आहे.

### कर्तव्यदक्ष

ही यशोगाथा आहे एका कर्तव्यदक्ष महिला अधिकाऱ्याची. दिनांक २५ ऑगस्ट २०१५ रोजी उपजिल्हाधिकारी भूसंपादन, मध्यम प्रकल्प क्र. २ या कार्यालयाचा श्रीमती शिल्पा न. करमरकर यांनी पदभार स्वीकारला. या पदावर काम करणे जबाबदारीचे आणि आव्हानात्मक होते. भूसंपादन वाढीव मोबदल्याची जवळपास दहा हजार प्रकरणे, दोन कार्यालयांचे एकत्रीकरण झाल्याने दुप्पट झालेले काम आणि हे काम करण्यासाठी कार्यालयात शासकीय कर्मचारी केवळ एक लिपिक आणि दोन शिपाई मात्र न डगमगता त्यांनी कार्यारंभ केला. फसवणुकीचे प्रकार कमी करण्यासाठी त्यांनी अनेक व्यवहारिक उपाययोजना करून जनसामान्यांना न्याय मिळवून दिला. स्वत:च्या कामावरचा विश्वास, पारदर्शकता यामुळे सामान्य लोकांच्या मनामध्ये शासनाप्रती आदर व विश्वास निर्माण केला. सर्वप्रथम संपूर्ण कार्यालयात सी.सी. टी.व्ही. कॅमेरे बसवले. यामुळे कार्यालयात ये-जा करणाऱ्या सर्वांवर वचक निर्माण झाला. कार्यालयात फिरणारे दलाल, समाजकंटकांना आळा बसला. कार्यालयात कर्मचाऱ्यांना भेटण्याची वेळी दुपारी २.०० ते ५.०० निश्चित केली. कार्यालयातील व्यक्तींची ओळख पटावी याकरिता सर्व कर्मचाऱ्यांना मंगळवार व बुधवार या दिवशी घालण्याकरिता ड्रेस कोड निश्चित केला. यानंतर दुसऱ्या टप्प्यामध्ये कार्यालयात मोबदला घेण्यासाठी येणाऱ्या व्यक्तींची ओळख पटवण्याकरिता काही बदल केले. प्रत्येक व्यक्तीला आधारकार्डची मूळ प्रत तसेच स्वसाक्षांकित झेरॉक्स प्रत सादर करणे बंधनकारक केले. पॅनकार्डही आवश्यक केल्यामुळे या कार्डचा क्रमांक एका सॉफ्टवेअरमध्ये नोंदवला की, त्या क्रमांकाचे नाव संगणकावर दिसू लागते. सदर नाव सादर केलेल्या पॅनकार्डवरील नावाशी जुळले तरच पुढील प्रक्रिया करण्यात येते. त्याचबरोबर मोबदला द्यावयाच्या बँक खात्याचा तपशील व पुरावे यासंदर्भातही त्यांनी महत्त्वपूर्ण सुधारणा घडवून आणल्या.



**शिल्पा करमरकर**
प्रशासकीय अधिकारी

तसेच इतर प्रतिज्ञापत्र, संमतिपत्र इत्यादींकरिता सेतू सुविधा केंद्राचा प्रभावी वापर त्यांनी करून घेतला. प्रतिज्ञा करणारी व्यक्ती स्वत: उपस्थित झाल्याशिवाय सदर प्रतिज्ञापत्र तयार होणार नाही याची काळजी घेतली. यामुळे खोटेपणा व फसवेगिरीस आळा बसला. तसेच शासनाच्या सेतू केंद्राच्या उत्पन्नात वाढ झाली.

त्याचबरोबर भूसंपादन निवाडे पारित करण्याच्या कामातही त्यांनी आपली कर्तबगारी दाखवली. भूधारकांच्या मनात शासनाबद्दल विश्वास वाढला व बेकायदेशीर दलाल, यांना प्रतिबंध केला. या केलेल्या कामामुळे श्रीमती करमरकर यांना प्रचंड समाधान व ओळख मिळाली. जिल्हाधिकारी डॉ. प्रशांत नारनवरे यांनी पाठबळ दिल्यामुळे धाडसी निर्णय, ठामपणे त्यांना घेता आले.

### अपूर्णत्वाकडून पूर्णत्वाकडे

शरीरात जर अपंगत्व असेल तर कुठेतरी आयुष्यातही ते उतरते मात्र, सुवर्णाने या अपूर्णत्वाकडून पूर्णत्वाकडे जायचा निश्चय केला. सुवर्णा मूळची नागपूरची. वयाच्या दुसऱ्या वर्षी तिला पोलिओमुळे ५५ टक्के अपंगत्व आले. लग्नाआधीची सुवर्णा वानखेडे आणि लग्नानंतरची सुवर्णा प्रदीप राज सध्या दिल्ली येथे स्थायिक आहे. नर्सरी ते दहावीपर्यंतचे तिचे शिक्षण नागपूरच्या निवासी वसतिगृहात झाले. नंतर तिने कला शाखेत पदवी, पदव्युत्तर शिक्षण तसेच बीएडचे शिक्षणही पूर्ण केले. लग्नाआधी सुवर्णा थेलिट खेळ खेळायची. लग्नानंतर तिने टेनिस खेळायला सुरुवात केली. देश-विदेशात ती पॅरा-ऑलम्पिकमध्ये टेनिस या खेळात प्रतिनिधित्व करते.

२०१४ मध्ये कोरियातील इनकोहेन येथे झालेल्या एशियन पॅरा क्रीडा स्पर्धेत तिने भाग घेतला. यासह २०१३मध्ये थायलंड येथे पॅरा टेबल टेनिस ओपन स्पर्धेत तिला दोन पदके मिळाली. २०१३ मध्ये चीनच्या बीजिंग येथे झालेल्या प्रादेशिक एशियन टेबल टेनिस चॅम्पनियनशिपमध्येही तिने भाग घेतला होता. २०१० मध्ये कॉमनवेल्थ खेळाच्या स्पर्धेत व्हिलचेअर या गटात तिने टेबल टेनिस स्पर्धेत भाग घेतला होता.

सुवर्णाचा जीवनसाथी प्रदीप राज यांना

## ‘चाकोरी’ बाहेरचे यश

नाशिक जिल्ह्यात त्र्यंबकेश्वर तालुक्यातील चाकोरे गावातील विमल आचारी यांनी त्यांचे पती जगन आचारी यांच्या सहकार्याने शेतीत अनेक अनुकूल बदल घडवून आणीत उत्पन्न वाढवले आहे.



**विमल आचारी**
यशस्वी शेतकरी

कृषी साहाय्यक राजेंद्र काळे यांनी विमल आचारी यांना भाताचे नवे बियाणे वापरण्याबाबत माहिती दिली. कृषी विभागामार्फत अन्नसुरक्षा अभियानांतर्गत अधिक उत्पादन देणारे बियाणे आणि बीज प्रक्रियेसाठी औषधे उपलब्ध करून देण्यात आले. सोबत औषध फवारणीसाठी स्प्रे पंप ५० टक्के अनुदानावर देण्यात आले. त्याचा परिणाम पहिल्याच हंगामात दिसून आला. एकरी १० पोते येणारे उत्पादन दुप्पट होऊन २० पोते झाले.

कृषी विभागाने बांधावर तूर, फळझाडे लागवडीसाठी सहकार्य केले. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामार्फत शेतीची अवजारे, बियाणे, गिरीराज कोंबड्या आदीसाठी सहकार्य करण्यात आले. शेतीला जोडधंद्याची जोड मिळाल्याने उत्पन्नात आणखी भर पडत गेली. समूहशेतीच्या माध्यमातून त्यांनी ऑइल इंजिनची व्यवस्था केली आहे. विमल आचारी यांनी आता मामेसासऱ्यांची सात एकर जमीन बटाईवर घेऊन त्यातही चांगले उत्पादन घेतले आहे.

देखील पोलिओमुळे अपंगत्व आलेले आहे. त्यांनाही क्रीडा क्षेत्राची आवड आहे. सध्या ते परॉ-ऑलम्पिक खेळणाऱ्या खेळाडूंना टेनिस या खेळाचे प्रशिक्षण देतात. सुवर्णा अपंग मुलींच्या हक्कांसाठी लढते आहे. यूनोमध्ये त्यांनी याबाबत प्रतिनिधित्वही केले आहे. २०१४ मध्ये राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते ३ डिसेंबर या 'राष्ट्रीय दिव्यांग दिना'च्या दिवशी तिचा राष्ट्रीय पुरस्काराने सन्मान करण्यात आला.



**सुवर्णा वानखेडे**
टेबल टेनिसपटू

केंद्र शासनाच्या सामजिक न्याय विभागातंर्गत सुगम्य भारत अभियान राबवले जात आहे. नागपूरच्या शासकीय आणि गैरशासकीय इमारतींचे अंकेक्षण सुवर्णाने केले आहे. या इमारती दिव्यांगांसाठी सुगम असाव्यात असा अहवालही तिने सादर केला आहे.

**लढा व्यसनमुक्तीचा...**

राजकारणाचा कसलाही गंध नसणारी एक सामान्य महिला गावातील महिलांचे प्रश्न आणि व्यथा ऐकते, त्यामुळे अस्वस्थ होते आणि त्याविरुद्ध लढण्यासाठी स्वतःच अर्धवट राहिलेले शिक्षण पूर्ण करून सक्रिय राजकारणात उतरते. तिथे भरीव कामगिरी नोंदवत आपल्या कामाची दखल संयुक्त राष्ट्रसंघासारख्या संघटनेला घ्यायला भाग पाडते आणि न्यूयॉर्क येथे भरलेल्या ५० व्या पंचायतराज विषयक परिसंवादात देशाचे प्रतिनिधित्व करत २५० डॉलर्सचे द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावते.

लातूर जिल्ह्यातील वडवळ नागनाथ या गावाच्या सरपंचपद भूषवलेल्या व सध्या ग्रामसदस्य असलेल्या माया सोरटे यांची खरी ओळख म्हणजे 'आंदोलनवाली बाई' अशी आहे. स्वतःच अर्धवट राहिलेले शिक्षण पूर्ण केल्यानंतर मायाताईनी सर्वप्रथम गावात प्रौढ शिक्षणाच्या वर्गात गावातील इतर महिलांना शिकवायला सुरुवात केली, पण केवळ अक्षरओळख पुरेशी नाही, महिलांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम बनावे म्हणून 'स्वयंशिक्षण प्रयोग' या संस्थेच्या मदतीने त्यांनी गावात महिला बचत गटाचे काम सुरू केले. या बचत गटात ५०० महिला सदस्य आहेत. अनेक लोकोपयोगी आणि विधायक कामे आपल्या सरपंचपदाच्या काळात त्यांनी केली.

व्यसनमुक्तीसाठी गावात 'दारूबंदीचा जाहीरनामा' काढला. शासनाच्या कल्याणकारी योजना योग्य लाभार्थींपर्यंत कशा पोहोचतील आणि समाजाच्या शेवटच्या घटकाचा विकास कसा साधता येईल यासाठी कसोशीने प्रयत्न केले.



**माया सोरटे**
माजी सरपंच

**सेंद्रिय शेतीशाळेचे धडे**

किफायतशीर शेतीसाठी सेंद्रिय शेती करा, असा सल्ला महिला कृषी सहायक निर्मला सोनवणे (पोटे) गेल्या अनेक वर्षांपासून शेतकऱ्यांना बांधावर जाऊन देत आहेत. सेंद्रिय शेतीशाळेतून शेतकऱ्यांना प्रबोधन करत आहेत. कोपरगाव तालुक्यात शेतकऱ्यांना थेट शिवारातच सेंद्रिय शेतीचे धडे देणाऱ्या निर्मलाताई शेतकऱ्यांसाठी आधार ठरल्या आहेत. पारनेरमध्ये दहा वर्षापुर्वी त्यांनी सुरू केलेली सेंद्रिय शेतीशाळेची चळवळ आता कोपरगावात विस्तारली आहे.



**निर्मला सोनवणे**
कृषी सहायक

निर्मला सोनवणे यांचे मुळ गाव राहुरी तालुक्यातील निंभेरे. वडलांकडे असताना शेतीची बहुतांश कामे केलेली होती. निर्मलाताई लग्नानंतर राहाता तालुक्यातील साकुरी गावात राहायला आल्या. सासरी शेतीची जबाबदारी त्यांनी खांद्यावर घेतली. पेरणीपासून ते थेट शेतीमालाच्या निर्यातीपर्यंतच्या संपूर्ण जबाबदाऱ्या त्या पार पाडत. माहेरच्या शेतीचा वारसा त्यांनी सासरीही तेवढयाच मेहनतीने जोपासला आहे. दरम्यान प्रवरानगरच्या कृषी महाविद्यालयात कृषी अभ्यासक्रम पूर्ण केला व येथूनच मला शेतीची नवी दिशा मिळाली. पारनेर तालुक्यातील

## व्यसनमुक्तीचा वसा

प्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञ डॉ. अनिता व डॉ. अनिल अवचट या दाम्पत्याने येरवडा मनोरुग्णालय परिसरात मुक्तांगण व्यवसनमुक्ती केंद्र सुरू केले. त्या दरम्यान 'मुक्तांगण मित्र' ही संस्था स्थापन केली.

१९८६ सालापासून 'मुक्तांगण मित्र' संस्थेतर्फे हा उपक्रम अव्याहतपणे चालू आहे. या मुक्तांगण पुनर्वसन केंद्राची क्षमता सुमारे ६० जणांची आहे. मात्र सध्या १८० रुग्ण येथे उपचार घेत आहेत.



**मुक्ता पुणतांबेकर**
सामाजिक कार्यकर्त्या

डॉ. अवचट दांम्पत्याच्या या सामाजिक कार्याचा वसा मुलगी मुक्ता पुणतांबेकर यांनी पुढे चालवला आहे. या संस्थेचे सर्व कामकाज त्या सध्या पाहत आहेत.

संस्थेच्या उपसंचालक म्हणून कामकाज पाहणाऱ्या मुक्ता उच्चशिक्षित असून १९९१ मध्ये फर्ग्युसन कॉलेजातून त्यांनी पदवी अभ्यासक्रम पूर्ण केला. त्यानंतर पुणे विद्यापीठातून क्लिनिकल सायकॉलॉजी या विषयामध्ये एम.ए.चा अभ्यासक्रम पूर्ण केला. १९९३ पासून त्या संस्थेचे कामकाज पाहत आहेत. व्यसनाधीनांच्या त्या खऱ्या अर्थाने 'ताई'आहेत.

देवीभोयरे गावात कृषी सहायक पदाची जबाबदारी मिळाली. रासायनिक खताच्या वापरामुळे शेतकऱ्यांना न परवडणारा खर्च वाचून त्यांना सेंद्रिय व विषमुक्त शेतीमाल पिकवण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन करण्यासाठी १ जुलै २००९ कृषिदिनी देवीभोयरे गावात निर्मला यांनी सेंद्रिय शेतीशाळा सुरू केली. शेतीशाळेचा सुरुवातीच्या काळात खर्चाचा भारही त्यांनी उचलला. आज निर्मलाताई या अनुदानित सेंद्रिय शेतीशाळेत धडे देत आहेत. कोपरगाव तालुक्यातील जेऊरकुंभारी गावात कृषी सहायक याच पदावर बदली झाल्यानंतर या गावात सेंद्रिय शेती गटाची स्थापना केली. जेऊरकुंभारी, डाऊचखुर्द गावात ७५ एकरावर सेंद्रिय शेती बहरते आहे. कांदा, सोयाबीन, गहू व हरभरा या पिकासंदर्भात शाळेत दर मंगळवार व शुक्रवारी मार्गदर्शन केले जाते.

### भाजीविक्रेत्या ते समाजसेविका

महाराष्ट्र शासनाच्या वतीने देण्यात येणारा मराठी भाषा संवर्धन पुरस्काराच्या पहिल्या मानकरी अशी ओळख असलेल्या व अहमदनगर जिल्ह्यातील सावेडी येथील सौ. बेबीताई गायकवाड यांची ही यशकथा. पती अशोक खासगी कंपनीमध्ये कामाला होते. युनियनच्या संपामुळे ७०० कुटुंबे रस्त्यावर आली. त्यामध्ये यांचाही समावेश होता. बेबीताईंनी मुलगा कडेवर आणि डोक्यावर पाटी घेऊन सावेडी येथील प्रोफेसर कॉलनीत भाजीविक्रीचा व्यवसाय केला. वाचनाची त्यांना खूप आवड आहे. दररोज भाजी विक्रीतून ५ रुपये बाजूला ठेवून त्या पुस्तक विकत घेत. माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांचे अग्निपंख या पुस्तकाने त्यांना जगण्याचे बळ दिले. आता त्यांनी खानावळ (मेस) चालवली आहे.



**बेबीताई गायकवाड**
समाजसेविका

२०१२ मध्ये क्रांतिज्योत महिला मंडळाची स्थापना करून अनेक सामाजिक उपक्रम राबवले. त्यातील पहिला आणि महत्त्वाचा उपक्रम वीरपत्नी, विधवा महिलांसाठी संक्रांतीचा हळदी कुंकवाचा कार्यक्रम केला. त्यामध्ये ५०० महिलांनी सहभाग नोंदवला. महिलांचे शोषण थांबवण्यासाठी २०१५ मध्ये स्वयंसिद्धा फाऊंडेशन नावाची संस्था स्थापन केली. महिलांचे प्रश्न सोडवण्यासाठी व महिलांचे पती निधनानंतर एकाकी पडलेल्या महिलांना आधार देण्याचे काम करत आहे. वांबोरी येथील वाड्यावस्तीमध्ये राहणाऱ्या आदिवासी मुलांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारले. त्यांचे समाज प्रबोधनात्मक लेख विविध वर्तमानपत्रातून प्रसिद्ध झालेले आहेत. शासनाचे मुखपत्र लोकराज्य मासिकाची माहिती गावोगांवी पोहोचण्यासाठी त्या लोकराज्य मेळावे घेतात. विविध योजनांची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करतात. विद्यार्थ्यांमध्ये आवांतर वाचनाची गोडी लागावी यासाठी त्या व्याख्याने देतात. अहमदनगर, सोलापूर व पुणे या आकाशवाणी केंद्रावर त्यांच्या मुलाखतीचे कार्यक्रम प्रसारित होत असतात.

### रोपविक्रीतून फुलला संसार

शेती परवडत नाही, असे म्हणणाऱ्यांनी एकदा रायते (ता. संगमनेर) येथील मंगलताईंच्या शेतीला भेट द्यावी. मेहनत, नियोजन व मार्गदर्शन या त्रिसूत्रीतून त्यांनी आठ एकरातील शेती फुलवलीच नाही, तर आर्थिक अडचणींतील संसार थाटात उभा केला. अर्थातच यासाठी शासनाच्या कृषी विभागाची त्यांना भरपूर साथ मिळाली. शेडनेटमध्ये रोपवाटिकेतून वर्षाकाठी ६० लाख रूपयांची उलाढाल होत आहे.

संगमनेर तालुक्यातील रायते नावाचे छोटेशे गाव आहे. शेती हाच गावचा मुख्य व्यवसाय. गावात बहुतांश शेतकरी उस पिकासंह डाळींब, फ्लॉवर, टोमॅटो अशी भाजीपाला पिके घेतात. याच गावात जगन्नाथ

## लेखिका...

सांगली जिल्ह्यातील बत्तीस शिराळा येथे जन्मलेल्या आणि वयाच्या नवव्या वर्षी खेळत असताना बैलगाडी अंगावर पडून मणक्याला गंभीर दुखापत झालेल्या सोनाली नवांगुळ यांच्या कंबरेखालील अवयवांची संवेदनाच नष्ट झाली. वैद्यकीय भाषेत याला पॅराप्लेसिया म्हणतात. सोनाली नवांगुळ गेली २७ वर्षे आपण सामान्य आहोत आणि समाजानं आपलं जगणं, आपलं असणं सामान्यपणेच घेतलं पाहिजे यासाठी संघर्ष करत आहे. या संघर्षाच्या वाटेवर आलेली अनेक आवर्तनं, परिवर्तनं ठामपणे त्यांनी पेलली आणि स्वत:ला एक यशस्वी लेखक, अनुवादक, मुक्त पत्रकार, सूत्रसंचालक आणि मार्गदर्शक या विविध रूपांमध्ये यशस्वीपणे प्रस्थापित केले.



**सोनाली नवांगुळ**
लेखिका

२००७ पासून नवीन आयुष्याला सुरुवात केली. त्यांना आपली बलस्थानं माहीत आहेत. समोरच्या माणसाला समजेल अशा भाषेत बोलणं आणि साध्या सोप्या भाषेत लिहिणं ही त्यांची बलस्थानं आहेत. स्पर्शज्ञान सारख्या ब्रेल पाक्षिकासाठी गेली नऊ वर्षे त्या काम करत आहेत. याबरोबरच दृष्टी या पाक्षिकासाठीही लेखन करत आहेत. रिलायन्स 'दृष्टी' या हिंदी ब्रेल नियतकालिकासाठीही सहा वर्षांहून अधिक काळ लेखन करीत आहेत. प्रथितयश दैनिक व मासिकांमध्ये सातत्याने लेखन करीत आहेत.

ऑस्कर पिस्टोरिअस या धावपटूच्या ब्लिरनर या आत्मकथेचा मराठी अनुवाद त्यांनी केला आहे. त्याची चौथी आवृत्ती प्रकाशित झाली असून हे पुस्तक इयत्ता दहावीच्या इंग्रजी माध्यमांच्या विद्यार्थ्यांकरिता पूरक वाचनात समाविष्ट करण्यात आले आहे. तमिळ लेखिका सलमा यांच्या कांदबरीचा भारतीय लेखिका या मालिकेंतर्गत 'मध्यरात्रीनंतरचे तास' या नावाने अनुवाद केला आहे. 'स्वच्छंद' हे वृत्तपत्रीय सदराचे पुस्तक आणि 'नर्मदा बचाव आंदोलनाचा बुलंद आवाज- मेधा पाटकर' हे चरित्रवजा पुस्तकही प्रकाशित झाले आहे. पुणे येथे २०१४ मध्ये झालेल्या चौथ्या अखिल भारतीय अपंग साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा सन्मानही त्यांना मिळाला आहे.

## सलाम सुजाता

सुजाता कोंडिकिरे ही दोन्ही डोळ्यांनी पूर्ण अंध असून अंधत्वावर मात करीत तिने अत्यंत जिद्दीने बँकिंगची परीक्षा दिली व प्रोबेशनरी ऑफिसर झाली. स्टेट बँक ऑफ म्हैसूरच्या डोंबिवली शाखेत ती गेल्या ३ महिन्यांपासून रुजू झाली आहे. सुजाता ही अंबरनाथ पश्चिमेकडील मातोश्री नगरमध्ये राहते. २०१२ पासून तिने विविध बँकेच्या २६ परीक्षा दिल्या असून त्यातील १३ परीक्षांमध्ये ती उत्तीर्ण झाली आहे.

वडील बाळासाहेब नोकरीसाठी सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील शिंगणापूर हे मूळ गाव सोडून अंबरनाथला आले आणि येथे स्थायिक झाले. त्यांनी आपल्या प्रीती आणि ज्योती या मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य दिले. यामुळे प्रीती वीज मंडळात संगणक चालक आहे, तर ज्योती एसटी महामंडळात वाहक म्हणून काम करते. मुलगा प्रवीण आय.टी.आय.मधून एसी मेकॅनिकचा अभ्यासक्रम करून दुबईत चांगली नोकरी करत आहे.

बँकेत काम करतानासुद्धा सुजाता अधिकाधिक स्वावलंबी राहण्याचा प्रयत्न करते. अंधांसाठी असलेले सॉफ्टवेअर अजून बँकेत आलेले नाही. त्यामुळे सुजाता सध्या ग्राहक मित्र म्हणून काम करते. तिच्या बरोबर निवड झालेल्या अन्य ६ अंध व्यक्तीही देशाच्या विविध शहरांमधील बँकांमध्ये सध्या अशाच स्वरूपाचे काम करतात. एकदा पहाटे फिरायला जाताना अंधारात मोठे झाड लागले आणि क्षणार्धात सुजाताच्या डोळ्यापुढे अंधार पसरला. त्या धक्क्याने तिची दृष्टी गेली.पण तरीही सुजाताने बीए अर्थशास्त्र ही पदवी मिळवली. मुंबईतील वरळी येथील नॅशनल स्कूल फॉर ब्लाईंड या संस्थेत ती ब्रेल लिपी शिकली. शिवाय संगणकाचे अंधासाठी असलेले जॉर्ज सॉफ्टवेअर तिने आत्मसात केले. तीन वर्षे वेगवेगळ्या परीक्षा दिल्या. महाराष्ट्रातून निवडली गेलेली आणि मुलगी असलेली सुजाता एकमेव आहे.

**– देवेंद्र भुजबळ, संचालक (वृत्त)**

शिवराम शिंदे यांची आठ एकर शेती आहे. बारावीपर्यंत शिक्षण झालेल्या मंगलाताईंनी गृहिणी म्हणून जबाबदारीसोबतच पूर्णवेळ शेती करण्याचा निर्णय घेतला. शेतीत नवीन काही तरी करू, या जिद्दीने कमी क्षेत्रात अधिकाधिक उत्पन्न देणाऱ्या पिकाचा शोध घेताना रोपवाटिका हा नवीन पर्याय त्यांना मिळाला. शेडनेट उभारण्याचा घेतलेला निर्णयही फेब्रुवारी २०११ ला कृतीत उतरवला.

शेती हायटेक पद्धतीने करण्याचा निर्णय कृतीत उतरविताना असंख्य आव्हानांना तोंड देत मंगलताई व त्यांचे पती जगन्नाथ शिंदे यांनी फेब्रुवारी २०११ मध्ये अवघ्या १० गुंठे क्षेत्रात शेडनेटची उभारणी केली. १० गुंठ्यातील यशानंतर विस्ताराचा निर्णय घेतला आणि तब्बल एक एकरावर आज रोपवाटिकेसाठी



**मंगलताई शिंदे**
यशस्वी शेतकरी

सुसज्ज पॉलीहाऊस उभे आहे. पॉलीहाऊस उभारणी करताना १० एमएमचे पाईप वापरण्यात आले. प्रत्येक पोल जमिनीत खाली २ फुट गाडण्यात आला. ५० टक्केची अल्ट्राव्हायलेट नेट वापरली. अत्यंत सुसज्ज अशा पॉलीहाऊसमध्ये व्यवस्थापनही तेवढेच काटेकोर असल्याने रोपांची गुणवत्ता टिकून आहे.

पॉलीहाऊसमध्ये बीजरोपण हंगामानुसार लागवड करण्यात येते. जानेवारी महिन्यात उन्हाळी, मे महिन्यात पावसाळी तर ऑक्टोबर महिन्यात हिवाळी हंगाम असतो, यानुसार बीजरोपण केले जाते. २० ते २५ दिवसात रोप लागवड योग्य तयार होते व थेट त्याची विक्री करण्यात येते.

योग्य मार्गदर्शन, अथक मेहनत आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेतीतील उत्पन्नात कमालीची वाढ केली आहे. पॉलीहाऊसमध्ये भाजीपाला रोपवाटिका उभारून इतर महिलांना त्यांनी रोजगार दिला आहे. वर्षभर पॉलीहाऊसमध्ये १० ते १२ महिलांना रोजगार दिला जातो

मंगलताई व जगन्नाथ शिंदे यांनी शेडनेट उभारले त्यावेळी एक लाख रोपे बसतील एवढी क्षमता होती, नंतरच्या काळात रोपांची वाढती मागणी लक्षात घेत विस्तार केला. आज तब्बल १२ लाख रोपे बसतील एवढ्या क्षमतेचे पॉलीहाऊस आहे. टोमॅटो, कलिंगड, खरबुज, मिरची, वांगी, ऊस व झेंडूची रोपे मिळतात. एक ते दोन रूपये प्रति रोपाप्रमाणे रोपांची विक्री होते, यातून वर्षाकाठी तब्बल ६० लाख रूपयांची उलाढाल होते. पत्नीकडे शेती व्यवस्थापनाची जबाबदारी देणारे जगन्नाथराव शिंदे कृषी पदवीधर आहेत. आपल्या शेतीक्षेत्रातील अभ्यासातून शेतीत विशेष करून रोपवाटिकेतील रोपांच्या विक्रीसह शेतीमालाच्या विक्रीची जबाबदारी स्वतकडे ठेवली आहे. रोपवाटिकेतून वर्षभर रोपांची विक्री करून त्यांनी आपला व्यवसाय फायद्याचा केला आहे.

१० गुंठ्यापासून सुरुवात केलेल्या शिंदे यांना शेडनेट विस्तारात राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाचा लाभ मिळाला. या माध्यमातून 30 गुंठे शेडनेटची उभारणी त्यांनी केली असून रोपविक्रीचा व्यवसाय वाढवला आहे.

**– प्रशांत दैठणकर, डॉ. राजू पाटोदकर, राजेंद्र सरग, अनिल गडेकर, डॉ. किरण मोघे, विवेक खडसे, प्रशांत सातपुते, युवराज पाटील, मनीषा सावळे, मनोज सानप, वर्षा पाटोळे, विष्णू काकडे, वृषाली पाटील, शैलजा दांदळे, एस.आर.माने, निलेश तायडे, तानाजी घोलप, पल्लवी धारव, संग्राम इंगळे, एकनाथ पोवार, जयंत कर्पे, अपर्णा डांगोरे–यावलकर, अंजू निमसरकर–कांबळे, गणेश फुंदे, सुगतकुमार जोगदंड, हिरामण भोईर, अरुण नलावडे, अजित बायस व टीम लोकराज्य**



**महालक्ष्मी सरस प्रदर्शनातील बचतगटांच्या विविध स्टॉलवरील ग्राहकांची रेलचेल.**

# आम्ही 'सरस'....

मुंबईस्थित बांद्रा रिक्लमेशन मैदानावर ग्रामविकास विभागामार्फत आयोजित महालक्ष्मी सरस या प्रदर्शनात महिला सर्वच क्षेत्रात कशा सरस झाल्या आहेत याचा प्रत्यय आला. बचत गट, लघुउद्योग, गृहउद्योग, विविध कौशल्ये, कलाकुसर आदींच्या माध्यमातून महिला सक्षम आणि स्वावलंबी झाल्या आहेत. अनेक महिलांनी असंख्य अडचणींचा सामना करून संसाराच्या चाकाला गती दिली आहे. अशा यशस्वी महिलांची ही यशोगाथा...

### 'सप्तश्रृंगी' महिलांचा निर्धार

पुरेसे पोषक वातावरण नसतानाही अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील राजूर गावात २००८ मध्ये स्थापन झालेल्या सप्तशृंगी महिला बचतगटाने उत्तुंग भरारी घेत स्वतःची ओळख निर्माण केली आहे. मीनल म्हस्के यांच्या गटाचा स्टॉल महालक्ष्मी सरसमध्ये लक्ष वेधून घेत होता. बचतगट स्थापनेच्या वेळी सुरुवातीला कुटुंबीयांनी विरोध केला. मात्र खचून न जाता बचतगट आपल्या फायद्याचाच असल्याने सप्तशृंगी महिला बचतगटातील सर्व सदस्यांनी कंबर कसली.

सुरुवातीला २०१० मध्ये २५ हजारांचे सवलतीचे कर्ज घेऊन शेळीपालन सुरू केले. त्याची परतफेड करून पुन्हा नव्याने कर्ज घेऊन स्वतःचा गृहोद्योग उभारला. नाचणी, मोड आलेल्या कडधान्याची बिस्किटे, गावरान गायीचे तूप, रोस्टेड गहू, चिवडा, हातसडीचा तांदूळ, आवळा कँडी, ब्राऊन राइस तयार करून विक्री सुरू केली. आता राज्यभरात होणाऱ्या विविध महोत्सवात बचतगटाच्या मालाची विक्री केली जाते. बचतगटाचे कार्य पाहून २०१० मध्ये जळगाव येथे आयोजित महोत्सवात राजमाता जिजाऊ पुरस्काराने बचतगटाला सन्मानित करण्यात आले. सर्व

महिलांनी यशदा पुणे येथे गृहोद्योगाचे प्रशिक्षण घेतले. खादी ग्रामोद्योगमार्फत एक लाखाचे कर्ज मिळवले. स्वतःचा व्यवसाय आणखी वाढविला. बचतगटाची मासिक उलाढाल ८० ते ९० हजारांची आहे.

### दागिन्यांचा बंजारा पॅटर्न

२००५ मध्ये बंजारा समाजाचा पहिला बचतगट नांदूरगाव येथे सुरू झाला. महालक्ष्मी सरसच्या माध्यमातून बबिता पवार यांना त्यांच्या बचतगटाचा स्टॉल मुंबईत लावण्याची संधी मिळाली. किल्लारी परिसरात बंजारा समुदायाची मोठी वस्ती होती. १९९३ च्या भूकंपाने सर्व होत्याचे नव्हते झाले होते. त्यानंतर दिल्लीच्या एका संस्थेने गावाला भेट दिली. एका फॅशन डिझायनरने बंजारा समाजातील दागदागिने, पेहराव, कलाकुसर हेरली. ही कलाकुसर दिल्ली येथील फॅशन शोपर्यंत पाहोचली. बरीच वर्षे लोटल्यानंतर बबिता बालाजी पवार यांनी लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यात असलेल्या नांदूरगावमध्ये २००५ ला पहिला बचतगट स्थापन केला. १० महिलांनी २५ हजारांचे कर्ज घेतले. ते फेडून बबिता पवार यांनी समाजातील सर्व महिलांना एकत्र करून २ लाखांचे कर्ज मिळवले. बंजारा हस्तकलेचे प्रशिक्षण घेतले. बबिता यांनी बंजारा समुदायात वापरले जाणारे दागिने, जुनी नाणी यांच्या साहाय्याने काही नवीन दागिने तयार केले. बंजारा समुदायात वापरण्यात येणारी वस्त्रे, पर्स, ओढणी, लहान पर्स अशा वस्तूंची निर्मिती करून विक्री करण्यास सुरुवात केली. बबिता पवार यांनी कुटुंबीयांच्या मदतीने आज जवळपास २०० महिलांना बंजारा दागिने, कलाकृती तयार करण्याचे प्रशिक्षण दिले. आत्मर्निभर करण्यासाठी स्वतःच्या बचतगटाशी संलग्नित उपगट तयार केले. बंजारा समुदायातील


सप्तश्रृंगी बचतगटाच्या महिला विक्री करताना

## हक्काचे व्यासपीठ 'महालक्ष्मी सरस'

मुंबईतील बांद्रा परिसरात जानेवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात भरलेल्या महालक्ष्मी सरस महोत्सवात पाऊल ठेवताच मनमोहक कारंजांनी लक्ष वेधले. महोत्सवाच्या एका कोपऱ्याकडून येत असलेला खमंग वास, नजरेसमोर असलेली गर्दी, हस्तकलेतून बनवलेल्या वस्तू, कलात्मकतेतून निर्मित विविध वस्त्रे, वस्तू. देशाच्या कान्याकोपऱ्यांतील संस्कृती आणि कला एकाच छताखाली मांडणारा महोत्सव म्हणजे महालक्ष्मी सरस.

गेल्या १३ वर्षांपासून भरवण्यात येत असलेल्या महालक्ष्मी सरसचा उद्देश राज्यातील ग्रामीण भागातील महिला स्वयंसाहाय्यता गट, कारागीर यांच्या वस्तूंचे प्रदर्शन व विक्रीसाठी एक बाजारपेठ मिळवून देण्याचा असतो. केंद्र शासन व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने २०१७ चे महालक्ष्मी सरस प्रदर्शन ११ ते २३ जानेवारी २०१७ या कालावधीत पार पडले. महालक्ष्मी सरसमध्ये सामील होण्यासाठी केवळ महाराष्ट्रातील नव्हे तर देशभरातील हजारो बचतगट मुंबईत येतात. मराठी, हिंदी, इंग्रजीसह, कोकणी, अहिराणी, मराठवाडी, नागपुरी महाराष्ट्रीयीन भाषा तसेच ओडीशी, पंजाबी, आसामी, गुजराथी, कन्नडी, तमिळ अशा विविध भाषांचा मेळा याठिकाणी भरतो.

महालक्ष्मी सरसमध्ये फिरताना सुरुवातीलाच इतर राज्यातील स्टाल आपले लक्ष वेधतात. हस्तकलेच्या विविध वस्तू नजरेला भिडतात. कापडी चटई, गालिचा, बांबूच्या वस्तू, रेशमी, सुती कपडे सर्वांना हवेहवेसे वाटतात. महालक्ष्मी सरस हे देशातील एक मोठे प्रदर्शन म्हणून ओळखले जाते. मागील काही वर्षात महाराष्ट्र राज्याव्यतिरिक्त २७ राज्यातील स्वयंसाहाय्यता गट या प्रदर्शनात सहभागी झाले. १२ दिवसात या ठिकाणी तब्बल ८ ते १० कोटींची उलाढाल होत असते.

या महोत्सवाला दररोज अंदाजे २० हजारांपेक्षा जास्त नागरिकांनी भेट दिली. कॅशलेस इंडियाकडे वाटचाल सुरू असल्याने बहुतांश स्टॉलवर कॅशलेस पद्धतीचा वापर करण्यात आला. महालक्ष्मी सरसमध्ये प्रवेश करताच समोर दिसणाऱ्या लोकराज्य मासिकाच्या स्टॉलला नागरिक आवर्जून भेट देत होते. महालक्ष्मी सरसमध्ये खाद्यपदार्थांचे १७० स्टॉल, लागलीच नाशवंत नसलेल्या खाद्यपदार्थांचे ७५, दागदागिन्यांचे ११०, कापड ९५, हस्तकलाकृती ११५ तर इतर ८ स्टॉलवर अनेक बचतगटांनी आपल्या उद्योगाकडून निर्मित वस्तू प्रदर्शन आणि विक्रीसाठी ठेवल्या होत्या. महालक्ष्मी सरसची सर्व माहिती www.mahalaxmisaras.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. महालक्ष्मी सरसमध्ये मांडल्या जाणाऱ्या सर्व वस्तू आणि पदार्थ नागरिकांना वर्षभर उपलब्ध व्हावे, यासाठी लवकरच एक ॲप गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

महिलांनी गोळा केलेली जुनी नाणी, दागिने व इतर वस्तू विक्रीतून या वर्षी त्यांनी ४ लाखांची विक्रमी कमाई केली आहे. अशिक्षितपणामुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागत असतानादेखील बंजारा समाजाची उत्तुंग वाटचाल सुरू आहे. औरंगाबाद, बीड, पुणे, मुंबई याठिकाणी ऑर्डरप्रमाणे माल पाठवण्यात येतो.

### विक्रमगडची 'वारली आर्ट'

पालघर जवळील विक्रमगडच्या महिलांनी एकत्र येवून बचतगटाच्या माध्यमातून वारली कला जोपासली आहे. पालघर जिल्ह्यातील विक्रमगड गावातील महिला, घरीच छंद जोपासण्यासाठी विविध वस्तूंवर वारली कला रेखाटत होत्या. हळूहळू महिलांनी त्या वस्तू तयार करून व्यवसाय करण्यास सुरुवात केली. वर्षभरापूर्वी गावातील १० महिलांनी एकत्र येऊन आपला घरगुती उद्योग जिल्हापातळीवर नेण्याचा निर्धार केला. सर्व महिलांनी वारली आर्ट नावाने राजश्री रडे यांच्या अध्यक्षतेखाली बचतगट स्थापन केला.

बचतगटातील महिलांनी आपली कला आणखी चांगल्या प्रकारे जोपासली जावी म्हणून प्रशिक्षण घेतले. त्यानंतर वारली चित्रकला रेखाटलेले टी पोस्टर, पेन स्टॅण्ड, ज्वेलरी बॉक्स, लेटर बॉक्स, पेंटिंग, पिंपळाच्या पानावर रेखाटलेली देवदेवता आणि महापुरुषांची चित्रे तयार करण्यास सुरुवात केली. गेल्या सहा महिन्यात तयार करण्यात आलेल्या जवळपास ७० हजार रुपये किंमतीचा माल 'वारली आर्ट'च्या स्टॉलवर महालक्ष्मी सरसमध्ये विक्रीस ठेवण्यात आला होता. संपूर्ण महोत्सवात जवळपास ३० ते ४० हजारांच्या मालाची विक्री झाल्याने या गटातील महिलांना आर्थिक बळ मिळाले आहे.



महिला बचतगटमार्फत निर्मित कपडे.

### सह महिने शेती – सहा महिने बांबूकाम

रायगड जिल्ह्यातील कर्जत परिसरात बांबूची झाडे मोठ्या प्रमाणावर आढळतात. एरव्ही कोणीही याकडे फारसे लक्ष देत नाही. परंतु स्वावलंबी स्वयंसाहाय्यता बचतगटाच्या महिलांनी बांबूच्या वस्तू तयार करून स्वतःच्या संसाराला हातभार लावण्यास सुरुवात केली. वर्षातील सहा महिने शेती आणि सहा महिने बचतगटाचे काम असा त्यांचा क्रम असतो.

वर्षातील सहा महिने शेती केल्यानंतर नंतरची सहा महिने फारसे काम नसते. या काळात काय करावे असा प्रश्न महिलांसमोर उभा राहत होता. कुटुंबीयांनी पाठबळ दिल्याने बेबी भरत थोराड यांनी १० महिलांना सोबत घेत २०१५ मध्ये स्वावलंबी स्वयंसाहाय्यता बचतगट सुरू केला. परिसरात असलेल्या बांबूच्या झाडापासून या महिला शोभेच्या वस्तू बनवतात. बांबूपासून तयार केलेली फूल परडी, शो पीस, मोबाइल स्टॅण्ड, टोपली, सुपे, केसांची क्लिप, शिट्टी, काडीची फुले

## ताडहातगावची घोंगडी सातासमुद्रापार

घोंगडी तशी सर्वांच्याच परिचयाची. मेंढीच्या केसांपासून तयार केलेले वस्त्र धनगर समाजात फार पूर्वीपासून वापरण्यात येते. अलीकडच्या काळात घोंगडीचे शरीराला होणारे फायदे नागरिकांना पटू लागले आहेत. जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यात असलेल्या ताडहातगावच्या अहिल्यादेवी स्वयं साहाय्यता बचतगटाने पुढाकार घेऊन घोंगडी निर्मिती करण्यास सुरुवात केली. आता ही घोंगडी सातासमुद्रापार जाऊन पोहोचली आहे. लोकर हिवाळ्यात उबदार तर उन्हाळ्यात थंड असल्याने पाठीच्या, मणक्याच्या आणि कंबरेच्या त्रासापासून आराम मिळवण्यासाठी मेंढीच्या केसांची घोंगडी, गादी वापरली जाते. ताडहातगावचे दत्ता साळके यांची पत्नी शीतल, अध्यक्ष जमुना लहुनेर तसेच गावातील महिलांच्या साहाय्याने २००६ मध्ये अहिल्यादेवी स्वयंसाहाय्यता बचतगटाची स्थापना केली.



सुरुवातीला छोट्या प्रमाणात त्यांनी चरख्यावर लोकरी सूत कातण्यास प्रारंभ केला. हळूहळू उद्योग वाढत असताना १० लाखांचे कर्ज घेत घोंगडी निर्मिती व विक्री उद्योग सुरू केला. आज बचतगटाच्या माध्यमातून मेंढीच्या केसांपासून निर्मित आसन पट्टी, योगासन पट्टी, टोपी, उशी, गादी, योगामट पट्टी, गोधडी, रजई, झोपण्याची लादी तयार करून त्याची विक्री केली जाते. मेंढीच्या पिल्लांचे केस मऊ असल्याने त्यापासून निर्मित वस्तूंची थोड्या जास्त किंमतीत विक्री होते. मेंढीच्या केसांची घोंगडी व इतर उत्पादने जाडसर आणि शरीराला हलकीशी रुतणारी असतात. त्यामुळे बहुतांश ग्राहक याकडे पाठ फिरवतात, ही बाब ओळखून अहिल्यादेवी बचतगटाने सर्व उत्पादनांना नवीन आधुनिक झालर चढवली. घोंगडीवर कापसाची हलकी परत टाकून आकर्षक कव्हर बसवले जाते. सर्व उत्पादने घरीच चरख्याचा उपयोग करून कोणत्याची मशीनचा उपयोग न करता हातशिलाई करून तयार केली जातात. औरंगाबाद आणि पुणे येथील काही कंपनींच्या माध्यमातून घोंगडी आणि इतर उत्पादने अमेरिका, स्पेन, जर्मनी येथे पाठवण्यात येत आहेत.

तयार केली. विविध महोत्सवात सहभाग घेण्यास सुरुवात केली. नागरिकांना जसजशी माहिती होऊ लागली तसा व्यवसायदेखील वाढू लागला. आज महिन्याला या बचतगटाची मासिक उलाढाल जवळपास १० ते १५ हजार रुपये आहे. तसेच पुणे, मुंबई, नाशिक, अलिबाग या ठिकाणी ऑर्डरप्रमाणे माल पाठवण्यात येतो.


खाद्यपदार्थांचा स्टॉल

**नरसोबावाडीचा पेढा**

कोल्हापूर जिल्ह्यातील नरसोबावाडी श्रीनरसिंह सरस्वती यांच्या वास्तव्यामुळे जागृत स्थान मानले जाते. नरसोबावाडी, इला खोचरे यांच्या श्रीकृष्ण बचतगटामुळे देखील ओळखली जाते. बचतगट निर्मित दुधाच्या चवदार पदार्थांमुळे स्टॉलवर जाताच तोंडाला पाणी सुटल्याशिवाय राहत नाही. २००१ मध्ये इला परशुराम खोचरे यांनी काही महिलांना एकत्र करून श्रीकृष्ण महिला बचतगटाची स्थापना केली. सुरुवातीला १५ हजारांचे कर्ज घेऊन खवा, पेढे निर्मिती केली.

हळूहळू उद्योग चांगलाच बहरला. या बचतगटाने उद्योगाचा विस्तार करण्यासाठी आणखी ५ लाख रुपयांचे कर्ज घेतले. राज्यात विविध महोत्सवात या बचतगटाचा स्टॉल असतो. बचतगटाकडून बासुंदी, पेढे, कवठ बर्फी, गुलकंद आणि खवा एकत्र करून करण्यात येणारा कुंदा पाहून तोंडाला पाणी सुटते. महालक्ष्मी सरसमध्ये दिवसाला ५० किलो पेढे, ८० किलो बासुंदी अशी जवळपास ७५ हजारांची विक्री झाली.

**श्रीदर्शनी ब्रॅन्डची यशस्वी वाटचाल**

बचतगट म्हणजे काय हे महाराष्ट्रात नेमके माहीत नसताना सोलापूर जिल्ह्यात एक बचतगट स्थापन झाला. परिवाराला हातभार लागावा म्हणून गृहउद्योग स्थापन करण्याचे ठरले.

१४ महिलांनी एकत्र येऊन १९९९ मध्ये प्रियदर्शनी बचतगट सुरू केला. सतरा वर्षांच्या कार्यकाळात प्रियदर्शनी बचतगटाच्या वनिता तंबाके यांनी सुरू केलेला श्रीदर्शनी ब्रँड आज देशभर पोहोचला आहे. त्यांनी बचतगट उभारण्याचा निर्णय घेतला तेव्हा गावातून विरोध झाला. त्यामुळे त्यांनी एक माहितीपत्रकवजा नियमावली तयार केली. सर्वांना त्याचे वाटप केले. बचतगटाचे महत्त्व समजल्याने सर्वांची साथ मिळाली. सुरुवातीला २५ हजारांचे खेळते भांडवल घेतले. त्यातून शेळीपालन, बांगडी विक्री, किराणा दुकान, स्क्रीन प्रिंटिंग, शिवणक्लास, दुग्धव्यवसाय असे पाच उद्योग सुरू केले. १४ महिलांना रोजगार मिळाला. स्वत:च्या पायावर उभे राहण्याचे पाठबळ मिळाले. गावातील सावकारीला आळा बसला.

प्रत्येक महिलेने बचतगटाच्या माध्यमातून स्वत:चे लहान गृहउद्योग सुरू केले. आज दरमहा प्रत्येक महिला किमान १० हजार रुपये कमावते. प्रियदर्शनी या नावाने वनिता यांनी स्वत:चा ब्रँड सुरू करण्याचा निर्णय घेतला. ३ लाखांचे चकली तयार करण्याचे मशीन खरेदी केले. परंतु प्रियदर्शनी नावाने अगोदरच हरियाणात ब्रँड नोंदणी असल्याने ते नाव मिळू शकले नाही. त्यामुळे वनिता तंबाके यांनी श्रीदर्शनी फूड नावाने स्वत:चा ब्रँड सुरू केला. या ब्रांडद्वारा निर्मित चकल्या आणि इतर पदार्थांची कर्नाटक, नाशिक, कोल्हापूर, मुंबई या ठिकाणी निर्यात केली जात आहे. महिन्याला तब्बल ३ लाखांची उलाढाल होत असून देशभरात श्रीदर्शनीची यशस्वी वाटचाल सुरू आहे.

**आपुलकीची हाक**

शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेत कर्ज मिळवून स्वत:चा गृहउद्योग उभारलेल्या महिलांची आजवर केलेली प्रगती आपल्याला पाहावयास मिळते. घरीच बनवलेल्या वस्तूंची आकर्षक कलाकुसर पाहून सर्व थक्क होतात. बहुतांश लोक वस्तू खरेदी करतात. महिलांच्या उद्योगात भर पडते तर आपल्याला देखील कमी किमतीत आकर्षक वस्तू व खाद्यपदार्थ मिळतात.

**खमंग मेजवानी**

महालक्ष्मी सरसमध्ये जवळपास शंभरावर खाद्यपदार्थांचे स्टाल लावण्यात आले होते. कोकणी पट्ट्यातील मासे, खेकडे, जलचरांपासून तयार केलेल्या विविध पदार्थांचा खमंग, मसालेदार वास सर्वत्र दरवळत होता. विविध प्रकारचे सूप, खापराची पुरणपोळी, कळण्याची भाकर, ठेचा, कोल्हापुरी ठेचा, वेगवेगळ्या चटण्या व लोणची असे विविध पदार्थ मुंबईकरांच्या जिभेची लज्जत वाढवत होते.

– अर्चना वाणी

**लोकराज्य या प्रकाशनाची मालकी व अन्य माहिती, यासाठी द्यावे लागणारे निवेदन तक्ता – ४ नियम ८ वा**

| | |
|---|---|
| १) प्रकाशन ठिकाण | : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई–३२ |
| २) प्रकाशन काल | : मासिक |
| ३) मुद्रकाचे नाव | : प्रवीण टाके |
| भारताचे नागरिक आहेत का? | : होय |
| ४) प्रकाशकाचे नाव | : प्रवीण टाके |
| भारताचे नागरिक आहेत का? | : होय |
| पत्ता | : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई – ३२ |
| ५) संपादकाचे नाव | : ब्रिजेश सिंह |
| भारताचे नागरिक आहेत का? | : होय |
| पत्ता | : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई – ३२ |

मी प्रवीण टाके असे जाहीर करतो की, माझ्या माहितीप्रमाणे वरील तपशील पूर्णपणे खरा आहे.

**प्रवीण टाके**
**मुद्रक व प्रकाशक**

# स्वबळाची सक्षमता

राज्य शासनाच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या योजना लाभार्थींपर्यंत पोहोचाव्यात याकरिता विविध विभागांशी महिला आर्थिक विकास महामंडळ सातत्याने समन्वय साधत असते. विशेषतः महिला व बालविकास विभाग, कृषी विभाग, सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विभाग, ग्रामविकास विभाग, अल्पसंख्याक विभाग तसेच पशु व दुग्ध विकास विभाग यांच्याशी प्रभावीरीत्या संपर्क ठेवून आजपर्यंत १,९५,००० महिलांना विविध लाभ मिळवून देण्यात महामंडळ यशस्वी ठरले आहे.



बचतगटाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांच्या हाताला काम.

२४ फेब्रुवारी १९७५ रोजी महिला आर्थिक विकास महामंडळाची (माविमची) स्थापना झाली. महिला आर्थिक विकास महामंडळाने महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात, जेणेकरून महिलांचा आर्थिक विकास होईल असा माविमच्या स्थापनेमागे शासनाचा हेतू आहे. त्यामुळेच या महामंडळाची नोंदणी कंपनी कायद्याखाली झाली.

यथावकाश महामंडळाची तज्ज्ञता व अनुभव लक्षात घेऊन महामंडळाला महिला विकासाची राज्यस्तरीय 'शिखर संस्था' म्हणून २0 जानेवारी २003 ला, महामंडळाची पुनर्रचना करताना, घोषित करण्यात आले.

### कार्यपद्धती

माविमकडे इतर महामंडळांकडे उपलब्ध असतात, त्याप्रमाणे कर्ज योजना नसून, हे महामंडळ प्रक्रियाकेंद्रित उपक्रमांची अंमलबजावणी करते. महिलांना त्यांच्या चुलीपर्यंत जाऊन, त्यांना स्वयंसाहाय्यता गटात समाविष्ट करून, त्यांना संघटित करून विकासाच्या प्रक्रियेत आणण्याचा प्रयत्न माविम करते. त्यांच्या आशाआकांक्षा, कुवत, त्यांना रस असलेल्या व सहज आत्मसात करता येऊ शकतील अशा उद्योजकीय कौशल्यांच्या आधारे त्यांना उपजीविकेची साधने मिळवून देण्यासाठी त्यांच्यात क्षमता निर्माण करते. शासनाच्या विविध योजनांशी तसेच बँकाशी जोडून देते. बँकांकडून अर्थसाहाय्य मिळवून देण्यासाठी त्यांची पत विश्वासार्हता वाढवण्याकरिता बँका व महिलांच्या मधला दुवा म्हणून साहाय्यकाची भूमिका करते. गेल्या ३५ वर्षांच्या कालावधीत माविमने वैयक्तिक लाभाची कोणतीही योजना राबवलेली नाही.

माविम महिलांसाठी काम करीत असले तरी त्यातून संपूर्ण कुटुंब दारिद्र्यावर मात करून विकासाच्या प्रक्रियेत येईल आणि ते कुटूंब समतेच्या मूल्यव्यवस्थेचा भाग बनेल असा जाणीवपूर्वक प्रयत्न माविममार्फत केला जातो. माविमने कायमच लक्ष्यपूर्तता यावर भर न देता गुणात्मक फलिते मिळवण्यावर जाणीवपुर्वक भर दिला. त्यामुळे सगळ्या राज्यात एकाच वेळी काम न करता काही ठरावीक अतिगरजू व मागासलेल्या गावात एकात्मिक पद्धतीने गुणात्मक काम करीत गावांचा विस्तार करीत जाणे या पद्धतीने माविम काम करीत आहे.

सद्य:स्थितीत माविम ३४ ग्रामीण जिल्ह्यातील २११ तालुक्यातील १४,७७१ गावे व ५२ शहरांमधील ८६,६७८ स्वयं सहाय्यता गटातील ११ लाख कुटुंबांपर्यंत पोहोचण्यात यशस्वी झालेले आहे. महिला सक्षमीकरणाकरिता स्वयंसाहाय्यता गटासारख्या सक्षम माध्यमाचा माविमने रणनीती म्हणून उपयोग केलेला आहे. गटाच्या माध्यमातून महिलांना संघटित करून त्यांना माहिती देऊन त्यांच्या गावाजवळच उत्पादन विक्रीसाठी बाजार, मॉल उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न करीत आहे. यातून स्वबळावर उभी राहण्याची ताकद महिलांना मिळत आहे. त्यामुळे त्या घरातील व गाव विकासाच्या निर्णय प्रक्रियेत बेमालूम पद्धतीने शिरकाव करीत आहेत. परिणामी, 33% पंचायत राज संस्थामधील महिला आरक्षणाचा फायदा घेऊन त्या राजसत्तेत सहभागी होत आहेत.

### लघुवित्तपुरवठा आणि उपजीविका विकास

गरिबातली गरीब महिला बचत करू शकते, बँकेची ग्राहक होऊ शकते. कर्जाची १००% परतफेड करू शकते. सबसिडीपेक्षा

वेळेत कर्ज, हव्या त्या कारणासाठी कर्ज, गरजेइतके कर्ज व किचकट प्रक्रियामुक्त कर्ज याची गरज भागली तर गरीब दारिद्र्यावर मात करू शकतात याचे उदाहरण माविमने महाराष्ट्रात घालून दिलेले आहे.

या कर्जाच्या मदतीने गटातील महिला छोटे-मोठे व्यवसाय करीत असून कुटुंबासाठी उत्पन्नाची साधने निर्माण करीत आहेत. आजमितीस ५,९०,००० महिला शेती व बिगरशेतीवर आधारित व्यवसाय उद्योगात कार्यरत आहेत. समान व्यवसाय करणाऱ्या महिलांना एकत्रित आणून मायक्रो लाईव्हलीहुड प्लॅन यासारख्या संकल्पनेतून बकरीपालन, कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, भाजीपाला लागवड यासारख्या उपक्रमात त्यांचा उत्पादनावर होणारा खर्च कमी करून उत्पन्न वाढवण्यावर भर देण्यात येत आहे. या प्रकारचे ३,६०९ मायक्रो लाईव्हलीहुड प्लॅन कार्यरत असून, यामध्ये ८९,०४३ महिला सहभागी झालेल्या आहेत. पाण्याची कमतरता असलेल्या ठिकाणी दुग्धव्यवसाय व बकरीपालन हे व्यवसाय यशस्वी व्हावेत याकरिता हायड्रोफोनिक व अझोला यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून गाई व बकरी यांच्या साठी चारा उत्पादनाचे विशेष प्रयत्न केलेले आहेत. महिलांनी उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठ मिळवून देण्याकरिता पॅकेजिंग, लेबलिंग याचे प्रशिक्षण दिले जाते.

### कर्जवाटप

माविमने संघटीत केलेल्या ८६६१८ स्वयं सहाय्यता गटातील ११ लाख महिलांनी आतापर्यंत एकूण रु.४३२ कोटी इतकी रक्कम बचत म्हणून जमा केलेली आहे. म्हणूनच आयसीआयसीआय, आयडीबीआय व इतर राष्ट्रीयकृत बँकांनी आज रोजीपर्यंत रु.१३४६ कोटी इतक्या रक्कमेचे कर्ज महिला बचत गटांना दिलेले आहे. तर बँकांकडून मिळणारे कर्ज व स्वतःची बचत यामधून रु.१७२४ कोटी इतकी रक्कम गटातील महिलांना अंतर्गत कर्ज म्हणून वाटप केलेली आहे.

### रेल्वेमध्ये ई-कॅटरिंग

भारतात प्रथमच रेल्वेमध्ये ई-कॅटरिंग या प्रकल्पांतर्गत स्वयंसाहाय्य बचतगटांनी तयार केलेले खाद्य पदार्थ विकण्याचा प्रयोग सिंधुदूर्ग जिल्ह्याने केलेला आहे. सावंतवाडी येथील 'माहेर या बचत गटांच्या फेडरेशन (सीएमआरसी) ने आयआरसीटीसीसोबत ही सेवा सुरू केलेली आहे.

### अभियानात भागीदारी

माविमने महामंडळातर्फे संपूर्ण राज्यभरात राबवण्यात येणाऱ्या तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला सक्षमीकरण कार्यक्रम, ठाणे, गोंदिया, सोलापूर या तीन जिल्ह्यात महामंडळ महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानामध्ये भागीदार म्हणून, विदर्भातील ०६ जिल्ह्यांमध्ये कृषी समन्वयित कृषी विकास प्रकल्प, निवडक १० जिल्ह्यातील १३ शहरांत अल्पसंख्याक कार्यक्रम, ३३ जिल्ह्यातील शहरी भागांत दिनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान यासारख्या कार्यक्रमात व प्रकल्पात अवलंबलेली आहे.

### खासगी संस्थांसोबत भागीदारी

महामंडळ म्हणून शासनाच्या विभागांसोबतच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील बिगरशासकीय संस्था, कंपन्या यांच्यासोबतही माविम विविधप्रकारचे प्रकल्प राबवत आहे. 'इंटरनेट साथी' यासारखा प्रायोगिक तत्वावरील कार्यक्रम राज्यातील २७ जिल्ह्यामध्ये राबवण्यात येत आहे.


### राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल

महामंडळ करीत असलेल्या कामाची देशात आणि परदेशात प्रशंसा केली जात आहे. एशिया पॅसिफिक रिजनमध्ये आयफॅडचे एकूण २० देशांमध्ये ५६ प्रकल्प सुरू आहेत. त्यामधून तेजस्विनी कार्यक्रमाची निवड करण्यात आलेली आहे. २०१५ मध्ये रोम येथे 'जेंडर ॲवॉर्ड २०१५' माविमला प्रदान करण्यात आलेला आहे. चंद्रपूर जिल्ह्यात एसआरआय तंत्रज्ञानाने केलेल्या भारतशेती लागवडीच्या प्रयोगाची दिल्ली येथे झालेल्या 'सिताराम राव लाईव्हलीहूड केस स्टडी कॉम्पिटिशन'मध्ये विशेष दखल घेण्यात आली.

**- कुसुम बाळसराफ, महेंद्र गमरे**

## सत्तासंपत्तीतील महिलांचा सहभाग

ग्रामपंचायत ते जिल्हा परिषद, ज्यामध्ये एकूण स्थानिक विकासासंदर्भातील निर्णयप्रक्रिया होत असते, अशा प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढावा यासाठी विशेष प्रयत्न केले जातात. महिलांनी ग्रामसभेत सहभाग घेणे, ग्रामसभेत महिला विकासासाठी असलेल्या निधीचा योग्य वापर करणे, स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये सामील असलेल्या महिलांना प्रशिक्षण देणे व मार्गदर्शन करणे इ.बाबींचा समावेश त्यात होतो. आजपर्यंत स्वयंसाहाय्य बचतगटातील २८,०९९ महिला या ग्रामपंचायत ते जिल्हा परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये जिल्हा परिषद अध्यक्ष, सरपंच व ग्रामपंचायत सदस्य म्हणून सामील झाल्या आहेत. पुरुषांसोबत महिलेचाही घर व कुटुंबाच्या मालमत्तेवर समान अधिकार असावा यासाठी जाणीवजागृती करण्यात येते. गेल्या दोन वर्षात ९७,४५२ कुटुंबांनी सातबारा उताऱ्यावर महिलांचे नाव चढवण्यासाठी अर्ज केला असून, त्यापैकी २५४३१ कुटुंबांची प्रत्यक्ष प्रक्रिया पूर्ण झाली.



सलीमा बी हाफीज खाँ पठान

याचप्रमाणे नमुना ८-अ नुसार घर दोघांच्या नावावर करण्याच्या अनुषंगाने १,१५,७७२ कुटुंबांनी अर्ज केले, त्यापैकी ७७,९९७ महिलांची नावे या नमुन्यात दाखल करण्यात आली.

# महिलांना खंबीर साथ



विजया रहाटकर
अध्यक्षा, राज्य महिला आयोग

महिला आयोग नेहमीच महिलांचे प्रश्न, महिलांवरचे अन्याय दूर करण्यासाठी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहत आला आहे. महिला आयोगाचे काम केवळ महिलेबाबत एखादी धक्कादायक घटना घडल्यानंतर प्रसारमाध्यमांमध्ये केवळ प्रतिक्रिया देण्यापुरते नसून महिलांविषयक विकासाची, अस्मितेची, अस्तित्वाची आणि सन्मानाची चळवळ गतिमान करण्याचे आहे.

महिलांचा सामाजिक सन्मान आणि समानतेसाठी जनजागृतीपासून ते महिलांच्या समस्यांवर सुनावणी घेऊन न्याय करण्यापर्यंत काम करण्यासाठी शासनाने महिला आयोगाची रचना केली आहे. अनेक वर्षे राज्य महिला आयोगाला अध्यक्षच नसल्याने महिलांच्या तक्रारींची हजारो प्रकरणे प्रलंबित होती. अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर ही प्रकरणे निकाली काढण्यापासून ते वेळोवेळी महिलांवर होणाऱ्या अन्यायकारक घटनांमध्ये महिलांच्या मदतीला धावून जाण्यासाठी मला तत्पर राहता आले. अतिसंवेदनशील प्रकरणांमध्ये जिल्हा प्रशासन, पोलीस यंत्रणा, जबाबदार नेते यांच्याशी तातडीने बोलून त्या त्या विषयात योग्य भूमिका घेतली जाते.

महाराष्ट्राच्या कान्याकोपऱ्यातून महिलांना त्यांच्या तक्रारी घेऊन महिला आयोगाकडे मुंबईला येणे शक्य होत नाही. हे लक्षात घेऊन महिला आयोग राज्यभर जाईल असा ऐतिहासिक निर्णय घेतला. 'महिला आयोग तुमच्या दारी' अशी घोषणा करत आयोगाने काही प्रमुख शहरात जावून जनसुनावण्या घेतल्या. त्या त्या भागातून आलेल्या प्रलंबित प्रकरणांचा निपटाराही या निमित्ताने करणे शक्य होत आहे. 30 एप्रिल २०१६ रोजी या उपक्रमाला औरंगाबादपासून सुरुवात झाली. नागपूर, मुंबई, पुणे, नाशिक, नांदेड, कोल्हापूर अशा सर्व शहरात मोठ्या संख्येने महिलांनी आधी कसलीही पूर्वसूचना न देता थेट आयोगासमोर येऊन आपली कैफियत मांडली.

### आयोगाचे अधिकार

आयोग एक वैधानिक व स्वयंशासित संस्था आहे. आयोगास दिवाणी न्यायालयाचे अधिकार प्राप्त आहेत. या अधिनियमान्वये तपास करण्याच्या प्रयोजनासाठी, शासनाच्या सहमतीने राज्य किंवा सरकारच्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा अन्य कोणत्याही व्यक्तींच्या सेवांचा वापर करील. कोणत्याही व्यक्तीस हजर राहण्यास फर्मावू शकेल. दस्तऐवज शोधून काढण्यास व ते सादर करण्यास फर्मावू शकेल. कार्यालयातून कोणतेही सार्वजनिक अभिलेख किंवा त्याची प्रत मागवू शकेल.

### स्थानिक तक्रार निवारण समिती

महिलांची होणारी टिंगल, छळ, लैंगिक शोषण, छेडछाड प्रकार बंद व्हावे या दृष्टीने कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ अधिनियम २०१३ या कायद्याबाबत जाणीव जागृती केली. प्रत्येक ठिकाणी या विषयात स्थानिक तक्रार निवारण समितीची स्थापना करण्यात आली आहे. कामाच्या ठिकाणी महिलांचा होणारा छळ या विषयावर जनजागृतीसाठी पीपल अगेन्स्ट सेक्शुअल हॅरॅसमेंट या कार्यक्रमांतर्गत सर्व विद्यापीठात विद्यार्थिनींचे व महिला कर्मचाऱ्यांचे प्रबोधनाचे कार्यक्रम सुरू आहेत.

### कौटुंबिक हिंसाचाराची दखल

कौटुंबिक हिंसाचार हुंडाबळीसारख्या घटनांची आयोगाकडून अत्यंत गंभीर दखल घेतली जाते. महिलांना न्याय देण्यासाठी यंत्रणा त्या त्यावेळी संवेदनशीलपणे व गतीने काम करेल असे प्रयत्न केले जातात. याशिवाय जनजागृती, प्रशिक्षण, प्रबोधनाचे कार्यक्रम घेतले जातात. कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक अधिनियम २००५ च्या अंमलबजावणीबाबत वर्षभरात राज्यात जिल्हानिहाय ३६ कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण व कायद्यातील तरतुदींबाबत जनजागृती करण्यात आली.

### सायबर गुन्हेगारीवर जनजागृती

सायबर गुन्हेगारी आणि त्याचा महिलांवर होणारा परिणाम, लिंगसमभाव, कायदे याबाबत एकूण १३ कार्यशाळा राज्यभर घेण्यात येत आहेत. इंटरनेट, मोबाईल आदी वापर करताना घ्यावयाची काळजी व सायबर गुन्ह्यांसंबंधी असलेल्या कायद्यांची माहिती कार्यशाळेच्या माध्यमातून आयोगाकडून दिली जात आहे.

शब्दांकन : संगीता धारूरकर

### येथे संपर्क साधा

महाराष्ट्र राज्य महिला आयोग, पोटमाळा, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१
ई-मेल: mscwmahilaayog@gmail.com | संकेतस्थळ: www.mahilaayog.maharashtra.gov.in
दूरभाषा - ०२२-२६५९०७३१ (अध्यक्ष) / समुपदेशक - ०२२-२६५९०४७४, २६५९०८७८

# येथे कर माझे जुळती...

अनेक क्षेत्रात महाराष्ट्रातील कर्तृत्ववान महिलांनी कामगिरी करून आदर्श निर्माण केला आहे. महदाइसा ऊर्फ महदंबा, राजमाता जिजाऊ, अहिल्याबाई होळकर, ताराबाई शिंदे, सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, ताराबाई मोडक, अनुताई वाघ, डॉ.आनंदीबाई जोशी या थोर महिलांचा ठळकपणे उल्लेख करावा लागेल.

**महदाइसा ऊर्फ महदंबा**

महदाइसा ऊर्फ महदंबा ही महानुभाव पंथातील एक अग्रगण्य व्यक्ती होती. तिने उपस्थित केलेल्या प्रश्नांमुळे आणि शंकांमुळे म्हातारी बहु चर्चक, म्हातारी जिज्ञासक असा तिचा गौरव झालेला होता. चक्रधरांनी



सांगितलेल्या तत्त्वज्ञानावरील तिची गाढ श्रद्धा पंथीयांना मार्गदर्शक वाटत असे. तिने रचलेले धवळे तिला आद्य मराठी कवयित्रीचा मान प्राप्त करून देतात.

श्री चक्रधरांनी जाण्यापूर्वी महदाइसाला 'असंन्निधान धर्म' सांगितला होता. 'असंन्निधानी तळमळ..... पोळलेल्या सुनेच्या परी, तयासि कव्हणे ठायी सुखासि नेये. अखंड जळतचि असे' अशी विरहात जळणारी रुक्मिणी महदाइसेने आपल्या काव्यातून प्रकट केली. महदाइसेच्या काळात म्हणजे यादवकालात एकेश्वरी वादाचा पुरस्कार करणाऱ्या पंथाचा म्हणजेच महानुभाव पंथाचा उगम झाला. महदाइसाचा जन्म एका विद्वान घराण्यात झाला. तिचे पणजोबा वामनाचार्य हे यादवराजांचे आश्रित असून पणजी महदाइसाही विद्वान होती. पणजीला म्हाळसा प्रसन्न होती, असे म्हणतात. पणजी महादेवरायाची पुरोहित असल्याने राजा तिला नित्य प्रश्न विचारीत असे व ती भविष्य सांगत असे. एका वादात तिने परप्रांतीय विद्वानांचा पराभव केल्याने तिला जैतपत्र मिळाले. राजाने पाच गावे इनाम म्हणून दिली. अशा विद्वान पणजीचा वारसा चालवणारी विद्वान नात महदाइसा होय. महदाइसाचा जन्म वायेनायक व कामाइसा ह्यांच्या पोटी झाला.

महदाइसेच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध हा 'लीळाचरित्र', 'श्री प्रभुचरित्र', 'स्मृतिस्थळ' व 'धवळे' या चार ग्रंथांमधून घेता येतो. धवळेमध्ये तिची प्रतिमा दृष्टीस पडते. तीर्थयात्रेस जाणे, व्रतवैकल्य करणे, देवपूजेत रमणे या रूढ परमार्थाच्या वाटेने जाणे तिला आवडत असे. सुरुवातीच्या काळात चक्रधर स्वामींचे शिष्य दादोस हे तिचे गुरू होते.

**राजमाता जिजाऊ**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मातोश्री म्हणून जिजाऊंची ओळख आहे. त्यांचा जन्म बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड येथे झाला. त्यांचे वडील लखुजी जाधव निजाम दरबारी सरदार होते. जिजाऊ यांचा विवाह शहाजी भोसले यांच्याशी झाला. जिजाबाईंची शिकवण आणि संस्कारामुळे शिवाजी महाराजांना स्वतंत्र राज्य निर्मितीची प्रेरणा मिळाली. जिजाबाईंनी शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक पाहिला. त्यानंतर वृद्धपकाळाने रायगडाच्या पायथ्याशी (पाचाड) त्यांचा मृत्यू झाला.



या गावी राजमाता जिजाबाईंची समाधी आहे.

**राजांचे संगोपन आणि कुशल कारभार**

शिवाजी महाराज १४ वर्षांचे असताना शहाजीराजांनी त्यांच्या हाती पुण्याची जहागीर सुपुर्द केली. कुशल अधिकाऱ्यांसमवेत जिजाबाई आणि शिवाजी महाराज पुण्यात येऊन दाखल झाले. निजामशाही, आदिलशाही आणि मोगलांच्या सततच्या स्वाऱ्यांमुळे पुण्याची अवस्था भीषण होती. अशा प्रतिकूल परिस्थितीत

त्यांनी दादोजी कोंडदेव यांच्या सोबत पुणे शहराचा पुनर्विकास केला. सोन्याचा नांगर घडवून त्यांनी शेतजमीन नांगरली, स्थानिक लोकांना अभय दिले. जिजाबाईंनी शिवाजी महाराजांच्या शिक्षणाची जबाबदारी पेलली. जिजाबाईंनी शिवाजी महाराजांना पारतंत्र्यात सुरू झालेल्या आणि रामायण, महाभारतातील गोष्टी सांगितल्या. जिजाबाईंनी दिलेल्या या संस्कारांमुळेच शिवाजीराजे घडले. या सदरेवर शेजारी बसवून राजकारणाचे धडेही दिले.

शिवरायांच्या मनात कर्तृत्वाची ठिणगी टाकतानाच जिजाबाईंनी त्यांना राजनिती शिकवली. समान न्याय देण्याची वृत्ती आणि अन्याय करणाऱ्याला कठोर शिक्षा देण्याचे धाडस दिले. शस्त्रास्त्रांच्या प्रशिक्षणावर बारकाईने लक्ष ठेवले. शहाजीराजांची कैद व सुटका, अफझलखानाचे संकट, आग्रा येथून सुटका अशा अनेक प्रसंगांत शिवरायांना जिजाबाईंचे मार्गदर्शन लाभले. शिवराय मोठ्या मोहिमांवर असताना, जिजाबाई राज्यकारभारावर लक्ष ठेवत असत. सदरेवर बसून तंटे सोडवत.

आपल्या मनात तयार असलेली हिंदवी स्वराज्याची संकल्पना प्रत्यक्षात साकार करण्यासाठी छत्रपती शिवरायांना ज्ञान, चारित्र्य, चातुर्य, संघटन व पराक्रम अशा राजस व सत्त्वगुणांचे बाळकडू देणाऱ्या राजमाता होय.

### अहिल्याबाई होळकर

अहिल्याबाई होळकर यांचा जन्म बीड जिल्ह्यातील चोंडी येथे १७२५ साली झाला. वडील माणकोजी शिंदे यांच्याकडे चोंडी गावाची पाटीलकी होती. अहिल्याबाई यांचा वयाच्या आठव्या वर्षी सुभेदार मल्हारराव होळकर यांचा मुलगा खंडेराव याच्याशी विवाह झाला.

१७५४ साली खंडेराव लढाईत मरण पावले. तेव्हा अहिल्याबाई होळकर यांनी मल्हारराव होळकरांच्या सांगण्यावरून सती जाण्यास नकार दिला. वैधव्य आले असताना राजकीय सत्तेची सूत्रे हाती घेऊन त्यांनी निर्भिडपणे राज्यकारभार केला. अहिल्याबाई होळकरांवर इंदूर संस्थानच्या सुभेदारीची जबाबदारी पडली. कोणत्याही प्रसंगाला न डगमगता त्या दौलतीचा कारभार पाहू लागला. अहिल्याबाई यांनी राज्यातील तत्कालीन आर्थिक स्थितीचा विचार करून कर पद्धतीमध्ये जनतेस सवलत दिली. उत्पन्नानुसार शेतसारा घेण्यास सुरुवात केली. गावोगावी न्यायपंचायती स्थापन केल्या. त्यांनी आदिवासी असलेल्या भिल्ल, गौंड जमातींना पडीक जमिनी लागवडीसाठी दिल्या. त्यांच्यावर राज्याच्या विशिष्ट भागांच्या संरक्षणाची जबाबदारी सोपवली.



अहिल्याबाई होळकर यांनी बारा ज्योतिर्लिंगांचा जीर्णोद्धार केला. बनारस, त्र्यंबकेश्वर येथे घाट बांधले. घृष्णेश्वर, गोकर्ण महाबळेश्वर, उज्जैनचा महाकालेश्वर, रामेश्वर, भिमाशंकर आदी ठिकाणी अन्नछत्रे उभारण्याचेही कार्य त्यांनी केले.

पंढरपूर, कोल्हापूर, नाशिक, जेजुरी, वेरुळ, चिंचवड, पुणतांबे, राजापूर, संगमनेर, पुणे, निमगाव, ओझर, रावेर आदी ठिकाणी नवीन मंदिरे व घाट बांधले. कलकत्ता, काशी इथल्या रस्त्यांचे बांधकामही केले. द्वारका, बद्रीनारायण, जगन्नाथपुरी आदी ठिकाणी बाग, कुंड, अन्नछत्रे आदी सुविधांची सोय केली. गोरगरिबांना राहण्या-खाण्याच्या सुविधा पुरवण्याचे कार्य त्यांनी केले. यामुळेच त्यांना पुण्यश्लोक ही उपाधी देण्यात आली.

### ताराबाई शिंदे

सत्यशोधक परंपरेतील पहिल्या लेखिका ताराबाई शिंदे यांचा जन्म बुलढाणा जिल्ह्यात झाला. त्यांचे वडील सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते होते. त्यांना मराठी, इंग्रजी आणि संस्कृत भाषा अवगत होत्या. स्त्री-पुरुष समतेच्या सत्यशोधकीय दृष्टीचा त्यांच्यावर खोल परिणाम झाला. या दृष्टीतूनच स्त्री-पुरुष तुलनासारखे स्त्री-पुरुष विषमतेची चिकित्सा करणारे पुस्तक त्यांनी लिहिले.

महात्मा फुले यांच्या तालमीत व

### सावित्रीबाई फुले

सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील नायगाव येथे झाला. त्यांचे वडील खंडोजी नेवसे-पाटील होते. त्यांच्या घराण्याला प्रतिष्ठा होती. सावित्रीबाईंचा विवाह जोतिबा फुले यांच्याशी झाला. महात्मा जोतिबा फुले यांच्या कार्यात सावित्रीबाईंनी निष्ठेने साथ दिली. महात्मा फुलेंनी सुरू केलेल्या मुलींच्या शाळेत सावित्रीबाईंनी शिक्षिका म्हणून कार्य केले. महाराष्ट्रातील त्या पहिल्या स्त्री शिक्षिका होत. त्या स्वतः अशिक्षित होत्या. स्वतः शिकून शिक्षिकेचे काम त्यांनी केले. हे काम करत असताना त्यांना खूप त्रास सहन करावा लागला. त्यांच्या अंगावर चिखलफेकही झाली. त्यांनी अपमान, निंदानालस्ती सहन करत आपले शिक्षणाचे पवित्र कार्य चालूच ठेवले. अस्पृश्योद्धाराच्या कार्यातही त्यांचा मोलाचा सहभाग होता.



महात्मा फुलेंनी बालहत्या-प्रतिबंधगृह आपल्या घरीच सुरू केले. या गृहातील अनाथ मुलांचे संगोपन सावित्रीबाईंनी केले. त्या अनाथ मुलांच्या माऊली होत्या. अत्यंत प्रेमाने व मातेच्या वात्सल्याने त्यांनी या मुलांचे संगोपन केले. महात्मा फुलेंच्या सर्व कार्यात त्यांनी समर्थपणे साथ दिली. सावित्रीबाई या स्वयंप्रकाशित स्त्री होत्या. अशा या महान व कर्तबगार स्त्रीचा मृत्यू प्लेगच्या रोग्यांची शुश्रूषा करताना प्लेगची बाधा झाल्यामुळे १० मार्च १८९७ रोजी झाला.


**पंडिता रमाबाई**

पंडिता रमाबाई यांनी बुद्धिमत्ता व कर्तबगारी यांच्या जोरावर महाराष्ट्रात अलौकिक कार्य केले. त्यांचा जन्म कर्नाटकातील मंगळूर जिल्ह्यातील गंगामुळे या गावी २३ एप्रिल १८५८ रोजी झाला. त्यांचे आडनाव डोंगरे असे होते. वडलांनी त्यांना प्राचीन हिंदू शास्त्रांचे चांगले शिक्षण दिले होते. १६ व्या वर्षी त्यांचे आईवडील मृत्यू पावले. पोरक्या झालेल्या पंडिता रमाबाई व बंधू श्रीनिवास यांनी तीर्थयात्रेला जाण्याचा निर्धार केला. सहा वर्षांच्या भारतभ्रमणानंतर ते कोलकात्यात दाखल झाले. तेथे त्यांनी पांडित्याने व संस्कृत ज्ञानाच्या आधारे लोकांना थक्क केले. लोकांनी त्यांना सरस्वती व पंडिता या पदव्या देऊन गौरवले. पुणे येथे स्त्रियांच्या स्थितीबद्दल जागृती करण्यासाठी आर्य महिला समाजाची स्थापना १८८२ मध्ये त्यांनी केली. हंटर कमिशनपुढे साक्ष देताना स्त्री शिक्षणासाठी त्यांनी आग्रह धरला.



रमाबाईंनी स्त्रियांच्यासाठी केलेले महत्त्वाचे कार्य म्हणजे 'शारदा सदन'ची स्थापना होय. त्यांनी १८८९ मध्ये मुंबई येथे या संस्थेची स्थापना केली. १८९० मध्ये या संस्थेचे पुण्याला स्थलांतर करण्यात आले. या संस्थेच्या सल्लागार मंडळात न्या.रानडे, न्या.तेलंग, डॉ.भांडारकर यासारख्या थोर व्यक्ती होत्या.

पंडिता रमाबाई यांनी नंतर केडगाव येथे मुक्तिसदन नावाची संस्था सुरू केली. त्यात अनाथ व विधवा स्त्रियांच्या शिक्षण, निवास आणि भोजनाची मोफत सोय करण्यात केली. १८९७ च्या दुष्काळाच्या वेळी जनतेला त्यांनी मदतीचा हात दिला. त्यांनी लिहिलेले बायबलचे मराठी भाषांतर, स्त्रीधर्मनीती, दि हाय कास्ट हिंदु वुमन इत्यादी ग्रंथ उल्लेखनीय आहेत. पं.रमाबाईंचा मृत्यू इ.स ५ एप्रिल १९२२ रोजी झाला.



सत्यशोधक समाजाच्या संस्कारात त्यांची वाढ झाली. १८८२ साली त्यांनी स्त्री-पुरुष तुलना हा निबंध लिहिला. विजयालक्ष्मी नावाच्या एका गुजराथी स्त्रीने केलेल्या भ्रूणहत्येनिमित्त जे उलटसुलट चर्चेचे मोहोळ उठले होते त्याचा प्रतिवाद करण्यासाठी ताराबाई शिंदे यांनी हा निबंध लिहिला. या निबंधात त्यांनी लग्न नावाच्या व्यवहारात बाईच्या वाट्याला बटकीपणा येतो. निमूट सोसणे येते, राबणे येते आणि विशेष म्हणजे सत्ताहीनता येते हे स्पष्ट केले. स्त्रिया या अबला नसून, धूर्त नवऱ्यांच्या कारस्थानांना बळी पडतात व परिणामी त्यांच्या वाट्याला गुलामीचे जीणे आल्याचे त्यांनी विशद केले. त्यांच्या या परखड लेखनामुळे प्रस्थापित वर्गाबरोबरच सत्यशोधक परंपरेतील काहींनी विरोध केला असता, महात्मा फुलेंनी ताराबाईंच्या भूमिकेला पाठिंबा दिला. त्यांनी या पुस्तकातून स्त्री-पुरुषांतील अंतर किती मोठे आहे हे दाखवून दिले. त्यांनी या पुस्तकातून स्त्रीमुक्तीच्या पायाभरणीस सुरुवात करून दिली. म्हणूनच त्या महाराष्ट्रातील स्त्रीमुक्ती विचाराच्या आद्यप्रवर्तक ठरतात.

**डॉ. आनंदीबाई जोशी**

आनंदीबाई जोशी या डॉक्टर होणाऱ्या पहिल्या भारतीय महिला होत. आनंदीबाई जोशी यांचे मूळ नाव यमुना होते. गोपाळराव जोशी यांच्याशी त्यांचा विवाह झाला. बायकोला डॉक्टर करायचे हा ध्यास गोपाळरावांनी घेतला होता. त्यांनी आनंदीला घरच्या घरी शिक्षण दिले व डॉक्टरी शिक्षणासाठी तिला अमेरिकेला पाठवले. त्यांना अमेरिकेतील फिलोडेल्फिया विद्यापीठातर्फे एम. डी. ही पदवी प्रदान करण्यात आली.

अमेरिकेतील हवामानातही भारतीय वस्त्रांतच राहायचा व शाकाहाराचा गोपाळरावांचा अट्टाहास, यामुळे त्यांची तब्येत अतिशय खालवली. शिक्षण संपवून भारतात येताच त्यांना क्षयरोगाची बाधा झाली. भारतातील कर्मठ वैद्यांनी त्यांना उपचार देणे नाकारले व इंग्रज डॉक्टरचे औषध घ्यायचे नाही असा गोपाळरावांचा हट्ट होता. त्यांच्या आजारपणात केसरीने त्यांना मदत केली. त्यातच आनंदीबाईंचा मृत्यू झाला. श्री. ज. जोशी यांनी आनंदी-गोपाळ ही त्यांच्या जीवनावरील कादंबरी लिहिली. त्यांचे अमेरिका प्रवास वर्णन इंडियन मिररमध्ये प्रसिद्ध झाले आहे.



**बहिणाबाई चौधरी**

बहिणाबाईंचा जन्म जळगावपासून २ कि.मी. अंतरावरील असोदे गावी महाजन घराण्यात झाला. वयाच्या तेराव्या वर्षी बहिणाबाईंचा नथुजी चौधरी यांच्याशी विवाह झाला. परंतु अगदी तरुणपणीच त्यांना वैधव्य आले. सुरुवातीचे एकत्र कुटुंब विभक्त झाल्यावर बहिणाबाईंना अतिशय हलाखीच्या परिस्थितीचा सामना करावा लागला.

घरातील आणि शेतातील कामे करता करता त्यांना काव्य सुचले. त्या निरक्षर असल्याने त्यातील काही काव्य त्यांचे पुत्र सोपानदेव चौधरी यांनी लिहून घेतले ते आचार्य अत्रे यांनी प्रथम प्रसिद्ध केले. त्यानंतर ते काव्य मराठी साहित्याच्या इतिहासात अजरामर ठरले. स्त्री-गीतांची मराठी साहित्यातील परंपरा समृद्ध आहे आणि काव्याचे लेणे लाभलेल्या बहिणाबाई चौधरी या त्या परंपरेच्या अग्रस्थानी आहेत. बहिणाबाईंच्या कवितामध्यून आपल्याला निसर्ग भेटतो, नात्यानात्यांतील



### ताराबाई मोडक

ताराबाईंचा जन्म १९ एप्रिल १८९२ रोजीचा. त्यांचे आईवडील प्रार्थना समाजाचे अनुयायी होते. त्यामुळे घरात प्रगत वातावरण होते. त्यांचे वडील सदाशिव पांडुरंग केळकर यांनी ठरवून विधवेशी पुनर्विवाह केला होता. केळकर कुटुंब कालांतराने इंदूर सोडून मुंबईला स्थायिक झाले.

१९१४ साली तत्वज्ञान हा विषय घेऊन बी.ए. झाल्यानंतर त्यांचा के. व्ही. मोडक यांच्याशी विवाह झाला. अमरावतीला मुलींच्या सरकारी हायस्कूल मध्ये १९१८ पर्यंत ताराबाईंनी नोकरी केली. राजकोटच्या बार्टन फिमेल ट्रेनिंग कॉलेजमध्ये त्यांनी दोन वर्षे प्राचार्यपदी नोकरी केली. १९२६ साली नूतन बालशिक्षण संघाची (मॉन्टेसरी संघ) स्थापना केली. त्यामार्फत 'शिक्षणपत्रिका' हे मासिक प्रकाशित होऊ लागले. त्यांनी शंभरच्यावर पुस्तकांचे संपादन केले. काहींचे लेखन केले. बालशिक्षणाच्या प्रसारासाठी मॉन्टेसरी संमेलने भरवली. बालशिक्षण हे त्यांचे कार्यक्षेत्र बनून गेले. पुढील काळात मुंबईला आल्यावर त्यांनी दादरला आपल्या कल्पनांवर आधारित शिशुविहारची स्थापना इ.स. १९३६ मध्ये केली. शिशुविहार आणि बालअध्यापक विद्यालय यांचे पुढच्या दहा वर्षांचे नियोजनही त्यांनी व्यवस्थित करून ठेवले. पुढे पुन्हा खेड्यात जाऊन पूर्णवेळ बालशिक्षणाला वाहून घेण्याची भावना मूळ धरू लागली. त्यासाठी त्या ठाणे जिल्ह्यातील बोर्डीला वास्तव्यास आल्या. या वेळी त्यांच्याबरोबर त्यांच्या शिष्या अनुताई वाघ होत्या.

बोर्डी आणि कोसबाड इथल्या आपल्या अठ्ठावीस (२८) वर्षांच्या वास्तव्यात ताराबाईंनी आदिवासींच्या शिक्षणासाठी महत्त्वाचे कार्य केले. ताराबाईंचे हे योगदान केंद्र सरकारच्या नजरेतून सुटले नाही. ताराबाईंना इ.स. १९६२ साली 'पद्मभूषण' हा प्रतिष्ठेचा नागरी सन्मान बहाल करण्यात आला. इ.स. १९४६-५१ अशी पाच वर्षे त्या तत्कालीन मुंबई राज्याच्या विधानसभा सदस्या होत्या. याच राज्यात प्राथमिक शाळा पाठ्यपुस्तक समितीवर त्यांनी अनेक वर्षं काम केले. अखिल भारतीय बालशिक्षण विभागाच्या त्या दोन वेळा अध्यक्षा होत्या. महात्मा गांधींनी आपल्या बुनियादी शिक्षण पद्धतीचा आराखडा तयार करण्याचे काम त्यांच्याकडे सोपवले होते. ताराबाईंची कर्मभूमी ठाणे जिल्ह्यातली असली, तरी त्यांच्या कार्याने फक्त तेवढ्याच भागाला फायदा झाला नाही, तर त्यांचे कार्य खेड्यातील आणि आदिवासी भागातील बालशिक्षण तंत्राचे एक देशव्यापी 'मॉडेल' बनले. आदिवासी मुलांसाठी अंगणवाड्या त्यांनी सुरू केल्या. गप्पा-गोष्टी, प्रत्यक्ष कार्यातून शिक्षण, कुरण शाळा प्रयोग, तांत्रिक व्यावसायिक शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी त्यांनी खूप परिश्रम घेतले.

परस्परसंबंध जाणवतात, उपदेशाचे देशी बोल जाणवतात, सहजसुंदर विनोदाची खोली जाणवते. कवितांमधून गद्य वाक्यप्रयोग, बोली भाषेची नाना सुंदर वळणे, बोली भाषेतील शब्दांचा अचूक वापर व सरलता यांच मिलाफ जाणवतो. बहिणाबाईंच्या कवितांमधून निसर्गाची कितीतरी रूपे दिसून येतात. तसेच शेतकऱ्यांच्या जीवनाचे यथार्थ चित्रण त्यांच्या कवितांमधून पाहायला मिळते.



बहिणाबाईंनी स्त्रीजीवनाविषयक काव्यही मोठ्या प्रमाणावर लिहिले. स्त्री मग ती कुठलीही असो, तिला माहेरची ओढ सदैव लागलेली असते. हीच माहेरची ओढ बहिणाबाईंच्या अनेक कवितांमधून जाणवते. बहिणाबाईंच्या कवितांतून माहेरचे वर्णन जसे येते, तितक्याच वेळा आणि त्याच सहजतेने त्या सासरचे, सासरच्या माणसांचे वर्णन करतात. त्यांनी आत्मविषयक, अध्यात्मविषयक, बोधप्रद, विनोदी, तसेच सामाजिक आणि उपदेशात्मक काव्यही रचले आहे. उपदेशात्मक व सामाजिक काव्यांद्वारे बहिणाबाईंनी काही सामाजिक समस्या मांडल्या आहेत. शिवाय त्यांच्या सूक्ष्म निरीक्षण शक्तीचा यातून प्रत्यय येतो. बहिणाबाईंच्या काव्याच्या निमित्ताने जळगाव धुळे जिल्ह्यातील अहिराणी बोली प्रकाशात आली व बोलीभाषेचे स्वरूप या काव्यांतून समजले. मराठी साहित्यात ज्या स्त्री साहित्यिकांनी दर्जेदार साहित्यनिर्मिती केली आहे. त्यात अग्रस्थानी बहिणाबाई चौधरी आहेत. पण अशिक्षित असून हे जे साहित्य त्यांनी निर्माण केले, त्याला खरोखर तोड नाही.


### अनुताई वाघ

अनुताई वाघ यांनी ताराबाईंच्या सहवासातून प्रेरणा घेतली. कोसबाडच्या टेकडीवर आदिवासींच्या उन्नतीसाठी संस्था स्थापन केली. या संस्थेलाच कोसबाड प्रकल्प म्हणून ओळखले जाते. आदिवासींच्या शिक्षणासाठी अनुताई वाघ यांनी पाळणाघरे, बालवाड्या, प्राथमिक शाळा, प्रौढ शिक्षण वर्ग, बालसेविका प्रशिक्षण महाविद्यालय इत्यादी शैक्षणिक संस्था सुरू केल्या. अनुताई वाघ यांना भारत सरकारने पद्मश्री देऊन त्यांच्या कार्याचा उचित गौरव केला. तसेच जमनलाल बजाज पुरस्कार, आदर्श शिक्षिका, महाराष्ट्र शासनाचा दलित मित्र इत्यादी पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले. 'कोसबाडच्या टेकडीवरून' हा त्यांनी लिहिलेला ग्रंथ कोसबाडच्या लोकजीवनाचे वास्तव दर्शन घडवतो.



(संदर्भ: विकीपिडीया महाराष्ट्राचा इतिहास, इयत्ता ११वी)

**संकलन - गजानन पाटील**




# सुरक्षेसाठी प्रतिसाद

महिलांना संकटकाळी पोलिसांशी त्वरित संपर्क साधून मदत मिळेल, अशी सोय महाराष्ट्र पोलिसांनी 'प्रतिसाद' या ॲपच्या माध्यमातून करून दिली आहे.

## प्रतिसाद Pratisaad (ASK)

महिला सुरक्षेच्या दृष्टीने प्रतिसाद हे ॲप अत्यंत उपयोगी आहे. दहशतवादी हल्ला, अपघात, लूटमार, असुरक्षिततेवेळी या ॲपच्या माध्यमातून क्षणात पोलिसांशी संपर्क होऊन त्वरित मदत मिळते. हे ॲप मोफत आहे.

**असा करा वापर :** ॲण्ड्रॉइड मोबाइलवरील Google Play Store वर Pratisaad (ASK) या नावाने सर्च केल्यास 'महाराष्ट्र पोलीस' असा लोगो असलेले प्रतिसाद एएसके हे ॲप दिसेल. त्यावर क्लिक करून इन्स्टॉल करावे. या ॲपच्या वापरासाठी इंटरनेट व जीपीएस अशा दोन सुविधा वापरणे आवश्यक आहे. हे ॲप इन्स्टॉल केल्यानंतर आवश्यक माहिती भरून नोंदणी करणे गरजेचे असते. ॲप ओपन केल्यानंतर सुरुवातीला आपला मोबाइल क्रमांक टाइप करून 'Register Now'वर क्लिक करावे. त्यानंतर आपल्या मोबाईलवर आलेला एसएमएस कोड टाइप करून Verify Now वर क्लिक करा. त्यानंतर रजिस्ट्रेशन फॉर्मवरील माहिती (नाव, ई-मेल, रक्त गट, वय, शहर आदी माहिती) अचूक भरावी. पुढे Add Relative Information असे ऑप्शन असेल. यामध्ये संकटकाळी ज्यांना सूचना मिळावी असे तुम्हाला वाटते अशा जास्तीत जास्त चार नातेवाईकांचे संपर्क क्रमांक तुम्ही येथे नमूद करू शकता. ही माहिती भरल्यानंतर Register now वर क्लिक करावे. त्यानंतर तुमचा प्रोफाइल फोटो व आयडी प्रूफ (आधार, गॅस, लाइट बील इ.) अपलोड केल्यानंतर ही प्रक्रिया पूर्ण होते. आता तुम्ही हे ॲप बंद करून पुन्हा ओपन केल्यास तुम्हाला Social Emergency नावाचे लाल बटण दिसेल. तुम्ही संकटकाळी हे इमर्जन्सी बटण दाबल्यास तुम्ही ज्या ठिकाणी आहात त्या परिसरातील जवळच्या पोलिसांची मदत मिळेल. यासाठी मात्र जीपीएस (लोकेशन) ऑन असणे व इंटरनेट सुविधा असणे आवश्यक असते. लोकेशन ऑन असल्याने तुमची माहिती प्रक्षेपित होईल कोठे आहात हे पोलिसांना कळेल व तुम्हाला त्वरित मदत मिळणे शक्य होईल. हे ॲप केवळ संकटात मदतीसाठी असल्याने विनाकारण ॲप्लिकेशनचे इमर्जन्सी बटण दाबू नये. ही सुविधा संपूर्ण महाराष्ट्रभर लागू आहे. राज्यातील कोणत्याही ठिकाणी 'प्रतिसाद' ॲप काम करते. या ॲपमुळे नागरिकांना तत्काळ मदत मिळत असल्याने गुन्हेगारी प्रवृत्तीवर आळा बसला आहे.

> **हेल्पलाइन (कन्ट्रोल रूम)**
>
> महिलांसाठी हेल्पलाइन क्रमांक : १०९१
> संकटातील महिला, ज्येष्ठ नागरिक व बालकामगारांसाठी : १०३
> नागरिकांसाठी हेल्पलाइन क्रमांक : १००
> रुग्णवाहिका : १०८

### काही महत्त्वाचे ॲप्स

प्रतिसाद ॲपसोबतच अनेक जिल्हा पोलिसांनी गरजेप्रमाणे त्यात बदल करून काही ॲप तयार केले आहेत. बीड, उस्मानाबाद, परभणी, नागपूर ग्रामीण, वर्धा, अहमदनगर, रत्नागिरी, ठाणे ग्रामीण, नागपूर शहर, ठाणे शहर, औरंगाबाद शहर, सोलापूर शहर, नवी मुंबई व अमरावती शहर पोलिसांचा त्यात समावेश आहे. या ॲपमध्ये विविध महत्त्वाचे संपर्क क्रमांकही दिले आहेत. यापैकी काही ॲप्सची माहिती खालीलप्रमाणे:

**कोशिश :** नागपूर ग्रामीण पोलिसांनी हे ॲप लॉन्च केले आहे. या ॲपचे नागरिकांना त्वरित मदत मिळवून देण्यासोबतच इतरही फायदे आहेत. ऑटोरिक्षा सुरक्षा म्हणूनही हे ॲप काम करते. प्रत्येक रिक्षाचालकास क्यूआर कोड दिला जातो. या कोडच्या माध्यमातून त्या रिक्षाचालकाची, त्याच्या वाहनाची संपूर्ण माहिती क्यूआर कोड स्कॅन करून मिळते. शिवाय या ॲपमध्ये समाविष्ट केलेले अनेक नियम, मार्गदर्शक तत्त्वे, धोरणे आणि गुन्ह्यांची माहिती नागरिकांसाठी उपयुक्त ठरते.

**गडचिरोली पोलीस :** या ॲपमधील 'हेल्प आयकॉन'वर क्लिक केल्यास पोलीस अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांशी तत्काळ संपर्क होऊन आपल्याला मदत मिळेल.

**होप :** ठाणे पोलिसांनी हे ॲप लॉन्च केले आहे. या ॲपद्वारे आपत्कालीन क्रमांक, वाहतूक, चोरी झालेली वाहने, पोलीस स्टेशन, हरवलेल्या व्यक्ती आदींबाबत माहिती मिळते.

**जालना पोलीस :** या ॲपमध्ये महिलांसाठी हेल्पलाइन क्रमांक, दक्षता मासिक, हरवलेली व्यक्ती, वाहने, तक्रार करण्याची सुविधा आहे.

– योगेश वाघमारे

# संरक्षण आणि सुरक्षा



महिलांना समाजात भयमुक्त वावरता यावे, पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करता यावे तसेच त्यांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे यासाठी संविधानामध्ये तरतूद करण्यात आली आहे. त्याचबरोबर वेळोवेळी आवश्यकतेनुसार कायद्यांची निर्मितीही करण्यात आली आहे. यामुळे महिला सुरक्षित झाल्या असून गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा बसला आहे.

भारतीय राज्य घटनेच्या कलम १४ नुसार कायद्यासमोर सर्व समान आहेत. कलम १५ नुसार धर्म, जात, लिंग भेद करता येत नाही. तर कलम १६ नुसार सर्वांना विकासाच्या समान संधी मिळतात. राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्व कलम ३८, ३९, ३९ (अ) आणि ४२ नुसार समाजातील विषमता दूर करून जनतेच्या कल्याणासाठी (स्त्री, पुरूष, बालके) न्याय व्यवस्था निर्माण करणे आपणा सर्वांची गरज आहे. कायद्याने महिलांना विविध बाबतींत संरक्षण दिले आहे.

### गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायदा

गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायदा १९९४ (सुधारीत २००३) या कायद्याचे उल्लंघन करण्याविरुद्ध कडक शिक्षेची तरतूद आहे. गर्भलिंग निदान करणाऱ्या डॉक्टरला ३ वर्षे सश्रम कारावास व १० हजार रूपये दंड आणि पुन्हा हा गुन्हा केल्यास ५ वर्षे कारावास व ५० हजार दंड इतक्या शिक्षेची तरतूद आहे. तसेच संबंधित गुन्हेगाराचा वैद्यकीय परवानाही रद्द होऊ शकतो.

### वैद्यकीय गर्भपाताचा कायदा १९७१ (सुधारित २००३)

या कायद्यानुसार १९७१ सालापासून स्त्रियांचा गर्भपाताचा अधिकार देण्यात आला आहे. गरोदरपणाच्या १२ आठवड्यांपर्यंत सरकारमान्य गर्भपात केंद्रामध्ये खालील पाच करणांसाठी गर्भपाताची सेवा देता अगर घेता येते.

- गरोदर महिलेच्या जीवितास धोका असेल तर.
- गरोदर महिलेच्या शारीरिक अगर मानसिक आरोग्यास गंभीर स्वरूपाचा धोका असल्यास
- अतिप्रसंगामुळे अस्तित्वात आलेली गर्भधारणा असल्यास.
- जन्माला येणाऱ्या बाळामध्ये शारीरिक, मानसिक, गंभीर स्वरूपाचे अपंगत्व येण्याची शक्यता असल्यास
- कुटुंब नियोजनाची साधाने अयशस्वी ठरल्यास.



गर्भलिंग निदान करून गर्भपात करणे, हा गंभीर स्वरूपाचा गुन्हा आहे. २० आठवड्यानंतर अगर १४ आठवड्यानंतर गर्भलिंगनिदान करून गर्भपात केल्यास गर्भपात करून घेणाऱ्या गरोदर महिलेवर देखील गुन्हा दाखल होऊ शकतो. जिल्ह्यात गर्भपाताच्या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा सल्लागार समिती अस्तित्वात आहे. गैरप्रकार आढळल्यास अगर उल्लंघन आढळल्यास आरोग्य अधिकाऱ्यामार्फत पोलीस स्टेशनमध्ये प्रकारणाची पूर्ण चौकशी करून गुन्हा दाखल करण्यात येतो. सदर कायद्याचे उल्लंघन आढळल्यास आय.पी.सी. कलम ३१२ ते ३१८ नुसार संबंधित पोलीस स्टेशनमध्ये जिल्हा शल्यचिकित्सकांनी गुन्हा दाखल केल्यानंतर संबंधित गरोदर महिला, हॉस्पिटल, नातेवाईक, एजंट यांच्यावरती दखलपात्र, अजामिनपात्र, नॉन- कंपाऊंडेबल गुन्हा दाखल होऊ शकतो. सदर गुन्ह्यासाठी ७ वर्षे सक्तमजुरी आणि रु.५०,०००/- पर्यंत दंडाची शिक्षा होऊ शकते.

### मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क २००९

६ ते १४ वयोगटातील मुलामुलींच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणासाठी हा कायदा पारीत करण्यात आला. कायद्याच्या कलम ३ नुसार भारतातील ६ ते १४ वयोगटातील बालकांना जवळच्या शाळेत मोफत व सक्तीचे शिक्षण घेण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे.

### अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा

अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६मध्ये २५ हून अधिक कलमे आहेत. कलम ३ नुसार जागेचा, घराचा, हॉटेलचा अगर वाहनाचा वेश्यागृह चालवण्यासाठी करण्यात येणाऱ्या वापराबद्दल कमीत कमी १ वर्षे आणि जास्तीत जास्त ३ वर्षाची शिक्षा आणि रु.२०००/- पर्यंत दंडाची तरतूद आहे. तर कलम ४ नुसार वेश्या व्यवसाय करायला लावून त्या कमाईवर जगणारे संबंधित मुलीचे पालक, इतर महिला, तिला ठेवणारी घरवाली आदींना ७ ते १० वर्षे मजुरीच्या शिक्षेची तरतूद आहे.

### बालकामगार प्रतिबंधक कायदा - १९८६

या कायद्यानुसार १४ वर्षाखालील बालकांना कामावर ठेवणे गुन्हा आहे. बाल

कामगारांना कामावर ठेवणाऱ्यांना कलम-३ नुसार ३ महिन्यापेक्षा जास्त आणि १ वर्षापर्यंत शिक्षा आणि रु. १०,०००/- ते ५०,०००/- रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होऊ शकते.

**कामाच्या ठिकाणी होणारा महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा**

कामाच्या ठिकाणी होणारा महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा (प्रतिबंध, मनाई व न्याय निवारण) कायदा २०१३ (विशाखा गाईडलाईन्स) नुसार लैंगिक छळ म्हणजे नकोसा शारीरिक संपर्क आणि लगट, लैंगिक वर्तणुकीची मागणी किंवा विनंती, लैंगिक शेरेबाजी, पोर्नोग्राफी दाखवणे, शारीरिक किंवा शाब्दिक किंवा इतर प्रकारे नको असलेले लैंगिक वर्तन करणे होय. संबंधित महिलेला रोजगारात प्राधान्य देण्याचे उघड वा छुपे वचन, कामात अडथळे, रोजगाराला धोका, भयप्रद, अपमानास्पद वागणूक याही कृती लैंगिक छळात अंतर्भूत आहेत. कामाच्या ठिकाणी, निवासाच्या ठिकाणी कामावर असणारी कोणत्याही वयाची स्त्री याविषयी तक्रार करू शकते. सदर स्त्री शारीरिक अथवा मानसिक कारणासाठी सक्षम नसल्यास तिचे सहकर्मचारी, नातेवाईक अगर मैत्रीण ही तक्रार देऊ शकतात. तक्रार लेखी असावी व घटनेच्या तीन महिन्याच्या आत केली जावी.

**विनयभंग**

भारतीय दंड संहिता ३५४ नुसार लज्जा उत्पन्न करणारे वर्तन करणे आणि स्त्रीला मानहानिकारक वाटेल असे बोलणे, गलिच्छ हेतूने स्पर्श करणे म्हणजे विनयभंग. या कायद्यानुसार गुन्हेगारास २ वर्षे मजुरी, दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

बलात्काराबाबत: संविधानाच्या कलम-३७५ मध्ये बलात्काराची व्याख्या, गुन्ह्याची आणि शिक्षेची चर्चा करण्यात आली आहे. कलम-२८८ (ए) नुसार बलात्कारित स्त्रीचे नाव गोपनीय ठेवणे बंधनकारक असून तिचे नाव जाहीर केल्यास २ वर्षे तुरुंगवास आणि दंडाची शिक्षा होऊ शकते. सी.आर.पी. सी.कलम-१६४ (ए)नुसार महिलेच्या वैद्यकीय तपासणीला परवानगी आहे. तर ३२७ (२) नुसार गोपनीय पद्धतीने इन कॅमेरा पीडित महिलेचा जबाब नोंदवण्यात यावा. बलात्कार, बालकांवरील लैंगिक अत्याचार, ॲसिड हल्ल्यातील पीडित महिला व बालक यांना पुन:स्थापक न्यायाची खात्री देण्यासाठी राज्य सरकारने मनोधैर्य ही योजना सुरू केली.

**जातपंचायतीबाहेर वाळीत टाकणे**

सदर गुन्हा दखलपात्र असून जात पंचायती विरुद्ध भारतीय दंड संहिता कलम-१२० (ब) नुसार पूर्वनियोजित कटकारस्थान, कलम-५०३ आणि कलम-३४ नुसार एकाच उद्देशाने, कलम-५३(अ), कलम-३८६ नुसार दहशत निर्माण करणे, कलम-३८९ नुसार भीती दाखवण्याविरोधात गुन्हा दाखल होतो.

## हुंडा प्रतिबंधक कायदा

हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१ च्या कलम ३ नुसार हुंडा घेणाऱ्यास ५ वर्षे सक्त मजुरी आणि रु. १५,०००/- पर्यंत दंडाची शिक्षा आहे. हुंडा मागणी हा देखील गुन्हा असून त्यासाठी ६ महिने पर्यंतची कैद आणि रु.१०,०००/- दंडाची शिक्षा आहे. भारतीय दंड संहिता कलम-४९८ (अ) नुसार लग्नानंतर १० वर्षापर्यंत विवाहितेला पैसे, चीज-वस्तू, सोने यासाठी शारीरिक, मानसिक त्रास देणे गुन्हा आहे. यासाठी १० वर्षापर्यंत सक्त मजुरी व दंडाची शिक्षा होऊ शकते.

**बालकांचे लैंगिक शोषण प्रतिबंधक कायदा- २०१२**

कोणत्याही प्रकारच्या नैसर्गिक किंवा अनैसर्गिक पद्धतीने लैंगिक वर्तन करायला मुलामुलींना भाग पाडणे यासाठी ७ वर्षे सक्तमजुरी ते जन्मठेपेची शिक्षा असून त्यासाठी दंडही ठोठावण्यात येऊ शकतो.

**कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण**

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम-२००५ हा कायदा दिनांक २६.१०.२००६ पासून अमलात आला आहे. त्यानुसार एखादी कृती महिलेच्या मानसिक किंवा शारीरिक आरोग्यास, सुरक्षिततेस, जीवितास, अवयवास, कल्याणास धोकादायक, अपायकारक किंवा उपद्रवी असेल किंवा तसे करण्याकडे कल असेल आणि ज्यामध्ये महिलेचा शारीरिक, लैंगिक, तोंडी, भावनिक किंवा आर्थिक दुरुपयोग होत असेल, अशाप्रकारचे मानहानी करणारे किंवा महिलेच्या प्रतिष्ठेवर इतर मार्गांनी अतिक्रमण करणारे कृत्य, अपमानकारक उपहासात्मक विशेषकरून मूल नसल्यामुळे किंवा मुलगा नसल्यामुळे किंवा आर्थिक प्राप्ती मिळत असेल किंवा त्यास पात्र असेल त्यास हानी पोहोचेल अशा गोष्टींचा कौटुंबिक हिंसाचाराच्या व्याख्येत समावेश आहे. महिला किंवा महिलेच्या नात्यातील व्यक्तीस हुंड्याची मागणी, इतर मिळकत किंवा मौल्यवान वस्तू मिळवण्याकरिता केलेले कृत्य, महिलेसाठी हानिकारक, वेदनाकारक किंवा त्रासदायक स्वरूपाचे व धमकी देण्याच्या उद्देशाने केलेल्या कृत्याविरोधात गुन्हा दाखल करता येतो.

घरात राहण्याचा हक्क : कलम-१७ नुसार प्रत्येक महिलेला जी कौटुंबिक नात्यामध्ये आहे तिला एकत्रित घरात राहण्याचा हक्क आहे. सदर मालमत्तेमध्ये तिचा काही हक्क असो अथवा नसो म्हणून कोणताही पुरुष तिला घराबाहेर घालवू शकत नाही.

आर्थिक लाभ : कलम-२० अन्वये दंडाधिकारी प्रतिवादीला अशा प्रकरणात महिलेला जे नुकसान झाले आहे त्याच्या नुकसान भरपाईसाठी प्रतिवादीने खर्चाची रक्कम द्यावी असे आदेश काढू शकतात. उदा. महिलेच्या उत्पन्नाचे नुकसान, वैद्यकीय उपचारासाठी खर्च, मालमत्तेचे नुकसान, अपत्यांच्या देखभालीच्या खर्चासंबंधित व्यक्तीचे साधारण राहणीमान बघून आर्थिक नुकसान भरपाई मिळते.

मुलांच्या ताब्याचा आदेश : कलम-२१ अन्वये दंडाधिकारी मुलांच्या ताब्याबाबत पीडित महिलेच्या बाजूने मुलाच्या किंवा मुलाच्या हंगामी ताब्याबाबत, आवश्यकता असेल तर प्रतिपक्षाने मुलाला किंवा मुलांना कधी भेटावे याबाबतच्या व्यवस्थेसंबंधीही आदेश काढू शकतात.

- ॲड. वर्षा देशपांडे



# रहा सदैव सतर्क...

सायबर गुन्ह्यांकडे पाहण्याचा आणि हाताळण्याचा दृष्टिकोन जर बदलला तर ह्यांना नियंत्रणात ठेवण्यासाठी आपण प्रयत्न नक्कीच करू शकतो. सेक्स्टॉर्शन हा असाच एक गंभीर गुन्हा आहे, ज्याबद्दल आपल्याला माहिती असायला पाहिजे. सेक्स्टॉर्शन म्हणजे नक्की काय? हा एक लैंगिक शोषणाचा प्रकार असून यात एखाद्या व्यक्तीच्या अश्लील प्रतिमा किंवा त्यांच्याबद्दलची गोपनीय, वैयक्तिक माहिती प्रकाशित करण्याची धमकी देणे आणि न प्रकाशित करण्याच्या बदल्यात खंडणी किंवा इतर काही अश्लील मागण्या बळी पडलेल्या व्यक्तीकडे करण्यात येतात.

Prevention is better than cure ही उक्ती सायबर गुन्ह्यांना नियंत्रणात ठेवण्यासाठी अचूक आहे. बदलत्या सायबर गुन्ह्यांचे स्वरूप पाहता, अशा गुन्ह्यांबद्दल समाजात जागरूकता आणण्याची नितांत गरज आहे. सायबर गुन्ह्यांकडे पाहण्याचा आणि हाताळण्याचा दृष्टिकोन जर बदलला तर मात्र ह्यांना नियंत्रणात ठेवण्यासाठी आपण प्रयत्न नक्कीच करू शकतो. सेक्स्टॉर्शन हा असाच एक गंभीर गुन्हा आहे ज्याबद्दल आपल्याला माहिती असायला पाहिजे. तर सेक्स्टॉर्शन म्हणजे नक्की काय? हा एक लैंगिक शोषणाचा प्रकार असून यात एखाद्या व्यक्तीच्या अश्लील प्रतिमा किंवा त्यांच्या बद्दलची गोपनीय,वैयक्तिक माहिती प्रकाशित करण्याची धमकी देणे आणि न प्रकाशित करण्याच्या बदल्यात खंडणी किंवा इतर काही अश्लील मागण्या त्या लैंगिक शोषणाला बळी पडलेल्या व्यक्तीकडे करण्यात येते.

हा गुन्हा नेमका कशा पद्धतीने करण्यात येतो हे खाली नमूद केलेले आहे.

१) डेटिंग साईटवर गुन्हेगार, टार्गेट केलेल्या डेटरला स्वतःची लैंगिकता स्पष्ट होईल असे फोटो पाठवण्यास उद्युक्त करतो. आणि एकदा डेटरने असे फोटो पाठवले तर मात्र त्या डेटरला आपण कायद्यासाठी काम करणारी व्यक्ती आहे असे सांगतात .आणि डेटर ने पाठवलेले फोटो हे त्याने एका अल्पवयीन व्यक्तीला पाठवल्यामुळे त्यांच्या वर फौजदारी कारवाई होऊ शकते असे सांगून डेटरला घाबरावतात.

कायदेशीर अटक टाळण्यासाठी सांगितलेली रक्कम जमा करण्यास सांगितली जाते. गुन्हेगार फक्त आपण कुठले पोलीस अधिकारी आहेत म्हणून सांगून थांबत नाही तर परिचित आणि अस्तित्वात असलेल्या एखाद्या सरकारी अधिकाऱ्याचे नाव यासाठी वापरतात. अनेक जणांनी अटकेला घाबरून साधारण ५०० ते १,५०० डॉलर एवढे पैसे गुन्हेगारांना दिलेले आहेत.

२) एका गुन्हेगार गटाने महिलांची ऑनलाइन खाती उघडून त्यात सुंदर आणि आकर्षक महिलांचे अनेक फोटो टाकले,ज्यामुळे ऑनलाइन क्लायंट त्यात ओढले जायचे. पुढे मग महिलांचे अश्लील फोटो टाकून,अश्लील संदेश पाठवून अशा क्लायंटना महिलांबरोबर व्हिडीओ चॅट करण्यासाठी त्यांना उद्युक्त केले जायचे . एखादा क्लायंट जेव्हा व्हिडियो चॅटिंग करायचे तेव्हा त्यांचे ते संभाषण क्लायंटच्या मित्रमैत्रिणींना,तसेच कुटुंबातील सदस्यांना पाठवण्याबाबत धमकी द्यायचे. आणि संभाषण न पाठवण्यासाठी क्लायंटला ५०० ते १000डॉलरची खंडणी वेस्टर्न युनियन किंवा अशाच प्रकारच्या इतर सेवा मधून देण्यास सांगत.

### कसे टाळता येईल?

सर्वप्रथम सेक्स्टॉर्शनविषयी बोलणे सुरू करा सेक्स्टॉर्शन करणाऱ्यांचा धंदा हा आपल्या मौनामुळे बळावतो. सेक्स्टॉर्शन ह्या प्रकाराविषयी आपल्या आजूबाजूच्या लोकांना सजग करा. जितक्या जास्त लोकांना याबद्दल सांगता येईल तेवढे सांगा. याबद्दल अधिक माहिती जाणून घ्या. समाजातील वाईट गोष्टींना निर्बंध घालायचा असल्यास त्याबद्दल जागरूकता आणणे गरजेचे आहे.

### इंटरपोल तपास

जगभरातील संघटित गुन्हेगारी जाळ्यांना

## माहिती तंत्रज्ञान कायद्यातील सेक्स्टॉर्शनविषयी असलेले कायदे

### माहिती तंत्रज्ञान कलम ६६

(ई ) अधिनियम, २०००

गोपनीयता उल्लंघन - जो कोणी हेतुपुरस्सर एखाद्या व्यक्तीच्या संमतीशिवाय त्याच्या खाजगी शारीरिक भागांचा फोटो प्रसारित करतो तेव्हा ती व्यक्ती एखाद्या व्यक्तीच्या गोपनीयतेचे उल्लंघन करते. अशा परिस्थितीत ६६(ई ) कायद्यात तरतूद केलेली आहे.

### माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६७

इलेक्ट्रॉनिक फॉर्म मध्ये अश्लील साहित्य प्रकाशित किंवा प्रसारण याबद्दल शिक्षेची तरतूद या कायद्यात आहे.

### माहितीचा तंत्रज्ञान कायदा कलम ६७ ए

लैंगिक स्पष्टता असलेले फोटो अथवा इतर गोष्टींचे प्रकाशन किंवा संक्रमण केल्यास ती व्यक्ती कायद्याप्रमाणे शिक्षेस पात्र असते.

### माहिती कलम तंत्रज्ञान कायदा ६७ बी

चाईल्ड पोर्नोग्राफी इलेक्ट्रॉनिक फॉर्ममध्ये प्रसारित केल्यास ती व्यक्ती कायद्याप्रमाणे शिक्षेस पात्र असते.

भारतीय दंडविधान १८६० यामध्ये कलम ३८७ हे सेक्स्टॉर्शनसाठी आहे.



आळा घालण्यासाठी इंटरपोल आणि इतर देशांच्या गुन्हे शाखांच्या संयुक्त तपासात ५८ गुन्हेगारांना अटक करण्यात आलेली आहे. त्यातल्या तिघांचा संबंध स्कॉटिश किशोरवयीन डॅनियल पेरी याच्या आत्महत्येशी होता. पेरी याने सेक्स्टॉर्शनला कंटाळून मागील जुलैमध्ये एडिनबर्ग येथे फोर्थ रोड ब्रिजवरून उडी मारून आत्महत्या केलेली होती.

इंटरपोल डिजिटल क्राईम सेंटर, हाँगकाँग पोलीस फोर्स, सिंगापुर पोलीस फोर्स ,आणि फिलिपाइन्स नॅशनल पोलीस (पीएनपी) अँटी क्राईम ग्रुप यांनी संयुक्तपणे अशा प्रकारची गुन्हे बाबत माहिती वाटून घेण्याची ही पहिलीच वेळ होती ज्यामुळे संघटित गुन्हेगारी गटांना काम करणाऱ्या सुमारे ११० ते ११५ जणांची यामध्ये ओळख केली गेली.

**- ॲड. प्रशांत माळी**

सायबर सुरक्षा, सायबर कायदेतज्ज्ञ

## इन्फर्मेशन सेक्युरिटीतील करियर

माहिती व तंत्रज्ञानाच्या वेगवान युगात माहितीचा खजिना आता एका क्लिकवर उपलब्ध आहे. या माहितीचा दुरुपयोग वाढला आहे. त्यामुळे मोठमोठ्या कंपन्या, शासकीय, निमशासकीय संस्थांमधील माहिती सुरक्षित ठेवण्यासाठी इन्फरमेशन सेक्युरिटी जाणकारांची गरज असते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाने ही गरज ओळखून एमटेक इन्फरमेशन सेक्युरिटी हा नवीन अभ्यासक्रम सुरू केला आहे. क्विक हिल ॲकॅडमीच्या सहकार्याने सुरू करण्यात आलेला हा अभ्यासक्रम पूर्ण करणारा उमेदवार खासगी उद्योग, शासकीय-निमशासकीय संस्था, संशोधन प्रयोगशाळा आदींमध्ये देश विदेशात नोकरीच्या संधी प्राप्त करू शकतो.

पात्रता : अभियांत्रिकी/तंत्रज्ञानातील कुठल्याही शाखेची पदवी. या क्षेत्रातील व्यावसायीक तसेच नुकतेच पदवी शिक्षण पूर्ण झालेले उमेदवार पात्र असतील.

प्रवेश : चाचणीद्वारे प्रवेश. गणितीय, सामान्य विज्ञान व तंत्रज्ञानावर आधारीत बहुपर्यायी ५० प्रश्नांची परीक्षा घेतली जाते. वेळ दोन तास. निगेटिव्ह मार्किंग पद्धत लागू.

अर्जाचे शुल्क : खुल्या वर्गासाठी रुपये १००० तर राज्यातील आरक्षित वर्गासाठी रुपये ५००. निवड झालेल्या उमेदवारांना चाचणीच्या गुणांकानुसार व मुलाखतीतील कामगिरीवर आधारित क्विक हिल ॲकॅडमीकडून स्पॉन्सरशीप दिली जाईल.

एकूण विद्यार्थिसंख्या : 30

संपर्क : ०२०-२५६०१२७०/७१, ०२०-२५६९००५५/५६

संकेतस्थळ:

http://www.unipune.ac.in/dot/

# कर्तृत्वाचा ठसा...

संघ लोकसेवा आयोगाची परीक्षा करिअरचा उत्तम राजमार्ग आहे. मुलींनी या परीक्षेकडे संधी म्हणून पाहावे, आव्हान म्हणून नव्हे. मेहनत, वक्तशीरपणा, संवेदनशील, विनयशील असे अनेक गुण अंगी असल्याने या परीक्षेत यश मिळवणे मुलींना सहज शक्य होते. गरज आहे ती स्वत:ला ओळखण्याची. हम भी किसीसे कम नही हे सिद्ध करून दाखवण्याची. मुलींनी मोठी स्वप्ने पाहावी, आपले ध्येय साध्य करणार ही खूणगाठ मनाशी बांधावी.

**अशी वळले युपीएससीकडे**

मी मूळ दिल्लीची. वडील व्यावसायिक मात्र मला वडलांचे क्षेत्र भावले नाही. आपल्या कार्यामुळे, निर्णयांमुळे अधिक जणांचे भले व्हावे असे विचार डोक्यात पक्के होते. त्यामुळे बीटेकच्या तृतीय वर्षाला असतानाच या परीक्षेच्या तयारीला लागले. अगदी सुरुवातीला वृत्तपत्रीय वाचन वाढवून तयारीचा श्रीगणेशा केला. अभ्यासाला/तयारीला दिशा मिळावी यासाठी शिकवण्या लावल्या, मात्र स्वअभ्यासावर अधिक भर दिला. २०१२ मध्ये पहिला प्रयत्न अयशस्वी झाला.



निमा अरोरा, (भा.प्र.से., २०१४)

**मास्टर स्ट्रोक**

पहिल्या प्रयत्नात अपयश आले मात्र यानंतरचा प्रयत्न दुसरा आणि शेवटचा असेल असा निर्धार केला. दरम्यानच्या काळात लोकप्रशासन विषयात पदव्युत्तर पदवी मिळवली. एका संस्थेत गरीब मुलांना मोफत शिकवण्याचे कार्य पार पाडत अभ्यास केला. या मुलांना शिकवताना मानसिक समाधान मोठ्या प्रमाणावर मिळाले. अनेकजण या परीक्षेच्या तयारीदरम्यान सभोवतालच्या जगापासून स्वत:ला दूर करतात, परंतु ही परीक्षा आपल्या व्यक्तिमत्त्वाची चाचणी घेणारी असते.

आजघडीला असे एकही क्षेत्र नाही की जेथे महिलांनी आपल्या कर्तत्वाचा ठसा उमटवला नाही. लष्करापासून उद्योग तर बँकिंगपासून क्रीडाक्षेत्रात महिला आघाडीवर आहेत. युपीएससीची परीक्षाही त्याला अपवाद नाही. या परीक्षेत यशस्वी होणाऱ्या महिला आयएएसचा आलेख सतत उंचावतांना दिसत आहेत, तो त्यांच्या वेगळेपणामुळेच. नंदुरबार येथे सहायक जिल्हाधिकारी असलेल्या निमा अरोरादेखील त्यापैकीच एक. आपली नाळ समाजाशी जोडलेली राहावी यासाठी त्यांनी आयएएस होण्याचे ठरवले. दुसऱ्याच प्रयत्नात यशही मिळवले. यशापर्यंतचा प्रवास, महिलाशक्ती व स्पर्धा परीक्षांतील संधी याविषयी बोलताहेत निमा अरोरा...

लोकांसाठीच आपल्याला पुढे काम करायचे असते, त्यामुळे स्वत:ला जगापासून दर ठेवू नये असे मला वाटते. दुसऱ्या प्रयत्नात यश मिळवण्याचा माझा निर्धार होता. मुलांना शिकवत असताना तयारीकडेही लक्ष दिले. सन २०१३ च्या परीक्षेसाठी सूत्रबद्ध अभ्यास केला. दुसऱ्या प्रयत्नातच पूर्व, मुख्य परीक्षा व मुलाखत या तीनही पातळ्यांवर स्वत:ला सिद्ध करत २०१४ च्या बॅचमध्ये आयएएस झाले.

**अभ्यास**

या परीक्षेसाठी ठरवून दिलेला अभ्यासक्रम आपण सदैव डोळ्यासमोर ठेवून अभ्यास करावा. तासन्‌तास वाचण्यापेक्षा विविधांगी पद्धतीने अभ्यास करायला हवा. आपण रट्टा मारण्याचा शिरस्ता अवलंबला तर आपण कल्पकता हरवून बसण्याची भीती असते. त्यामुळे ती अबाधित ठेवण्यासाठी आपण समाज, मित्रांसोबत जोडलेलो राहू याची काळजी घ्यायला हवी. त्यासोबतच अभ्यासक्रमाच्या कक्षेच्या बाहेर जाऊन गत चार-पाच वर्षांच्या प्रश्नपत्रिका अभ्यासाव्यात, त्यांचे स्वरूप लक्षात

## यशाची सूत्रे

- या परीक्षेच्या तयारीदरम्यान माहितीसाठी इंटरनेटवरील अधिकृत संकेतस्थळांचा वापर करा.
- युपीएससी परीक्षेच्या तयारीदरम्यान प्रामाणिक राहा, गंभीर नाही.
- मार्गदर्शनासोबतच परिश्रमावर अधिक भर द्या.
- स्वत:चे टिपण काढा. परीक्षाजवळ आल्यानंतर उजळणीसाठी वेळ द्या.
- ही परीक्षा आता सनावळींसारख्या वस्तुनिष्ठ प्रश्नावर नसून संकल्पनेवर आधारित असल्याने अभ्यास करतांनाही घटना आणि कार्यकारण भाव समजून घ्या.
- तासन्तास अभ्यास करू नका. अभ्यासाच्या विविध पद्धतींचा अवलंब करा.
- चार-पाच वर्षांच्या जुन्या प्रश्नपत्रिका समजून घेऊन आयोगाला अपेक्षित उत्तरे लिहा.
- अभ्यासासाठी धोरण ठरवा/ नियोजन करा.
- लेखनशैली सुधारण्यासाठी जास्तीत जास्त लेखन करा.

घ्यावे. आयोगाला काय अपेक्षित आहे याची कल्पना आपल्याला आल्यास या परीक्षेत यश मिळवणे सोपे होते.

वृत्तपत्रीय वाचन करताना महत्त्वाची वृत्तपत्रे वाचायला हवीत. त्यातही राजकीय बातम्यांमध्ये वेळ न दवडता संपादकीय, राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय घडामोडीचे वाचन करावे. अभ्यासाचा अल्पावधी आराखडा तयार करून तयारीत सातत्य ठेवावे, धोरणात्मक तयारी करावी.

या परीक्षेसाठी आयुष्याची चार-पाच वर्षे वाया जाणार नाही याची काळजी घ्यावी. कारण दुसऱ्या-तिसऱ्या प्रयत्नानंतर नैराश्य चिंता वाटू लागते, त्यामुळे पहिला-दुसऱ्या प्रयत्नातच यशस्वी होण्याचा निर्धार करावा.

### लेखन

लेखनाच्या माध्यमातून युपीएससीच्या परीक्षेत चांगले गुण मिळवता येतात. प्रभावी व ओघवत्या लेखनशैलीसाठी आपल्याला शक्य होईल तेवढे लिखाण करायला हवे. संपादकीय वाचनातून लेखनशैली सुधारण्यास मदत होते. एखाद्या घटनेचे विविध कंगोरे आपल्या लिखाणात यायला हवे. लिखाणासाठी मला ऑनलाइन साइट्सचा खूप उपयोग झाला. विविध महत्त्वाच्या मुद्द्यांवर आपली मते मांडण्याची सुविधा ऑनलाइन साईट्सवर उपलब्ध असते.

### मार्गदर्शन

या परीक्षेची तयारी करणाऱ्या मित्रांकडून मला बरीच मदत मिळाली. माझ्या मामांचेही मोलाचे मार्गदर्शन मिळाले. त्यांनीसुद्धा या परीक्षेची तयारी केली होती, त्यामुळे ते वेळोवेळी मार्गदर्शन करत राहिले. दरम्यान मला इन्टेलिजन्स ब्यूरोमध्ये मुलाखतीसाठी बोलावणे आले होते. मात्र माझे ध्येय पक्के असल्याने मी त्या दृष्टीने पाऊल टाकत राहिले.

### मुलाखत

आपल्या बालपणापासून ते या मुलाखतीपर्यंतच्या वाटचालीवर मुलाखत आधारलेली असते. शिवाय आपल्यातील आत्मविश्वास पाहिला जातो. त्यामुळे मुलाखत देताना आपण तणावमुक्त असायला हवे. यासाठी आपण मुलाखतीचा सराव करायला हवा. आपल्या उत्तरात प्रामाणिकता असावी. मुली मुलाखतीत चांगले गुण मिळवतात ते त्यांच्या प्रामाणिक उत्तरांमुळेच. ग्रामीण भागातील उमेदवारांना थोडे इंग्रजीवर काम करावे लागते. ही भाषा सुधारण्यासाठी द हिंदू, इंडियन एक्स्प्रेस आदी नामांकित दैनिकांचे नियमित वाचन करावे. मुलाखत मात्र इंग्रजीमधूनच दिली पाहिजे असे नाही. मातृभाषेतूनही देता येते.



प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर आपल्या सहकाऱ्यांसोबत निमा अरोरा.

### मैत्रिणींनो

स्पर्धा परीक्षा स्वत:च्या पायावर उभे राहण्याचा राजमार्ग आहे. युपीएससी परीक्षेत यश मिळेलच असेही नाही, मात्र हे शक्य न झाल्यास आपण इतर स्पर्धा परीक्षा देऊन इतर महत्त्वाच्या नोकऱ्या मिळवू शकतो. यामुळे मानसिक तणावाला सामोरे जावे लागणार नाही. आपल्या हाती एखादी नोकरी असेल तर अधिक आत्मविश्वासाने आपण या परीक्षेची तयारी करू शकतो. एक वर्ष मार्गदर्शन व नियोजनबद्ध अभ्यास केल्यास तुम्हाला आयएएस होण्यापासून कोणीही रोखू शकत नाही.

– राजाराम देवकर

# स्पर्धा परीक्षेची पूर्वतयारी

स्पर्धा परीक्षा देऊन अधिकारी होण्याचे स्वप्न विद्यार्थी पाहतात. परंतु स्पर्धा परीक्षेची पूर्वतयारी नेमकी कशी करावी याबाबत अनेकांच्या मनात संभ्रम असतो. या परीक्षांमध्ये यश मिळवायचे असेल तर आपली तयारी परिपूर्ण हवी. यासाठी कुठलाही संभ्रम मनात राहायला नको.

कोणतीही नोकरी मिळवायची असेल तर त्यासाठी प्रचंड स्पर्धा आहे. या स्पर्धेत टिकायचे असेल तर प्रचंड मेहनत करावी लागेल. विशेषत: मोठ्या हुद्द्यांच्या नोकरीसाठी तर अधिक मेहनत घ्यावी लागेल. काही विद्यार्थी अशी मेहनत बालवयापासून घेतात तर काहीजण पदवी परीक्षेनंतरही नोकरीसाठी मेहनत घ्यायला सुरुवात करतात. त्यामध्ये जे अधिक मेहनत घेतील ते यशस्वी होतात व जे मेहनत घेत नाही. त्यांना सतत अपयश येते. त्यामुळे स्पर्धा परीक्षेची तयारी करताना कशी मेहनत घेतली पाहिजे हे माहीत असणे गरजेचे आहे.

### निश्चित ध्येय ठरवा

प्रारंभी स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यापूर्वी आपणास नेमकी कुठली परीक्षा द्यायची आहे हे मनामध्ये पक्के केले पाहिजे. मुख्यत: विद्यार्थी एमपीएससी व युपीएससी या दोन परीक्षांचीच तयारी करताना दिसतात. युपीएससी परीक्षेची तयारी केल्यानंतर सर्वच परीक्षेची तयारी होऊ शकते हे बऱ्याच विद्यार्थ्यांना माहीत नसते कारण युपीएससीचा अभ्यासक्रम हा खूप विस्तारित असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांना भरपूर वाचन करावे लागते. याचा फायदा अन्य परीक्षांसाठी होतो. उदाहरणात बँक, स्टाफ सिलेक्शन, पोस्ट ऑफिस, रेल्वे व जिल्हा निवड मंडळाच्या विविध परीक्षा.

### वेळेचे नियोजन

या सर्व परीक्षांसाठी वेळ सर्वांत जास्त महत्त्वाचा असतो. तुम्हाला कुठलीही स्पर्धा परीक्षा अमर्याद वेळ पूर्वतयारीसाठी देत नाही. एक दीड वर्ष, कधी तीन ते चार महिने असाच वेळ तुमच्याकडे असतो. तुमच्याकडे या परीक्षांच्या पूर्वतयारीकरिता निश्चित किती वेळ आहे, याचा अतिशय स्पष्ट अंदाज पूर्वतयारी सुरू करायच्या आधी प्रत्येकाकडे असायला हवा.

आपल्याकडे पूर्वतयारी करण्यासाठी लागणारा कालावधी जरी दिवसात असला, तर त्याला प्रथमत: तासात परावर्तित करा. तेवढे तास तुमच्याकडे उपलब्ध आहेत. यावर आधारित अभ्यासाचे वेळापत्रक तयार करा. वेळापत्रक तयार झाल्यानंतर ते उघडून पाहून मी दिवसाला किती तास अभ्यास करतो हे जाणून घ्या. सरासरी तेवढे तास प्रत्येक दिवशी जरी अभ्यास केला, तर माझ्याकडे असलेल्या दिवसात माझा 'सर्वोत्कृष्ट अभ्यास' मला संपूर्ण करता येईल का? की तो कालावधी कमी पडेल? मग मला माझ्या दिनचर्येत बदल करावा लागेल का? दिवसाचे अभ्यासाचे तास वाढवावे लागतील का? याबाबत ठरवा.

### अभ्यासक्रम समजून घ्या

स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करताना सुरवातीला अभ्यासक्रम माहिती असणे गरजेचे आहे कारण त्यावरच अभ्यासाची दिशा निश्चित होते व त्यासाठी लागणारे वाचन साहित्य, नोट्स, पुस्तके यांची जमावाजमव करावी लागते. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या बहुतांश विद्यार्थ्यांना आज परीक्षेचा अभ्यासक्रम आणि गवतर्षीच्या प्रश्नपत्रिका यांचा गंध नसतो. जेव्हा तुम्ही स्पर्धा परीक्षेला बसण्याचा निर्णय घेता, तेव्हाच तुम्हाला या दोन्ही गोष्टी मिळवून, तपशीलवारपणे वाचणे आवश्यक आहे. परीक्षेचा अभ्यासक्रम शक्य असल्यास, उमेदवारांनी तोंडपाठ करून टाकावा.

### वाचनसाहित्य

स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासात अभ्यास साधने, पुस्तकांची निवड फार महत्त्वाची ठरते. त्यामुळे पंधरा-वीस पुस्तके एकाच विषयासाठी वाचणे प्रत्येकाला शक्य होईलच, असं नाही. या अभ्यासाकरिता कमीतकमी व सर्वाधिक चांगली पुस्तके वाचणे महत्त्वाचे आहे. स्पर्धा परीक्षेत तुम्ही

पुस्तकांची जितकी उजळणी कराल, तेवढ्याच प्रमाणात तुम्हाला ते आठवण्याची शक्यता जास्त असते.

विशेषकरून जिथे बहुपर्यायी प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतात. तिथे माहिती तुमच्या तोंडावर असणे आवश्यक असते. एकाच विषयासाठी वेगवेगळी भारंभार पुस्तके वाचून एक तर तुम्ही गोंधळून जातात. दुसरे या सगळ्याची मिळून एकदा किंवा दोनदाच उजळणी होऊ शकते. मूळ पुस्तके वाचतानाच तुम्ही इतका वेळ घेतलेला असतो की, मग उजळणीला वेळच उरत नाही. त्यामुळे परीक्षेत यश मिळत नाही! कुणीतरी सांगितले किंवा मित्रांनी शिफारस केली म्हणून पुस्तक विकत घेऊ नका. तर जे विद्यार्थी पूर्वी परीक्षा उत्तीर्ण झाले आहे, त्यांच्या सल्ल्याने पुस्तके घेतल्यास ते फायदेशीर ठरू शकते. अभ्यासक्रमाचे आणि प्रश्नपत्रिकांचे भान ठेवूनच तुमच्या स्वत:करिता एक चांगला नियम कायम लक्षात ठेवा. जे पुस्तक तुम्हाला तुमच्या परीक्षेच्या अभ्यासक्रमाच्या आणि प्रश्नपत्रिकांच्या संदर्भात एकही मार्क मिळवायला मदत करत नाही, ते कितीही चांगले असले, तरी वाचण्याची गरज नाही.

### परीक्षेचे टप्पे समजून घ्या

स्पर्धा परीक्षेच्या पूर्वतयारीत परीक्षेची संपूर्ण व्यवस्था नीट समजून घेणे गरजेचे असते. म्हणजे परीक्षा किती टप्प्यात घेतली जाते? ती बहुपर्यायी आहे की वर्णनात्मक आहे. का नुसती मुलाखतीवर आधारित आहे. जर परीक्षेत एकाहून अधिक टप्पे असतील तर त्यामध्ये प्रत्येकाला गुण किती आहेत ? सर्वात जास्त गुण कुठल्या टप्प्याला आहेत? त्या टप्प्याविषयी माझी तयारी कितपत आहे? याचे अवलोकन करा. जो परीक्षेचा पहिला टप्पा आहे, त्याच्या अभ्यासाची सुरुवात सगळ्यात शेवटी करा.

थोडक्यात शेवटाकडून प्रारंभाकडे या. या परीक्षांमध्ये बऱ्याचदा टप्पे विभिन्न असले, तरी त्याचा अभ्यास एकत्रच करायचा असतो. अशा वेळेस ज्या टप्प्यांचा अभ्यास तुम्ही करताय, त्याच्या गुणांच्या टक्केवारीनुसार तुमच्या एकूण काळाचा भाग त्या टप्प्याला द्या.

### सकारात्मक विचार

स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासाकरिता वातावरणनिर्मिती हा फार महत्त्वाचा घटक आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यातले एक महत्त्वाचे ध्येय म्हणून स्पर्धा परीक्षेकडे पाहत असता. काहीजण नोकरी सोडून परीक्षेची तयारी करत असतात. काहीजण आपले सारे मित्रमैत्रिणी, सामाजिक जीवन, परिवार यांना दूर ठेवून अभ्यास करत असतात. अशा वेळी अनेकदा एकटेपणा जाणवत असतो. परंतु हा एकटेपणा भविष्यात आपणास यशाकडे घेऊन जात असतो, त्यामुळे कधीही नैराश्यवादी किंवा एकटेपणाची भावना मनात ना बाळगता मी भविष्यासाठी लढतो आहे असा सकारात्मक विचार करा.

### मार्गदर्शन

बऱ्याचदा आपण घरी करत असलेला अभ्यास परीक्षेच्या दृष्टीने अपुरा पडतो का असा विचार मनात येतो. तेव्हा एखादी शिकवणी लावण्याबाबत मनामध्ये विचार येतात. खरेतर कुठलाही अभ्यास करताना आपल्याला मार्गदर्शकाची मदत होऊ शकते कारण मार्गदर्शनामुळे आपण लक्षकेंद्रित पद्धतीने अभ्यास करू शकतो. त्यामुळे वाचनाचा फापटपसारा व वेळ वाचू शकतो, त्यामुळे शिकवणी वर्ग लावण्यास हरकत नाही.

आपण अशा वर्गामध्ये किमान दोन ते तीन तास नवीन शिकत असतो व ते सर्व आपल्या डोक्यात शिरत असते. त्याचबरोबर अभ्यासासाठी एक ग्रुप तयार केल्यास त्याचा फायदा होऊ शकतो.

यशस्वी उमेदवार अशा ग्रुपचा फायदा झाल्याचे सांगतात. अलीकडे मोठ्या प्रमाणात प्रत्येक ठिकाणी अभ्यासिका निर्माण झाल्या आहेत. अशा अभ्यासिकेत स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे अनेक विद्यार्थी असतात. त्यांच्यामधून चांगला ग्रुप मिळू शकतो म्हणून अभ्यासिका लावणे गरजचे आहे.

एकंदरीतच स्पर्धा परीक्षेची तयारी करताना काळजीपूर्वक नियोजन करून त्याची अंमलबजावणी केल्यास व अभ्यासात किमान दोन ते तीन वर्ष सातत्य ठेवल्यास निश्चितपणे कुठले ना कुठले पद मिळू शकते.

**– डॉ. बबन जोगदंड**
संशोधन अधिकारी, यशदा, पुणे
संपर्क: ०९८२३३३८२६६

## सराव

रोजचा अभ्यास हा स्पर्धात्मक परीक्षेचा मूलमंत्र आहे. तुम्ही नियोजन न करणारे, वेळेत अभ्यास न करणारे, आयत्यावेळी अभ्यासाचा डोंगर उपसणारे असाल तर स्पर्धा परीक्षा तुम्हाला चकवा देऊन जाते. संपूर्ण अभ्यासक्रम काटेकोर नियोजनाने पूर्ण करणे आणि त्यांच्या ४-५ उजळण्या करणे हे जोपर्यंत तुमच्या हातून घडत नाही तोपर्यंत यशाचे दार तुमच्यापासून खूप दूर असेल !



स्पर्धा परीक्षा ही वेळेची जशी परीक्षा आहे तशीच सरावाची देखील आहे, त्यामुळे प्रत्यक्ष चाचणी प्रश्नपत्रिका वेळ लावून सोडवणे, अशा परीक्षांच्या अभ्यासातील अनिवार्य घटक असतो. शक्य असल्यास प्रत्यक्ष प्रश्नपत्रिका ज्या वेळेत सामान्यत: घेतली जाते. ती वेळ निवडून घड्याळ लावून प्रश्नपत्रिका सोडवाव्यात. याचा एक महत्त्वपूर्ण फायदा असा की जेव्हा तुम्ही सराव करताना प्रश्नपत्रिका एक विशिष्ट वेळेतच सोडवता, तेव्हा तुमच्या शरीराला आणि मेंदुलाही 'त्या वेळेत' अलर्ट राहण्याची सवय होते. हीच सवय तुम्ही जेव्हा खरीखुरी परीक्षा देत असता तेव्हा कामाला येते. यामधून यशाचा मार्ग सापडू शकतो.

# आईबाबांची घ्या काळजी, अन्यथा...

केंद्र शासनाने ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी, आईवडील, ज्येष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणासाठी अधिनियम, २००७, पारित केला आहे. हा अधिनियम राज्यात दिनांक १ मार्च, २००९ पासून लागू करण्यात आला आहे. या कायद्यांतर्गत ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या पाल्यांकडून निर्वाह खर्च देण्याची महत्त्वपूर्ण तरतूद आहे.

**राज्यातील ज्येष्ठ नागरिकांची अंदाजित लोकसंख्या एक कोटी इतकी आहे. शिक्षणाचे प्रमाण वाढल्याने व रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्यामुळे तरुण वर्ग व्यवसाय, नोकरी निमित्त ग्रामीण भागातून शहराकडे स्थलांतरित होत आहे. स्थलांतराच्या वाढत्या प्रमाणाबरोबरच विभक्त कुटुंबपद्धती रूढ होत आहे. छोटे कुटुंब, राहण्यासाठी छोटी जागा, इत्यादी कारणांमुळे ज्येष्ठ नागरिकांच्या समस्यांमध्ये वाढ होत आहे. मात्र कायदा व शासन ज्येष्ठ नागरिकांच्या पाठीशी आहे. त्यांच्यासाठी असलेल्या कायद्याची चोख अंमलबजावणी होत आहे.**



कायद्यातील तरतुदी (सन २००७ चा अधिनियम क्र ५७)

■ कलम १ : हा कायदा जम्मु-काश्मिर वगळता संपूर्ण भारतातील ज्येष्ठ नागरिक व भारताबाहेरील भारतीय ज्येष्ठ नागरिकांना लागू आहे.

■ कलम २ व्याख्या- मुले: यामध्ये मुलगा, मुलगी, नात, नातू यांचा समावेश आहे. निर्वाह भत्ता : यामध्ये अन्न, कपडेलत्ते, निवारा, वैद्यकीय सोयी-सुविधा व उपचार यांचा समावेश होतो.

(३) पालक : यामध्ये आई-वडील, नैसर्गिक पालक, दत्तक पालक, तसेच सावत्र वडील, सावत्र आई यांचा समावेश होतो.

(४) मालमत्ता : यामध्ये चल, अचल संपत्ती, स्व:कष्टार्जित अथवा वारसा हक्काने प्राप्त झालेली संपत्ती.

(५) ज्येष्ठ नागरिक : कोणतीही भारतीय स्त्री व पुरुष व्यक्ती, ज्यांचे वय वर्षे ६० अथवा त्यापेक्षा जास्त आहे, त्यांना ज्येष्ठ नागरिक असे संबोधण्यात येते.

(६) न्यायाधिकरण : या कायद्याचे कलम ७ अंतर्गत निर्वाहभत्ता निश्चित करण्यासाठी गठित करण्यात आलेले न्यायाधिकरण.

■ कलम ४ : कायद्याचे कलम ४(१) प्रमाणे जे ज्येष्ठ नागरिक हे स्वत:च्या उत्पन्नामधून अथवा त्यांच्या मालमत्तेमधून, स्वत:चा चरितार्थ चालवू शकत नाहीत, अशा व्यक्तींना चरितार्थासाठी कलम-५, प्रमाणे निर्वाहभत्त्यासाठी संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, यांचेकडे अथवा संबंधित जिल्ह्यातील, विभागाचे उपविभागीय अधिकारी (महसूल) तथा अध्यक्ष, ज्येष्ठ नागरिक न्यायाधिकरण यांच्याकडे अर्ज दाखल करता येईल.

■ कलम ५ : या कलमान्वये निर्वाह भत्त्यासाठी अर्ज दाखल करता येईल. न्यायाधिकरण अशा प्रकरणात स्वत: दखल घेईल.

■ कलम ६ : न्यायाधिकरणाचे कार्यक्षेत्र

या कायद्यांतर्गत अपिलावरील सुनावणी ही अर्जदार हा ज्या ठिकाणी वास्तव्य करतो अथवा मुले, नातेवाईक ज्या कार्यक्षेत्रात वास्तव्य करतात अशा कोणत्याही न्यायाधिकरणाचे कार्यक्षेत्रात सुनावणी घेण्यात येईल.

■ कलम ७: (१) या कायद्यांतील कलम ७ (१) प्रमाणे हा कायदा अस्तित्वात आल्यापासून ६ महिन्यात राज्य शासन जिल्ह्याच्या प्रत्येक उपविभागात एक अथवा त्यापेक्षा जास्त अशी न्यायाधिकरणे स्थापन करील. ७(२) प्रमाणे या न्यायाधिकरणावर अध्यक्ष म्हणून, उपविभागीय अधिकारी किंवा त्यापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येईल. निर्वाहभत्त्यासंदर्भात प्राप्त तक्रारींवर कार्यवाही करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या उप विभागासाठी न्यायाधिकरण गठित करण्यात येईल. प्रत्येक विभागासाठी 'पीठासीन अधिकारी' म्हणून उपविभागीय अधिकारी (महसूल) यांची नियुक्ती केली आहे.

■ कलम ८: कायद्यातील कलम ८(१) प्रमाणे प्राप्त अर्जावर, ज्येष्ठ नागरिक न्यायाधिकरणाकडे, सुनावणी घेऊन त्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

कलम ८ (२) प्रमाणे न्यायाधिकरणास, शपथेवर पुरावे दाखल करून घेणे, साक्षीदार यांना सुनावणीसाठी उपस्थित राहण्यासाठी बाध्य करणे, कागदपत्रे दाखल करणे व त्याची खात्री करणे इत्यादी बाबत दिवाणी न्यायालयाचे अधिकार आहेत.

■ कलम ९: (१) कलम ९(१) प्रमाणे ज्येष्ठ नागरिक यांची मुले, नातेवाईक अथवा पाल्य यांनी ज्येष्ठ नागरिकांची काळजी

घेण्यास निष्काळजीपणा दाखवल्यास, नकार दिल्यास, तसेच ही बाब चौकशीनंतर सिद्ध झाल्यास व निष्काळजीपणा करत असल्याचे, न्यायाधिकरणाचे मत झाल्यास, न्यायाधिकरणाला आदेशित करेल.

(२) कलम ९(२) प्रमाणे न्यायाधिकरण जास्तीत जास्त मासिक निर्वाहभत्ता निश्चित केल्याचे आदेशीत करेल. तथापि, पाल्यांकडून देण्यात येणारी चरितार्थासाठी रक्कम रुपये १०,०००/- प्रतीमहा पेक्षा जास्त असणार नाही.

■ कलम ११ : चरितार्थ आदेशाची अंमलबजावणी

कलम ११(१)(२) प्रमाणे निर्वाह न्यायाधिकरणाने पारित केलेले आदेश, कोणतेही शुल्क न आकारता, ज्येष्ठ नागरिकांना मोफत देण्यात येतील.

कलम ११(२) या कायद्यांतर्गत न्यायाधिकरणाने पारित केलेला आदेश, हे गुन्हेगारी दंडसंहिता १९७३ मधील प्रकरण ९ मध्ये दिलेल्या आदेशाइतकेच महत्त्वाचे व परिणामकारक असतील.

■ कलम १३ : न्यायाधिकरणाने चरितार्थ व कल्याणासाठी मंजूर केलेले आदेश व त्यामध्ये निर्देशित केलेली रक्कम आदेश पारित केल्याच्या दिनांकापासून 30 दिवसांत, मुले अथवा नातेवाईक यांनी ज्येष्ठ नागरिक यांना न्यायाधिकरणाच्या आदेशामध्ये नमूद केलेल्या सूचनांनुसार देणे बंधनकारक आहे.

■ कलम १५: कलम १५ (१)(२) प्रमाणे न्यायाधिकरणाच्या आदेशाविरुद्ध अपील दाखल करण्यासाठी, राज्य शासन अधिसूचनेद्वारे प्रत्येक जिल्ह्यात १ अपिलीय न्यायाधिकरण स्थापन करेल. हे न्यायाधिकरण अध्यक्ष म्हणून जिल्हाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करेल.

■ कलम १६: कायद्याचे कलम १६(१) प्रमाणे न्यायाधिकरणाच्या आदेशाबाबत ज्येष्ठ नागरिकांचे अथवा पालकांचे समाधान न झाल्यास संबंधितांना, या आदेशाविरुद्ध ६० दिवसाच्या आत अपिलीय प्राधिकरणाकडे अपील दाखल करता येईल. तथापि न्यायाधिकरणाने निश्चित केलेला निर्वाहभत्ता नातेवाईकांकडून ज्येष्ठ नागरिकांना देणे अपेक्षित आहे व तसे आदेशित केलेले आहे, ती रक्कम ज्येष्ठ नागरिक यांना अपिलीय प्राधिकरणाचे आदेश होईपर्यंत देणे बंधनकारक राहील.

■ कलम १७ : कायदेशीर बाजू मांडण्याचा हक्क

या कायद्यांतर्गत काहीही नमूद केले असले तरी पक्षकारांना न्यायाधिकरण किंवा अपिलीय प्राधिकरण यांच्यासमोर बाजू मांडण्यासाठी वकिलांमार्फत प्रतिनिधित्व करता येणार नाही.

■ कलम १८ : कायद्याच्या कलम १८(१) प्रमाणे राज्य शासन, जिल्हा समाज कल्याण अधिकारी (साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण) यांना अथवा त्यांच्यापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याची पदसिद्ध निर्वाहअधिकारी म्हणून नियुक्ती करेल.



■ कलम १९ : या कायद्याचे कलम १९ (१) प्रमाणे राज्य शासन सोयींच्या ठिकाणी ज्येष्ठ नागरिकांची संख्या विचारात घेऊन १५० क्षमतेचे सर्व सोईसुविधांनी युक्त असे प्रत्येक जिल्ह्यात कमीत कमी एक वृद्धाश्रम टप्प्याटप्प्याने स्थापन करील.

■ कलम २० : ज्येष्ठ नागरिकांचे आरोग्य व वैद्यकीय देखभालीबाबत करावयाच्या उपाय योजना

(१) कलम २०(१) शासकीय दवाखाने, तसेच शासन मान्यता प्राप्त अनुदान तत्त्वावरील दवाखाने यामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी बेडची सुविधा उपलब्ध करून देतील. (२) कलम २० (२) रुग्णालयात ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र रांगांची व्यवस्था करण्यात येईल. (3) कलम २० (3) दुर्धर आजारावरील उपचार तसेच असाध्य आजार यावरील उपचार ज्येष्ठ नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येतील. (४) कलम २०(४) जेष्ठ नागरिकांचे दुर्धर आजार तसेच वयोपरत्वे झीज होणाऱ्या आजारांवर संशोधनात्क उपक्रम हाती घेण्यात येतील. (५) कलम २०(५) प्रत्येक रुग्णालयामध्ये वृद्धापकाळाने ग्रस्त ज्येष्ठ नागरिकांसाठी, स्वतंत्र व्यवस्था असावी, तसेच यासाठी वृद्धापकाळाच्या आजाराचे ज्ञान असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येईल.

■ कलम २१ : कायद्याचे कलम २१ अंतर्गत राज्य शासन पुढील उपाययोजना करेल. (१) या कायद्यांतर्गत करण्यात आलेल्या तरतुदींची दूरदर्शन, रेडिओ व मुद्रित माध्यमे यांच्यामार्फत व्यापक प्रमाणात वारंवार प्रसिद्धी करण्यात येईल.

(२) या कायद्याची अंमलबजावणी करणारे केंद्र व राज्य शासनाचे अधिकारी पोलीस अधिकारी, तसेच न्यायिक सेवांमधील सदस्य यांच्यासाठी संवेदना जागृती व जाणीवजागृतीबाबत वारंवार प्रशिक्षण आयोजित करण्यात येईल. (3) कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विधी, गृह, आरोग्य विभाग, तसेच संबंधित सर्व विभाग यांच्यामध्ये समन्वय ठेवण्यात येईल. या अंमलबजावणीबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात येईल.


■ कलम २४ : या कायद्यांतर्गत ज्येष्ठ नागरिकांच्या पालन पोषणाची जबाबदारी असलेली मुले, पालक अशा व्यक्तींनी ज्येष्ठ नागरिकांना, कायमस्वरूपी अथवा तात्पुरते सोडून देण्याच्या उद्देशाने कृती केली असल्यास या कायद्यांतर्गत असे करणाऱ्या व्यक्तीस 3 (तीन) महिन्यांपर्यंत तुरुंगवास/अथवा रुपये ५,०००/- पर्यंतचा दंड अथवा दोन्ही शिक्षांची तरतूद करण्यात आली आहे.

■ कलम २५ : या कायद्यान्वये कलम २५(१) प्रमणे गुन्हेगारी संहिता १९७३ अंतर्गत काहीही नमूद असले तरी या कायद्यांतर्गत घडलेला गुन्हा 'दखलपात्र' व 'जामीनपात्र' आहे.

**- पीयूष सिंह**

आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे

# संधी कौशल्य विकासाची...




दीपक कपूर

भा.प्र.से., प्रधान सचिव,
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग


राज्यातील अधिकाधिक युवक-युवतींना रोजगार/ स्वयंरोजगार करण्यास सक्षम बनवणे याकरिता कौशल्य विकास व उद्योजकता विभाग प्रयत्नशील आहे. त्यासाठी शासकीय निधीबरोबरच नामांकित कंपन्यांच्या सीएसआर निधीचा वापर करून विविध उपक्रम राबवले जात आहेत.

सद्य:स्थितीत देशातील ६२% लोकसंख्या १५-५९ या कार्यप्रवण वयोगटातील आहे.तसेच ५४% लोकसंख्या वय वर्षे २५ च्या आतील आहे. २०20 पर्यंत भारतातील लोकांचे सरासरी वयोमान २९ वर्षे राहील आणि त्याच्या तुलनेत अमेरिकेतील लोकांचे ४0 वर्षे, युरोप ४६ वर्षे, जपान ४७ वर्षे राहील.

अर्थात जागतिक स्तरावर भारत एक तरुण देश म्हणून उदयास येत आहे. असेही अनुमान आहे की, जागतिक स्तरावर औद्योगिक क्षेत्रातील कामगारांचे प्रमाण ४% ने कमी होत असताना भारतात ते प्रमाण ३२% नी वाढेल. या सर्व परिस्थितीचा विचार करता पुढील काळामध्ये भारतास 'मनुष्यबळ हब' म्हणून विकसित होण्याची मोठी क्षमता आहे.

देशातील या तरुण उपलब्ध मनुष्यबळास सुयोग्य कौशल्य प्रशिक्षण देऊन त्याना उत्पादनक्षम बनविणे ही काळाची गरज आहे. अन्यथा हेच तरुण मनुष्यबळ कौशल्याअभावी बेरोजगारांची फौज म्हणून बाहेर पडतील व पर्यायने समाजविघातक कामात ढकलले जातील. या सर्व बाबींचा विचार करून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय स्तरावर कौशल्य विकास अभियानास प्रमुख कार्यक्रम (फ्लॅगशिप प्रोग्रॅम)म्हणून घोषित केले आहे.

राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील कौशल्य विकास अभियानास प्राधान्य देऊन त्याकरिता कौशल्य विकास व उद्योजकता हा स्वतंत्र विभाग निर्माण केला. महाराष्ट्र हे लोकसंखेच्या तुलनेत ११.२४ कोटी लोकसंखेसह देशातील दुसऱ्या क्रमांकाचे राज्य असून देशाच्या सकल उत्पादनामध्ये राज्याचा १३.२८% एवढा वाटा आहे. राज्यात लघु व मध्यम उद्योग क्षेत्रात मोठ्याप्रमाणात गुंतवणूक होत असून विविध क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होत आहे. त्याचप्रमाणे औद्योगिक क्षेत्राला चालना देण्यासाठी स्पेशल इकॉनॉमिक झोन (सेझ) तयार करण्यात आले आहेत.

हा महाराष्ट्रातील वातावरण मनुष्यबळ विकासाच्या दृष्टीने पोषक असून, राज्यात कौशल्य विकासासंदर्भातील विविध विविध कार्यक्रम राबवण्यात येत आहेत.

### अल्पमुदतीचे व्यवसाय प्रशिक्षण

प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गत १५ ते ४५ वयोगटातील युवक-युवतींना विविध कौशल्याचे नि:शुल्क प्रशिक्षण देऊन रोजगार/ स्वयंरोजगार करण्यास सक्षम करण्यात येते. यामध्ये रोजगार/स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणाऱ्या विविध ६६ क्षेत्रातील अभ्यासक्रमांचे राज्यातील नोंदणीकृत १९७८ कौशल्य प्रशिक्षण संस्थांमार्फत (व्हीटीपी) प्रशिक्षण देण्यात येते. प्रशिक्षणाअंती त्रयस्थ संस्थेमार्फत प्रशिक्षणार्थ्यांच्या कौशल्याचे मूल्यमापन करून प्रमाणित करण्यात येते. प्रमाणित प्रशिक्षणार्थ्यांपैकी किमान ७५% प्रशिक्षणार्थ्यांना रोजगार/स्वयंरोजगार प्राप्त करून देणे अनिवार्य आहे. सद्य:स्थितीत या योजनेचे आजपर्यंत १,२२,७१८ लाभार्थी



## स्किल सखी



देशातील लोकसंख्येच्या जवळपास ५०% हिस्सा असलेल्या महिलांना राष्ट्रीय उत्पादन प्रक्रियेत सहभागी करून घेतल्यास, राष्ट्राच्या क्रयशक्तीत मोठी वाढ होइल. त्या दृष्टीने ग्रामीण भागातील महिला उमेदवारांना रोजगार स्वयंरोजगाराकरिता उपयुक्त अशा कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचा लाभ घेण्याच्या दृष्टीने प्रोत्साहित करणे, त्यांचे समुपदेशन करणे इ. करिता युएनडीपी व प्रथम या एनजीओच्या सहकार्याने राज्यात स्किल सखी हा कार्यक्रम नागपूर व औरंगाबाद जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावर राबवण्यात येत आहे. या प्रकल्पांतर्गत राज्यातील १८ ते २५ वयोगटातील किमान १० वी उत्तीर्ण व उत्कृष्ट सामाजिक संपर्क असलेल्या महिलांची स्किल सखी म्हणून निवड करण्यात येते. याकरिता त्यांना प्रथम या संस्थेमार्फत व्यक्तिमत्त्व विकास, नेतृत्व कौशल्य, सॉफ्ट स्किल, डिजिटल स्किल लिट्रेसीचे प्रशिक्षण देण्यात येते. या स्किल सखीमार्फत बेरोजगार उमेदवार व महिला यांचे समुपदेशन करण्यात येऊन त्यांच्यातील क्षमता आणि दुर्बल बाजूबाबत अहवाल तयार केला जातो. तो संबधितांना सादर करण्यात येतो. ज्याचा उपयोग सबंधित उमेदवारांना कौशल्य विकास प्रशिक्षण सुचवण्यासाठी होतो .राज्य शासनाच्या या प्रकल्पाची दाखल केंद्रशासनाने व नीती आयोगाने घेतली आहे. हा प्रकल्प भविष्यात संपूर्ण देशात राबवण्याचा केंद्र शासनाचा मानस आहे. या माध्यमातून कौशल्य विकास कार्यक्रमाद्वारे महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने जास्तीत जास्त महिलांना लाभ देण्याचा विभागाचा प्रयत्न आहे.

आहेत. त्यापैकी ५७% लाभार्थी महिला आहेत. योजनेची अंमलबजावणी गतिमान व पारदर्शक पद्धतीने होण्यासाठी सर्व लाभार्थ्यांकरिता आधार कार्ड, बायोमेट्रिक उपस्थिती अनिवार्य आहे. सर्व प्रकारच्या खर्चांची प्रतिपूर्ती ऑनलाइन पद्धतीने करण्यात येते. याकरिता विभागाद्वारे mahaswayam.gov.in वेबपोर्टल कार्यान्वित करण्यात आले आहे.




### कृषी व संलग्न व्यवसाय प्रशिक्षण

मराठवाडा, विदर्भ या भागात दुष्काळी परिस्थितीमुळे काही कालावधीपूर्वी शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले होते. या परिस्थितीवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याच्या दृष्टीने राज्यस्तरावर विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून शेतकऱ्यांना शेतीबरोबरच जोडधंदा/उद्योग सुरू करण्याच्या दृष्टीने उपयुक्त कौशल्य विकास प्रशिक्षण देणे तसेच शेती संदर्भातील आधुनिक तंत्रज्ञानाधारित अभ्यासक्रम राबवण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणारे विविध उपयुक्त अभ्यासक्रम तयार करण्यात आले आहेत. याची अंमलबजावणी सुचीबद्ध प्रशिक्षण संस्थांमार्फत करण्यात येईल. ग्रामीण महिलांकरिता एमएसएसडीएस व महिला आर्थिक विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने काही अभ्यासक्रम राबवण्याची कार्यवाही सुरू आहे.

### आय.टी.आय.चे आधुनिकीकरण

विविध उद्योजकांच्या सामाजिक दायित्व उपक्रमांतर्गत कौशल्य व उद्योजकता विकास अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. आय.टी.आय.मध्ये पायाभूत सुविधांचा विकास व यंत्रसामुग्रीचे आधुनिकीकरण करण्याच्या दृष्टीने विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. त्यादृष्टीने ३३ नामांकीत कंपन्यांसमवेत सामंजस्य करार करण्यात आले आहेत. यामध्ये प्रामुख्याने टाटा ट्रस्ट, व्हॉल्क्सवॅगन, मारूती सुझुकी, जिंदाल स्टिल फाऊंडेशन, आयसीआयसीआय, बॉम्बे स्टॉक एक्सचेंज, युएनडीपी, बॉश, जावेद हबीब हेअर ब्युटी लि., एसएनडीटी महिला विद्यापीठ, सकाळ इंटरनॅशनल, नासकॉम, टेक-महिंद्रा, ताज हॉटेल, भारत फोर्ज यांचा समावेश आहे. या अंतर्गत प्रशिक्षण सुविधा निर्माण करणे, प्रत्यक्ष प्रशिक्षण देणे, प्रशिक्षणाच्या दर्जा वाढीकरिता प्रशिक्षक प्रशिक्षणासह व्हर्च्युअल क्लासरूम, आयटीआयमधील पायाभूत सुविधांचा विकास, करणे इत्यादी बाबींचा सामावेश आहे. यामध्ये टाटा ट्रस्टद्वारा ३२ व सिस्कोद्वारे ४ आय.टी.आय.मध्ये व्हर्च्युअल क्लासरूमची स्थापना करण्यात आली आहे.

### स्वयंरोजगार साहाय्य

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास

## राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद

**शिल्प कारागीर योजनेंतर्गत औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या प्रशिक्षण व प्रशासकीय बाबींचे नियमन व सुसूत्रीकरण त्याचप्रमाणे आयटीआयमध्ये राबवण्यात येणारे अभ्यासक्रम तयार करणे यासाठी राज्यात व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत १९८४ मध्ये राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेची स्थापना करण्यात आली आहे.**

**राज्य शासनाने जानेवारी २०१७ मध्ये या परिषदेचे पुनर्गठन करून त्याचे बळकटीकरण करण्याच्या दृष्टीने या परिषदेची सोसायटी अधिनियम १८६० अंतर्गत नोंदणी केली व त्यास स्वायत्तता प्रदान करण्याचा निर्णय घेतला आहे. एससीव्हीटी परिषदेमार्फत राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये राबवण्यात येत असलेल्या विविध अभ्यासक्रमांचा आढावा घेण्यात येऊन स्थानिक व जागतिक स्तरावरील रोजगार, स्वयंरोजगाराच्या संधी, विशिष्ट कुशल मनुष्यबळाची मागणी, भविष्यात येणारे उद्योग यांचा विचार करून राज्य स्तरावरील विविध अभ्यासक्रम तयार करणे, परीक्षा व मूल्यमापन प्रमाणन व इत्यादी कार्यवाही करण्यात येईल. अशाप्रकारे एससीव्हीटीच्या बळकटीकरणाच्या माध्यमातून स्थानिक मागणीच्या कुशल मनुष्यबळाच्या निर्मितीस चालना देण्यात येत आहे.**

विकास महामंडळामार्फत राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील युवकांना रोजगार/स्वयंरोजगारास कर्जस्वरूपात साहाय्य करण्यात येते. याकरिता शासनाने महामंडळास रु.२०० कोटीचे अनुदान मंजूर केले आहे.

### समुपदेशन आणि मार्गदर्शन

रोजगार/स्वयंरोजगार करू इच्छिणाऱ्या उमेदवारांचे तज्ज्ञ समुपदेशक/मार्गदर्शक यांच्यामार्फत शास्त्रोक्त पद्धतीने समुपदेशन व कल चाचणीच्या आधारे उमेदवारांचा विशिष्ट क्षेत्राकडे असलेला कल, त्यांच्याकडे असलेले उपजत व नैसर्गिक गुण, शारीरिक/बौद्धिक/आर्थिक क्षमता, कौशल्य, अनुभव इत्यादी बाबी विचारात घेऊन कुशल मनुष्यबळाच्या मागणीनुसार उमेदवारांना संबंधित क्षेत्रात रोजगार/ स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने कौशल्य विकास कार्यक्रम सुचवणे इत्यादी बाबतची कार्यवाही या केंद्रामार्फत करण्यात येते.

### परदेश रोजगार व कौशल्य प्रशिक्षण केंद्र

राज्यातील कुशल मनुष्यबळास परदेशात मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी आहेत. दर वर्षी मोठ्या प्रमाणात आखाती प्रदेश, सिगापूर इ. सह इतर देशांमध्ये उमेदवार रोजगाराकरिता जातात. सद्य:स्थितीत शासनाच्या विविध धोरणांमुळे कुशल मनुष्यबळाचे प्रमाण वाढत आहे. तसेच भारतात मोठ्याप्रमाणात आंतरराष्ट्रीय स्तरावर कुशल मनुष्यबळ पुरवण्याची क्षमता लक्षात घेता भविष्यात परदेशी रोजगार प्राप्त करू इच्छिणाऱ्या उमेदवारांची संख्या दिवसेंदिवस वाढत जाणार आहे. ज्यामुळे परदेशात जाणाऱ्या उमेदवारांना खाजगी संस्थांमार्फत परदेशी जाण्याची संधी आहे. परंतु या संस्थांकडून उमेदवारांची फसवणूक व आर्थिक पिळवणूक होत असल्याचे निदर्शनास येते. ही बाब विचारात घेऊन महाराष्ट्रातून देशाबाहेर रोजगारासाठी जाणाऱ्या उमेदवारांचे प्रमाण लक्षात घेता राज्याने मुंबई व नागपूर या दोन ठिकाणी परदेश रोजगार व कौशल्य प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्याचे ठरवले आहे, सदर केंद्रामार्फत राज्यातील इच्छुक उमेदवारांकरिता परदेशातील रोजगारांच्या संधींचा शोध घेणे, त्यांना व्यवसाय मार्गदर्शन करणे, आवश्यकतेनुसार आंतरराष्ट्रीय पूर्वगमन प्रशिक्षण देणे, विमान तिकिटे, व्हिसा व इतर आनुषंगिक प्रक्रियेकरिता मदत करणे, परदेशातील राहण्याच्या व्यवस्थेकरिता साहाय्य करणे, परदेश रोजगार प्राप्तीनंतर उमेदवारांना अडचणी संदर्भात मार्गदर्शन व मदत करणे इ. बाबी या केंद्रामार्फत हाताळण्यात येतील. याकरिता पथदर्शी प्रकल्प म्हणून प्रथम टप्प्यात मुंबई येथे या केंद्राची स्थापना करण्यासंदर्भातील कार्यवाही सुरू आहे. ही केंद्र व्यावसायिकदृष्ट्या यशस्वीपणे कार्यान्वित करण्यासाठी या क्षेत्रातील अनुभव असलेल्या खासगी संस्थांची मदत घेण्यात येईल.



औद्योगिक प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रात्यक्षिक समजून घेताना प्रशिक्षणार्थी.

### आय.टी.आय.ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया

राज्यात एकूण ४१७ शासकीय व ४५४ अशासकीय आय.टी.आय.मधून एकूण ७९ ट्रेडचे प्रशिक्षण देण्यात येते. त्यात अभियांत्रिकी व बिगर अभियांत्रिकी गटातील १ ते २ वर्ष कालावधीच्या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. या अभ्यासक्रमांची ११ ट्रेडच्या प्रवेशाकरिता किमान शैक्षणिक पात्रता १० वी अनुत्तीर्ण व ६८ ट्रेडच्या प्रवेशाकरिता किमान शैक्षणिक पात्रता १० वी उत्तीर्ण अशी आहे. राज्यातील शासकीय आय.टी. आय.ची प्रवेश क्षमता ९२,०६४ असून अशासकीय आय.टी.आय. ची प्रवेश क्षमता ३६,६८६ इतकी आहे. याकरिता प्रवेश प्रक्रिया गतिमान व पारदर्शी होण्याच्या दृष्टीने संपूर्ण राज्यात ही प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबवण्यात येते.

### द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम

१०+२ स्तरावर इयत्ता ११ वी व १२ वी करिता रोजगार/ स्वयंरोजगार करणे अथवा उच्च शिक्षण घेणे हे दोन्ही उद्देश साध्य करण्याच्या दृष्टीने, १९७८-७९ पासून द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम सुरू करण्यात आले. यामध्ये व्यवसाय विषयांची व्याप्ती 30% तर इतर विषयांची व्याप्ती ७0% आहे. सबब हे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांमध्ये लोकप्रिय असून या अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांचा ओढा सतत वाढत आहे. ही बाब विचारात घेऊन विभागाने या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत मोठ्या प्रमाणात वाढ करून त्याची व्याप्ती वाढवली आहे. सद्य:स्थितीत १३१५ 'शासकीय/अशासकीय/ अनुदानित/विना अनुदानित संस्थांमध्ये १,५६,५०० इतकी प्रवेश क्षमता आहे. याबाबतची सर्व माहिती www.dvet.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

### अप्रेंटिस ॲक्ट,१९६१च्या सुधारणा

बहुतांश विकसित देशांमध्ये औद्योगिक अस्थापनांसह इतर आस्थापनांमध्ये मोठ्या प्रमाणात युवक युवतींना प्रत्यक्ष काम करण्याची संधी देऊन, त्यांचा कौशल्य विकास साधला जातो व भविष्यात सदर कौशल्याचा त्याना रोजगार/ स्वयंरोजगार करताना उपयोग होतो. परंतु सद्यस्थितीत राज्याची लोकसंख्या व औद्योगिक क्षेत्रासह इतर क्षेत्रातील उपलब्ध पायाभूत सुविधांचा विचार करता, सदर प्रमाण खूप कमी आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये (आयटीआय) मध्ये सीटीएस अंतर्गत प्रशिक्षित तथा इतर किमान शैक्षणिक पात्रताधारक उमेदवारांना संबंधित आस्थापनांमध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव देऊन त्यांचे कौशल्य वृद्धी करण्याची संधी सदर कायद्यांतर्गत देण्यात येते. महाराष्ट्रातील शिकाऊ उमेदवारी अंतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या उमेदवारांची संख्या वाढवणे व त्या माध्यमातून त्यांचा कौशल्यविकास साधण्याच्या दृष्टीने राज्य स्तरावर शिकाऊ उमेदवारी कायद्यामध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही सुरू आहे.

### इनोव्हेशन व स्टार्टअप धोरण

तंत्रज्ञान व नावीन्यतेशी संबंधित तरुण व उत्पादनक्षम मनुष्यबळास विविध स्तरांवर संशोधनाकरिता व उद्योजकता विकासास पोषक वातावरण निर्मिती करण्याचे राज्याचे धोरण आहे. त्याचप्रमाणे एकूणच राज्यात स्टार्टअप संस्कृतीचा विकास करण्याच्या दृष्टीने; विभागामार्फत प्रथमतः राज्याच्या इनोव्हेशन व स्टार्टअप धोरणाचा मसुदा तयार करण्यात आला आहे. या अंतर्गत राज्यातील उद्योजक होऊ इच्छिणाऱ्या व तशी क्षमता असलेल्या तरुणांना, इन्क्युबेटर्स सुविधेसह इतर सोयी-सवलती देण्यात येतील. जास्तीत जास्त उमेदवारांना स्वयंरोजगार व उद्योग उभारणीच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम केले जाईल. त्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती केली जाईल. विविध समस्यांवर किफायतशीर उपाययोजना शोधल्या जातील.

## रोजगार मेळावे

**रोजगार प्राप्त करू इच्छिणारे उमेदवार व रोजगाराच्या संधी उपलब्ध असलेल्या विविध आस्थापना यांना एकाच व्यासपीठावर आणून अधिकाधिक उमेदवारांना त्यांच्या कौशल्यानुसार रोजगार प्राप्त करून देण्याच्या**



**दृष्टीने राज्यात रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात येते. यामध्ये संबंधित आस्थापना त्यांना आवश्यक असलेल्या कुशल मनुष्यबळाच्या मागणीनुरूप उमेदवारांची चाचणी व मुलाखत घेऊन रोजगाराकरिता निवड करतात. त्यामुळे एकाच व्यासपीठावर उमेदवारांना रोजगाराच्या विविध संधी व आस्थापनांना मोठ्या प्रमाणावर पात्र उमेदवार उपलब्ध होतात. २०१६-१७ मध्ये आतापर्यंत विभागामार्फत आयोजित करण्यात आलेल्या रोजगार मेळाव्यांच्या माध्यमातून २९,२९६ उमेदवारांना रोजगार प्राप्त करून देण्यात आला आहे.**

# ज्ञानाचा वैभवशाली वारसा



**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ अर्थात बालभारती आपला सुवर्णमहोत्सव साजरा करत आहे. गेल्या पन्नास वर्षांच्या काळात नवीन शैक्षणिक विचारप्रणाली, कालसुसंगत शैक्षणिक धोरणे, नवीन अध्ययन- अध्यापन पद्धती अशा विविध बाबींचा विचार करून बालभारतीने पाठ्यपुस्तकांच्या स्वरूपात आणि आशयात अनेक बदल केले आहेत. कालानुरूप बदलाची ही प्रक्रिया आजही सुरू आहे.**

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे महत्त्वाचे माध्यम आहे, तर पाठ्यपुस्तक हे ज्ञानप्राप्ती व शिक्षणाचा प्रसार करण्याचे प्रमुख साधन आहे. पाठ्यपुस्तके हा प्रत्येकाच्याच जिव्हाळ्याचा विषय असतो. आपल्या मनाचा एक कोपरा लहानपणी शिकलेल्या पाठ्यपुस्तकांसाठी कायम राखीव असतो. लहानपणी शिकलेल्या कथा, कविता, चित्रे यांचा एक विलोभनीय ठसा मनावर उमटलेला असतो. पाठ्यपुस्तकांतून भाषेचे, साहित्याचे आणि वाचनाचे संस्कार तर होतातच, शिवाय जीवनाचे, जगण्याचे अनेक संस्कारही याच पाठ्यपुस्तकांतून होत असतात. अशी ही आयुष्यभर साथसंगत करणारी, उत्तम संस्कारांची शिदोरी देणारी पाठ्यपुस्तके बालभारतीत तयार होतात. दरवर्षी अंदाजे १९ कोटी पुस्तकांची छपाई करून त्यांचे वितरण बालभारती मार्फत केले जाते. पाठ्यपुस्तकांची निर्मिती ही खडतर आणि विलक्षण प्रक्रिया आहे.

प्रतिवर्षी एकाच वेळी राज्यातील लाखाहून अधिक शाळांमधील शिक्षक, कोट्यवधी विद्यार्थी आणि तितकेच पालक यांच्याशी आपुलकीच्या अतूट धाग्यांनी बालभारती जोडली गेली आहे.




**मंडळाची स्थापना**

स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या दोन दशकात वेगवेगळ्या राज्यांतील भाषाविषयक धोरण, शैक्षणिक आकृतिबंध, अभ्यासक्रम यामध्ये एकसमान असे सूत्रही नव्हते. कोठारी आयोगाने शिक्षणक्षेत्रात क्रांती घडवून आणली. पाठ्यपुस्तक मंडळाच्या स्थापनेपूर्वी शाळांमध्ये खासगी प्रकाशकांची पुस्तके वापरात होती. दर्जेदार आणि रास्त किमतीमधील पुस्तके मुलांना वेळेत मिळावी यासाठी राज्याने स्वायत्त संस्था निर्माण करावी अशी शिफारस करण्यात आली. शालेय पाठ्यपुस्तकांचे राष्ट्रीयीकरण झाले.

कोठारी आयोगाच्या शिफारशीनुसार २७ जानेवारी १९६७ रोजी महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे या संस्थेची स्थापना झाली. याचे उद्घाटन तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या हस्ते २ फेब्रुवारी १९६७ रोजी झाले. मंडळाचे संस्थापक-अध्यक्ष या नात्याने तत्कालीन शिक्षणमंत्री मधुकरराव चौधरी यांचे संस्था उभारणीत आणि मंडळाचे पहिले संचालक उत्तमराव सेवलेकर आणि पहिले नियंत्रक बापूराव नाईक यांचे संस्थेच्या प्रारंभीच्या वाटचालीत मोलाचे योगदान राहिले.

राज्यातील प्राथमिक स्तरावर शिक्षण घेणाऱ्या पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी भाषा व इतर सर्व विषयांची पाठ्यपुस्तके तयार करून वितरित करणे हे मंडळाचे मुख्य उद्दिष्ट आहे. मराठी बालभारती इयत्ता पहिली हे मंडळाचे पहिले पुस्तक १९६८ साली प्रकाशित झाले. आजपर्यंत बालभारतीच्या पाच माला प्रकाशित झाल्या असून २०१३ पासून सहाव्या मालेचे प्रकाशन सुरू आहे. आठ भाषा माध्यमांतून सर्व विषयांची पाठ्यपुस्तके तयार करणारे मंडळ हे बालभारतीचे वैशिष्ट्य आहे. १९६८ पासून पाठ्यपुस्तक मंडळ दर्जेदार, संस्कारक्षम आणि वैशिष्ट्यपूर्ण अशी पाठ्यपुस्तके अल्प किमतीत उपलब्ध करून देत आहे. गेल्या पन्नास वर्षांच्या काळात नवीन शैक्षणिक विचारप्रणाली, कालसुसंगत शैक्षणिक धोरणे, नवीन अध्ययन- अध्यापन पद्धती अशा विविध बाबींचा विचार करून पुस्तकांच्या स्वरूपात, आशयात अनेक बदल करण्यात आले आहेत. कालानुरूप बदलाची ही प्रक्रिया आजही सुरू आहे.

संस्थेचे नाव महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ असे असले, तरी 'बालभारती' या नावाने प्रकाशित होणारी भाषेची पाठ्यपुस्तके अल्पावधीतच इतकी लोकप्रिय झाली, की मंडळ ऋबालभारती' याच नावाने ओळखू लागले. पाठ्यपुस्तक प्रकाशन क्षेत्रातील एक पायाभूत स्वायत्त संस्था असा मंडळाचा उल्लेख करावा लागेल. मंडळाने स्थापनेपासूनच संस्कारक्षम, आकर्षक व दर्जेदार पाठ्यपुस्तक तयार करण्याचे व्रत घेतले. अनेक अडचणींवर मात

करून शिक्षण क्षेत्रातील पाठ्यपुस्तक प्रकाशनाचा पाया मजबूत केला. निव्वळ मुलांवरील प्रेमापोटी राज्यातल्या अनेक ख्यातनाम लेखक, कलावंत आणि विचारवंतानी बालभारतीच्या जडणघडणीत मोलाचे योगदान दिले. कल्पना कार्यक्षमता व कर्तृत्व यांचा एक सुंदर त्रिवेणी संगम मंडळाच्या आजवरच्या प्रवासात दिसून येतो.

### पाठ्यपुस्तक मंडळाची रचना

पाठ्यपुस्तक मंडळ हे राज्यशासनाच्या आधिपत्याखाली कार्यरत असलेली स्वायत्त संस्था आहे. राज्याचे शिक्षणमंत्री हे या संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात; तर संचालक हे संस्थेचे प्रशासकीय प्रमुख म्हणून काम करतात. संस्थेचे सर्व धोरणात्मक निर्णय नियामक मंडळात घेतले जातात. पाठ्यपुस्तके तयार करण्याचे मुख्य काम विद्याविभागात चालते. विद्याविभागांतर्गत मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू, कन्नड, सिंधी, तेलुगू, गुजराती या आठ भाषा आणि इतिहास, भूगोल, गणित, विज्ञान, कार्यानुभव, आरोग्य व शारीरिक शिक्षण असे एकूण १४ विभाग आहेत.

### विषय समित्या

पाठ्यपुस्तके तयार करण्यासाठी विषयवार समित्या असतात. मंडळातील त्या त्या विषयाचे अधिकारी विषय समित्यांमध्ये सदस्य-सचिव म्हणून काम करतात. जुन्या अभ्यासक्रमाच्या जागी नवीन अभ्यासक्रम येऊन पाठ्यपुस्तके बदलली जात नाहीत, तोपर्यंत या समित्या कार्यरत असतात. पाठ्यपुस्तके तयार करणे ही जटिल प्रक्रिया आहे.. मुलांचा वयोगट, त्याचे भावविश्व, त्यांची आकलन क्षमता, मजकुराची काठिण्यपातळी या सर्व गोष्टी लक्षात घेऊन पाठ्यविषयांची निवड करणे आणि सोप्या भाषेत त्यांचे लेखन करणे हे एक प्रकारचे दिव्यच असते.

### अद्ययावत ग्रंथालय

पाठ्यपुस्तकांची निर्मिती करताना अनेक संदर्भग्रंथांची आवश्यकता भासते. यासाठी बालभारतीने स्वतःचे समृद्ध असे ग्रंथालय विकसित केले आहे. अद्ययावत आणि अत्यंत दुर्मीळ असे अनेक संदर्भग्रंथ इथे उपलब्ध आहेत. बालभारतीत आठ भाषांमध्ये पाठ्यपुस्तके तयार होत असल्यामुळे ग्रंथालयात आठही भाषांमधील विपुल ग्रंथसंपदा आहे. प्रतिवर्षी नवनवीन ग्रंथांची यात भर पडत असते. ग्रंथांबरोबरच आठ भाषांमधील व अन्य विदेशी भाषांमधील असंख्य नियतकालिकेही मागवली जातात.

संपूर्ण देशात बालभारतीची रचना आणि कार्यपद्धती आदर्शवत आहे. गुणवत्ता व दर्जा याबाबतीतसुद्धा मंडळाची पाठ्यपुस्तके मागे नाहीत. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर मंडळनिर्मित पाठ्यपुस्तकाची गणुवत्ता व दर्जा उत्कृष्ट असल्याबाबतची प्रमाणपत्रे मिळाली आहेत. किशोर या मासिकालाही भारत सरकारचे गुणवत्ता प्रमाणपत्र व मुद्रण स्पर्धेतील पारितोषिक प्राप्त झाले आहे. आजही देश-विदेशातील मंडळे बालभारतीला भेट देण्यासाठी येतात आणि येथील रचना आणि कार्यपद्धती त्यांच्याकडे सुरू करण्याच्या दृष्टीने विचार करतात, यातच बालभारतीचे यश दडलेले आहे.

बदलत्या काळानुसार आता बालभारतीही बदलते आहे. आधुनिक ज्ञान-तंत्रज्ञान यामुळे पारंपरिक पाठ्यपुस्तकांचे स्वरूप बदलण्यासाठी व नवी आव्हाने पेलण्यासाठी बालभारती आता सज्ज झाली आहे.

### अमराठी पुस्तके

राज्यात मराठी, हिंदी, इंग्रजीबरोबरच अमराठी माध्यमांच्या शाळांची संख्या लक्षणीय आहे. उर्दू, कन्नड, सिंधी, गुजराती, तेलुगू इत्यादी मातृभाषा असणारे अनेक अमराठी भाषक महाराष्ट्रात राहतात. त्यांच्या पाल्यांच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारून शासनाने अमराठी माध्यमांच्या शाळा सुरू करण्यास राज्यात परवानगी दिली आहे. या मुलांसाठी त्यांच्या मातृभाषेतील पाठ्यपुस्तके तयार करण्याचे काम बालभारतीच करते. इतिहास, भूगोल, विज्ञान, गणित इत्यादी विषयांची पुस्तके मराठीतून तयार झाल्यानंतर ती अन्य अमराठी भाषांत अनुवादित केली जातात. हीच पुस्तके या शाळांमध्ये अभ्यासली जातात.

### पाठ्येतर प्रकाशने

पाठ्यपुस्तकांची निर्मिती व वितरण हे पाठ्यपुस्तक मंडळाचे मुख्य कार्य असले, तरी मंडळाने शिक्षक, विद्यार्थी आणि पालक यांच्यासाठी अन्य उपयुक्त साहित्याचीही निर्मिती केली आहे. आदर्श शिक्षकांची आत्मचरित्रे, उत्तम संस्कारकथा, ग्रामगीता, गांधीजींची आत्मकथा-माझे सत्याचे प्रयोग, कथा स्वातंत्र्याची, शिल्पकार स्वातंत्र्याचे, स्फूर्तिगीते, माहीत आहे का तुला?, मराठी शब्दार्थकोश, गोष्ट स्वातंत्र्यलढ्याची, बालगोष्टी, बालगीते इत्यादी पाठ्येतर प्रकाशनांना वाचकांचा उत्तम प्रतिसाद आहे.



## किशोर (मुलांचे मासिक)

पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीदिनी (१४ नोव्हेंबर १९७१ रोजी) ८ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांसाठी 'किशोर' हे मासिक मंडळाने सुरू केले. मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, अभ्यासक्रमाबाहेरचे ज्ञान मिळावे, त्यांच्या संवेदनशील मनावर उत्तम मूल्यांचे संस्कार व्हावेत ही उद्दिष्टे ठेवून; किशोर मासिक चालवले जाते. गेल्या ४४ वर्षांत किशोर मासिकाने अनेक पिढ्यांवर वाचनाचे ज्ञानविज्ञानाचे व मूल्यांचे संस्कार केले आहेत. अनेक चित्रकार, कवी, लेखक यांना मासिकाने घडवले आहे. ४० वर्षांतील किशोरमधील उत्तम निवडक साहित्य १४ खंडांत प्रकाशित झाले आहे.

**- किरण केंद्रे**
कार्यकारी संपादक (किशोर) पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे
संपर्क: ०९४२३००५०८९

# अर्थसंकल्प म्हणजे काय?




या वर्षीचा अर्थसंकल्प नेहमीच्या अर्थसंकल्पापेक्षा वेगळा आहे. या ऐतिहासिक बदलाची सुरुवात केंद्रीय अर्थसंकल्पापासूनच झाली. अर्थसंकल्प म्हणजे नेमके काय, तो कसा समजून घ्यावा, या सगळ्या प्रक्रियेचा प्रवास जाणून घेणे खूप अभ्यासपूर्ण आणि रंजक आहे.

यंदा पहिल्यांदाच केंद्रीय अर्थसंकल्प आणि रेल्वे अर्थसंकल्प एकत्र सादर झाला. जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा कर प्रणालीची अंमलबजावणी या येणाऱ्या वित्तीय वर्षात सुरू होईल. या कर प्रणालीने देशातील सर्व राज्ये समान करसूत्रात बांधली जातील. एक कर एक राष्ट्र ही संकल्पना आकाराला येताना बरेच अप्रत्यक्ष कर, वस्तू आणि सेवाकर प्रणालीत विलीन होणार आहेत. त्यामुळे अर्थसंकल्पाच्या भाग-दोनबाबत असणारी उत्सुकता जीएसटी लागू झाल्यानंतर काही प्रमाणात कमी होईल.

### बदलाचा मागोवा

प्रशासकीय सुधारणा आयोग व डॉ. रंगराजन यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय तज्ज्ञ समितीने तसेच बाराव्या वित्त आयोगाने अर्थसंकल्पातील योजनांतर्गत व योजनेतर खर्चाचे एकत्रीकरण करण्याची शिफारस केली होती. या शिफारसी तसेच योजना आयोगाचे निती आयोगात केलेले रूपांतर, २०१६-१७ या आर्थिक वर्षाच्या समाप्तीबरोबर संपणारी १२ वी पंचवार्षिक योजना या सर्व बाबी विचारात घेऊन केंद्र शासनाने २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून योजनांतर्गत व योजनेतर खर्चाचे एकत्रीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे.

### काय आहे बदल?

संविधानाच्या परिच्छेद २०२ नुसार वार्षिक वित्तीय विवरणपत्र म्हणजेच वार्षिक अर्थसंकल्पात खर्चाचे महसूली व इतर खर्च असे विभाजन दर्शविणे बंधनकारक आहे. खर्चाचे योजनांतर्गत व योजनेतर अशी विभाजनाची तरतूद सांविधानिक नसून ती एक प्रकारची प्रशासकीय व्यवस्था होती ही बाब व केंद्र शासनाने घेतलेला निर्णय विचारात घेऊन राज्यशासनाने राज्यात योजनांतर्गत व योजनेतर खर्चाच्या बाबींचे एकत्रीकरण करण्याचा निर्णय १८ जानेवारी २०१७ रोजी घेतला. त्यामुळे सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पातून विधानमंडळात सादर होणाऱ्या अर्थसंकल्पीय प्रकाशनांमध्ये योजनांतर्गत व योजनेतर असे दर्शविले जाणारे विभाजन आता बंद होईल व अर्थसंकल्पीय खर्चाचे यापुढे अनिवार्य खर्च व कार्यक्रमावरील खर्च तसेच महसुली व इतर (भांडवली, ऋण) खर्च याप्रमाणे वर्गीकरण दर्शविण्यात येईल. या बदलांमुळे प्रत्येक विभागास उपलब्ध होणाऱ्या एकूण निधीचा, कार्यक्रमावरील खर्च व अनिवार्य खर्च याचा आढावा घेणे शक्य होईल.

### अनिवार्य खर्च

मूळ आस्थापनाविषयक खर्च ज्यामध्ये वेतन, निवृत्तीवेतन, व्याज प्रदाने, इ.चा समावेश असेल. इतर अनिवार्य खर्चात पूर्णपणे बांधील खर्चाचा समावेश होईल. जसे स्थानिक स्वराज्य संस्थांना वैधानिक अधिनियमांतर्गत द्यावयाचा निधी, उदा. स्थानिक स्वराज्य संस्थांना वर्ग केला जाणारा निधी, मुद्रांकशुल्क, नगरपालिकांना दिला जाणारा निधी, स्थानिक स्वराज्य संस्थांना कराच्या भरपाईसाठी दिला जाणारा निधी, नैसर्गिक आपत्तीच्या निवारणार्थ निधी इ.

### अर्थसंकल्प म्हणजे काय?

केंद्रीय अर्थमंत्री लोकसभेत तर राज्याचे अर्थमंत्री विधानसभेत दरवर्षी जे वित्तविषयक प्रस्ताव सादर करतात त्याला आपण अर्थसंकल्प किंवा बजेट असे संबोधतो. प्रत्यक्षात आपल्या घटनेमध्ये त्यासाठी बजेट या शब्दाचा उल्लेख नसला तरी लोकसभा आणि विधानसभा यात सादर करावयाच्या वित्तविषयक विवरणपत्राचा उल्लेख आहे. यात पुढील वर्षाच्या जमेच्या आणि खर्चाच्या रकमासंबंधी अंदाज दिलेला असतो. तसेच गतवर्षीच्या प्रत्यक्ष रकमा आणि चालू वर्षीचे सुधारित अंदाज यात असतात.

संविधानाच्या परिच्छेद २६६ अन्वये राज्य शासनाला मिळालेला सर्व महसूल व कर्जे मिळून राज्याचा एकत्रित निधी तयार होतो. कायद्यामधील तसेच घटनेत ज्या कारणासाठी तरतूद केली असेल ती कारणे सोडून कोणत्याही इतर कारणांसाठी, कोणत्याही इतर रीतीने राज्याच्या एकत्रित निधीतील कोणतीही रक्कम खर्च करता येत नाही. याप्रमाणेच राज्य विधानमंडळाकडून विनियोजन अधिनियमाच्या स्वरूपात मिळणाऱ्या अधिकृत मंजुरीशिवाय एकत्रित निधीतून कोणतीही रक्कम काढता किंवा खर्च करता येत नाही. ही सांविधानिक स्थिती असल्याने शासनास त्याने केलेल्या खर्चाच्या सर्व रकमांसाठी विधानमंडळाची मान्यता घ्यावी लागते. म्हणून वित्तमंत्री प्रत्येक वर्षी वर्षभरातील जमेच्या आणि खर्चाच्या रकमांचे विवरणपत्र विधानमंडळास सादर करतात.

### अर्थसंकल्पाची रचना


घटनेच्या परिच्छेद १५० अन्वये भारताच्या नियंत्रक व महालेखापालांनी राष्ट्रपतींच्या संमतीने निश्चित केलेल्या नमुन्यात केंद्र आणि राज्य शासनाला आपले लेखे ठेवावे लागतात. हा नमुना अर्थसंकल्प तयार करण्यास आधारभूत ठरतो.

लेखांकन वर्गीकरण पद्धतीचा आढावा घेण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीच्या शिफारसीनुसार भारत सरकारने लेखांकन वर्गीकरणाची पद्धती, प्रधान आणि गौण लेखाशीर्षांची यादी निश्चित करून १ एप्रिल

१९८७ पासून लागू करण्यात आली. त्यात २००८-०९ मध्ये सुधारणा करण्यात येऊन अर्थसंकल्पीय पुस्तके तयार करण्यात येत आहेत. प्रचलित वर्गीकरण पद्धतीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे लेखाशीर्षांना दिलेल्या चार अंकी संकेतांक पद्धतीमुळे एखादे प्रधान शीर्ष हे जमा भागात येते की, महसुली लेख्यावरील खर्चात येते की, भांडवली लेख्यावरील खर्चात येते की, कर्जे आणि अग्रिमे किंवा सार्वजनिक ऋण किंवा लोकलेखा भागात येते हे त्या शीर्षाच्या पहिल्या अंकावरूनच लक्षात येते.

### एकत्रित निधी

एकत्रित निधीवर विधानमंडळाचे संपूर्ण नियंत्रण असते. या निधीचे महसुली, भांडवली आणि ऋण किंवा कर्जविषयक असे तीन विभाग आहेत. महसूली उप विभागाच्या जमेच्या बाजूमध्ये कर व शुल्क, विविध प्रकारच्या सेवा फीद्वारे मिळालेल्या रकमा, केंद्र सरकारकडून मिळालेली अनुदाने यांचा समावेश होतो. महसुली उपविभागाच्या खर्चाच्या बाजूमध्ये कर वसुलीचा खर्च, प्रशासकीय सेवांवरील खर्च, संस्थांची देखभाल करण्याबाबतचा खर्च, शासनाने कर्जाऊ घेतलेल्या रकमेवरील व्याज, इ. बाबींचा समावेश होतो. महसुली जमा आणि खर्च यातील फरक महसुली तूट दर्शवतो. भांडवली विभागामध्ये भांडवली स्वरूपाच्या जमा आणि खर्चाच्या रकमांचा समावेश असतो. महत्त्वाच्या आणि कायमस्वरूपाच्या मालमत्ता निर्माण करण्याच्या किंवा त्यात भरीव वाढ करण्याच्या उद्देशाने केलेला खर्च अशी भांडवली खर्चाची व्याख्या करण्यात आली आहे.



### भारित व दत्तमत खर्च

एकत्रित निधीतून होणाऱ्या खर्चाचे दत्तमत्त किंवा भारित खर्च म्हणून वर्गीकरण करण्यात येते. विधानमंडळाची मतदानाद्वारे मान्यता घेऊन करण्यात येणाऱ्या खर्चास दत्तमत म्हणतात तर भारित खर्च म्हणजे तशा मान्यतेची आवश्यकता नसलेल्या व राज्याच्या एकत्रित निधीवर आकारावयाचा म्हणून संविधानाच्या परिच्छेद २०२ (३) व ३२२ अन्वये घोषित केलेला खर्च.

खालील बाबींना भारित खर्च समजण्यात आले आहे. ■ राज्यपालांचे वेतन व भत्ते ■ विधानसभेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच विधान परिषदेचे सभापती व उपसभापतींचे वेतन व भत्ते ■ व्याज, कर्ज निवारण निधी, ऋणमोचन भार यांसह ज्याकरिता राज्य जबाबदार ठरत असेल असा ऋण भार, कर्ज उभारणे, ऋण सेवा इ. शी संबंधित असा इतर खर्च

■ उच्च न्यायालय न्यायधीशांचे वेतन व भत्ते ■ राज्य लोकसेवा आयोगाचा खर्च यामध्ये आयोगाच्या कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते ■ कोणत्याही न्यायालयाचा किंवा लवाद न्यायाधिकरणाचा निर्णय, हुकूमनामा किंवा निवाडा यानुसार द्यावयाच्या रकमा ■ संविधानाने किंवा राज्य विधानमंडळाच्या कायद्यान्वये भारित म्हणून घोषित केलेला इतर कोणताही खर्च.

■ विधानमंडळाकडून मागण्या मंजूर झाल्यानंतर दत्तमत खर्चाच्या मागण्या आणि भारित खर्चाची विनियोजने विनियोजन विधेयकात समाविष्ट करण्यात येतात व ते विधेयक विधानमंडळासमोर सादर करतात.

## अर्थसंकल्पीय पुस्तके

**अर्थसंकल्पाशिवाय विधानमंडळाच्या सदस्यांना वित्तविषयक विवरणपत्र किंवा ग्रीन बुक, अर्थसंकल्पीय अंदाज किंवा व्हाइट बुक, अर्थसंकल्पविषयक निवेदन किंवा ब्ल्यू बुक, महसूल व जमा, महाराष्ट्र राज्याचे मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण, संक्षिप्त अर्थसंकल्प, परिशिष्टे भाग३, विनियोजनाची अनुसूची, खर्चाचा प्रधानशीर्षवार नि विभागवार सारांश व लोकलेखा, वार्षिक योजना, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, मागासवर्गीयांच्या कल्याणाच्या योजना आणि अर्थसंकल्पात त्यासाठी केलेल्या तरतुदी, कार्यक्रम अंदाजपत्रक अशी इतर अर्थसंकल्पीय पुस्तके देण्यात येतात.**

### आकस्मिकता निधी

विधानमंडळाचे अधिवेशन वर्षभर सुरू नसते व अर्थसंकल्पामध्ये पूर्वकल्पित नसलेल्या खर्चाच्या अनपेक्षित बाबी खर्चासाठी समोर येतात तेव्हा असा खर्च भागविण्यासाठी संविधानाच्या परिच्छेद २६७ (२)अन्वये राज्य विधानमंडळाने अकस्मिकता निधी निर्माण केला आहे. या निधीची सध्याची मर्यादा १५० कोटी रुपये आहे. या निधीतून आगाऊ रकमा घेऊन करण्यात आलेल्या खर्चाची भरपाई विधानमंडळाला पूरक मागण्या सादर करून केली जाते.

### लोकलेखा

तिसरा भाग लोकलेखा असून यामध्ये एकत्रित निधीमध्ये समाविष्ट असलेल्या रकमा वगळून शासनाच्या वतीने मिळालेल्या इतर सर्व रकमा जमा करण्यात येतात. यामधील व्यवहार हे बँकिंग आणि समायोजनाच्या स्वरूपातील असल्याने यातून खर्च करण्यासाठी विधान मंडळाच्या मंजुरीची आवश्यकता नसते.

### लेखानुदान

साधारणपणे संपूर्ण वर्षाचा अर्थसंकल्प नवीन बाबींवरील तरतुदींसह मार्च महिन्यात सादर केला जातो. त्यावर चर्चा आणि मतदान होऊन ३१ मार्च पूर्वी त्यास विधानमंडळ मान्यता देते. परंतु ज्या वेळी निवडणुका किंवा काही अपरिहार्य कारण असते आणि मार्च महिन्यात संपूर्ण अर्थसंकल्प सादर करणे अशक्य असते तेव्हा काही महिन्यांच्या खर्चासाठी लेखानुदान घेण्यात येते.

### अर्थसंकल्पीय भाषण

शासनाची आर्थिक स्थिती आपल्या भाषणातून स्पष्ट करून वित्तमंत्री वार्षिक अर्थसंकल्प म्हणजे वित्तविषयक विवरणपत्र विधानमंडळाला सादर करतात. यामध्ये ते तीन गोष्टी नजरेस आणतात. शासनाने पूर्वी घेतलेल्या महत्त्वाच्या योजनासंबंधात पार पडलेली कामे, आगामी वर्षात हाती घ्यावयाची कामे, शासनाचे धोरणविषयक निर्णय आणि करप्रस्ताव या बाबींचा समावेश असतो.

**– डॉ. सुरेखा मुळे**
वरिष्ठ सहाय्यक संचालक (माहिती)

# कॅशलेसचे यश

**देशात कॅशलेस व्यवहाराच्या नव्या युगाची नांदी सुरू आहे. महाराष्ट्र शासन कॅशलेस अर्थव्यवस्थेच्या या उद्दिष्टाला पूर्ण करण्यासाठी अनेक अभिनव कार्यक्रम राबवत आहे. 'महाराष्ट्र डिजिधन जनजागृती कार्यक्रम' हा त्याचाच एक भाग. अमरावती शहरापासून या उपक्रमाला सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमांतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना कॅशलेस व्यवहारांच्या विविध पद्धतींबाबत प्रशिक्षित करून, कॅशलेस व्यवहारांबाबत जनजागृती करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात येत आहे.**

महाराष्ट्र डिजिधन जनजागृती कार्यक्रमाची संकल्पना आणि संपूर्ण व्यवस्थापन मुख्यमंत्र्याच्या विशेष कार्य अधिकारी प्रिया खान यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री फेलो करत आहेत. हा कार्यक्रम राज्यातील इतर जिल्ह्यांमध्येही राबवला जात आहे. उस्मानाबाद आणि सिंधुदुर्ग या जिल्हांमध्येही हा जनजागृती कार्यकम राबवला जात आहे.

**मुहूर्तमेढ**

महाराष्ट्र डिजिधन जनजागृती कार्यक्रमाची मुहूर्तमेढ अमरावती शहरातून जिल्हाधिकारी किरण गिते यांच्या हस्ते ३१ जानेवारी २०१७ रोजी झाली. जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती येथे पार पडलेल्या या कार्यक्रमात अधिकारी व कर्मचारी तसेच रामटेके आणि अमरावती शहरातील विविध महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे ४२१ स्वयंसेवक उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. श्री. गिते यांनी कॅशलेस व्यवहार व त्याचे फायदे या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमानंतर सर्व सहभागी स्वयंसेवकांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली. कार्यशाळेमध्ये सर्व स्वयंसेवकांना नेट बँकिंग, यु.एस.एस.डी., यु.पी. आय., आधार पेमेंट प्रणाली इ. कॅशलेस व्यवहारांच्या पद्धतींबाबत प्रशिक्षित करण्यात आले.



आपल्या मोबाइलवर भीम/यु. पी.आय. नोंदणीकरण करताना अमरावतीचे जिल्हाधिकारी किरण गिते.

**सन्मान**

महाराष्ट्र डिजिधन जनजागृती कार्यक्रमांतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. या स्पर्धेत विविध महाविद्यालयांचे संघ सहभागी होऊन कॅशलेस महाराष्ट्रासाठी विविध कार्ये पूर्ण करतात. प्रत्येक कार्यासाठी संघाना गुण दिले जातात. सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या संघास विजेता म्हणून सन्मानित करण्यात येते.

■ **जनजागृती अभियान :** कॅशलेस व्यवहाराचे महत्त्व आणि असे व्यवहार करण्याबाबतचे प्रशिक्षण देण्यासाठी, स्पर्धेतील सहभागी संघानी अमरावती शहरात अनेक ठिकाणी जनजागृती कार्यक्रम घेतले. तसेच जवळच्या ग्रामपंचायती, शासकीय रुग्णालये, बस स्थानके, महाविद्यालये इ. ठिकाणी जाऊन कॅशलेस व्यवहारांविषयी जनजागृती केली. अमरावतीमधील २६७२ लोकांना ही प्रक्रिया समजावून सांगितली.

■ **कॅशलेस कॅम्पस:** स्वतःपासून सुरुवात करताना, सर्व डिजिदूतांनी आपले महाविद्यालय कॅशलेस करण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले. अमरावती शहरातील पाच महाविद्यालये आज कॅशलेस आहेत, ही जनजागृती अभियानातील प्रयत्नांची फलप्राप्ती आहे. या महाविद्यालयातील उपहारगृहे, झेरॉक्स केंद्र, शुल्क घेणारे सर्व विभाग कॅशलेस करण्यात आले आहेत. महाराष्ट्र डिजिधन जनजागृती कार्यक्रमाचे हे सर्वात मोठे यश आहे.

■ **भीम/यु.पी.आय., ई-वॉलेट नोंदणीकरण :** आपल्या परिसरामध्ये लोकांना भीम/यु.पी.आय., ई-वॉलेट वापरायला शिकवून, त्यांचे नोंदणीकरण करून कॅशलेस अर्थव्यवस्थेला चालना देण्याचे कार्य या जनजागृती मोहीमेंतर्गत केले जात आहे. या कार्यक्रमांतर्गत ३६ ई-वॉलेट नोंदणीकरण, १७९ यु. पी.आय. नोंदणीकरण करण्यात आले. याचबरोबर काही विक्रेत्यांना त्यांचा व्यवसाय कॅशलेस करण्यासाठी मदत केल्यामुळे अमरावती शहरातील ६ विक्रेत्यांनी आपला व्यवसाय कॅशलेस केला आहे.

■ **बँकेत खाते उघडणे :** ग्रामीण भागात जाऊन डिजिदूतांनी कॅशलेस व्यवहारांविषयी केवळ जनजागृतीपुरतच मर्यादित न राहता, एक पाऊल पुढे जाऊन ज्या व्यक्तींची बँकेत खाती नव्हती त्यांना बँकेत खाते उघडण्यास मदत केली. त्याचबरोबर कुणी आपल्या कौशल्याद्वारे कॅशलेस व्यवहारांविषयी जागृती करून आपल्या सर्जनशीलतेचा परिचय दिला तर कुणी कविता, व्यंगचित्रे, लेख इ. माध्यमातून अभिनव जनजागृती केली. आपल्या महाविद्यालयाचे वेळापत्रक सांभाळून, अथक परिश्रम करून या कार्यक्रमाला यशस्वी करण्यात सर्व डिजीदूतांचा सिंहाचा वाटा आहे.

**– स्वप्निल पुरी**
मुख्यमंत्री आंतवासिता उपक्रम






छायाचित्र: रवी जाधव


मराठी भाषा गौरव दिनानिमित्त सांस्कृतिक कार्य तथा मराठी भाषा मंत्री विनोद तावडे यांच्या प्रमुख उपस्थितीत ज्येष्ठ लेखक मारुती चितमपल्ली यांना विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.


R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2015-17
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 18th to 24th March 2017
Date of Publication : 10th of every Month


महाराष्ट्र शासन


किंमत फक्त ₹१० वार्षिक वर्गणी ₹१००


## लोकमान्य लोकराज्य




आकर्षक मांडणी, उत्कृष्ट मुद्रण

अधिकृत आणि अचूक माहिती

**एबीसीने उमटवली अधिकृत मोहोर**

**राज्यातील सर्वाधिक खपाचे मासिक**

**ऑनलाइन नोंदणीसाठी संकेतस्थळ**

**http://dgipr.maharashtra.gov.in**

प्रति / **TO**

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

प्रवीण टाके
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक प्रवीण टाके, वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा.लि. प्लॉट नं. ईएल /२०१, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, महापे, नवी मुंबई – ४०० ७०४ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.

मुख्य संपादक: ब्रिजेश सिंह